अलंकार-विवेक.

रा. भि. जोशी.

O155:gx
D9

किमत सहा आणे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

0155;9x 3548
D9
Joshi, Ramchandra
Bhikajee.
Alankar vivek.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

0155:gx
D9

3548

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्री पंचाक्षर शिवाचार्य हिरेमठ तासगांव
नं. १२१

अलंकार-विवेक.

रामचंद्र भिकाजी जोशी

संपादक, मराठी शालापत्रक,
बालबोध आणि प्रौढबोध
व्याकरणांचे कर्ते,

थांनीं तयार केलें.

पुणें येथें
'चित्रशाळा' छापखान्यांत छापिलें.

[कर्त्यानें सर्व हक्क राखिले आहेत.]

सन १९०९

किंमत सहा आणे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

0155:gx
D9

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3548

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रस्तावना.

विद्यार्थ्यांना थोडक्यांत अगदीं सुलभ रितीनें, मुख्य मुख्य अलंकारांची माहिती व्हावी आणि त्यांना कविता वाचण्यामध्यें मौज वाटावी या उद्देशानें हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे. यांत महत्वाचे असे सुमारें पन्नास अलंकार, रस, आणि काव्य-गुण यांचीं लक्षणें, माहिती आणि उदाहरणें दिलीं आहेत. यांतील विवेचन अगदीं सोप्या भाषेंत मुलांना सहज समजेल अशा रितीनें केलें आहे. या योगानें विद्यार्थ्यांस मुख्य मुख्य अलंकार सहज समजूं लागतील.

अलंकार या विषयास संस्कृत भाषेंत फार दिवसांपासून शास्त्रीय स्वरूप आलेलें आहे. त्या भाषेंत या विषयावर कोणी लिहूं लागल्यास अगदीं पारिभाषिक पद्धतीनें लिहितात. यामुळें ह्या नवीन तऱ्हेच्या पुस्तकांतील विवेचन पुष्कळांस कदाचित् आवडणार नाहीं. परंतु जुन्या तऱ्हेचें विवेचन विद्यार्थ्यांना मुळींच कळण्यासारखें नसतें. केवळ शास्त्रीय पद्धतीचें असें विवेचन या पुस्तकांत मुद्दामच केलें नाहीं. हें पुस्तक केवळ विद्यार्थ्यांना या विषयाची सहजीं माहिती व्हावी म्हणून लिहिलें आहे. तो हेतु सिद्धीस गेला म्हणजे झालें.

या विषयाचें विवेचन करणारांची समजूत अशी असते कीं रस, अलंकार, इत्यादिकांचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे तीं शृंगारपर असतील, अशींच असलीं पाहिजेत. यामुळें अशा या विषयावरील पुस्तक तरुण वाचणारांस वाचण्यास अयोग्य असेंच नेहमीं होत असतें. प्रस्तुत पुस्तकांत अशा प्रकारचें एकही उदाहरण येऊं दिलें नाहीं.

हें पुस्तक लिहितांना मला मुख्यतः माझे कै० वां० मित्र प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत यांनीं फार दिवसांमागें लिहिलेल्या ‘अलंकार-मीमांसा’ या पुस्तकाचा फार उपयोग झाला. त्याचप्रमाणें दुसऱ्या अनेक पुस्तकांचें मला पुष्कळ साह्य झालें आहे.

रा. भि. जोशी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अनुक्रमणिका.

--x:*:x--

१–प्रास्ताविक	१
२–बोलण्याचे दोन प्रकार	३
३–स्वभावोक्ति	५
४–' नवरस '-विवेचन	९
५–उपमेचे अलंकार	३४
६–कार्यकारणभावाचे अलंकार	६१
७–स्वतंत्र पदार्थांचे अलंकार	६९
८–शब्दालंकार	७७
९–काव्यगुण	८६
१०–सूचि	९९

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamwadi Math, VARANASI
Acc. No. 3425

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अलंकार-विवेक.

१--प्रास्ताविक.

परमेश्वरानें मानवी प्राण्यास सृष्टींतील इतर प्राण्यांहून श्रेष्ठ करण्यासाठीं ज्या गोष्टी विशेष म्हणून दिल्या आहेत त्यांमध्यें बोलतां येणें म्हणजे भाषा ही एक मुख्य देणगी आहे. मनुष्यास जर बोलतां न येतें तर त्याला आज प्राणि-सृष्टींत जें प्रमुखस्थान प्राप्त झालें आहे, तें कधींही प्राप्त झालें नसतें. भाषेमुळें मानवी प्राणी इतर प्राण्यांपेक्षां एकदम फारच श्रेष्ठ व बलिष्ठ होऊन बसला हें अगदीं उघड आहे. सर्व मानवी प्राण्यांना बोलतां येतेंच, परंतु कित्येक मनुष्यें बोलण्याच्या कामांत फार कुशल असतात. ते त्या कलेचा व्यवहारांत अति उत्तम उपयोग करून घेतात. वक्ते, कवि, ग्रंथकार, वगैरे हे भाषाव्यवहार उत्तम करणारेच होत. त्यांना ही कला चांगली साधल्यामुळें ते इतर मनुष्यांवर आपलें श्रेष्ठत्व मिरवितात. देशोदेशीं कांहीं लोक बोलण्याविषयीं नेहमीं प्रख्यात असतात. असे लोक प्राचीनकाळीं प्रख्यात होऊन गेले आहेत व सांप्रतही विद्यमान आहेत. कित्येक देशांत राज्यकारभार हा बोलण्याच्या कलेच्या जोरावर चालतो. उदाहरणार्थ प्राचीन ग्रीक संस्थानें आणि रोमन राष्ट्र, आणि सांप्रतचीं इंग्लंड वगैरे युरोपीय राज्यें. आमच्या इकडे जरी सुभाषणावर अवलंबून असणारी राज्यपद्धति मागें प्रचारांत नव्हती, तरी चांगले बोलके लोक मागें प्रख्यातीस आलेले आहेत. बादशहाच्या दरबारींचा बिरबल हा सुवक्ता म्हणूनच प्रसिद्ध आहे. पहिल्या बाजिरावानें आपल्या मोहक वक्तृत्वानेंच विलासी शाहूमहाराजांचे मनांत मराठी साम्राज्य स्थापण्याची कल्पना भरवून दिली. शेवटचा बाजिराव पेशवा हा उत्तम मोहक बोलणारा होता, आणि तो नाना फडनविसासारख्या कसलेल्या मुत्सद्यासही आपल्या वाग्जालांत गुरफटवीत असे, अशी प्रख्याती आहे. तेव्हां उत्तम बोलतां येणें ही कला सर्वत्र नेहमीं मोठ्या महत्त्वाची अशी मानीत असतात.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अर्थबोध करून आपलें इंगित लोकाला समजाविणें हा भाषणाचा मुख्य उद्देश. परंतु तो अर्थबोध पुष्कळ वेळा मनोरंजक रितीनें आपण करीत असतों. केवळ अंग संरक्षणासाठीं साधा, जाडाभरडाही पोषाख चालतो. पण त्यालाच अनेक तऱ्हेनें शोभा आणून आपण इतरांचें लक्ष आपल्याकडे लागेल असें करितों. ह्याच प्रकार भाषणाचाही आहे. पुष्कळदां आपण आपलें इंगित मोहक रितीनें दुसऱ्यास समजेल असा प्रयत्न करितों. "तो गृहस्थ मोठा उदार आहे," आणि "तो गृहस्थ या युगींचा कर्णच आहे," ह्या दोन्ही वाक्यांचा अर्थ एकच आहे. पण पहिल्या वाक्यापेक्षां दुसऱ्या वाक्यापासून रंजन अधिक होतें हें सर्वानुभवसिद्ध आहे. तसेंच "दुष्ट विषयांचें सेवन केल्यानें जें सुख होतें तें फार थोडें होतें व दुःख फार मोठें होतें," ह्या वाक्यानें जो अर्थ समजतो तोच अर्थ—

"सुख पाहतां जिवापाडें । दुःख पर्वता एवढें"

ह्या अभंगापासून मनांत येतो. पण अभंगानें तो अर्थ जसा खुलतो व मनांत ठसतो, तसा पहिल्या अगदीं साध्या वाक्यानें खुलत व ठसत नाहीं.

यावरून बोलण्याचे दोन प्रकार झाले; एक साधें बोलणें आणि दुसरें शोभायुक्त बोलणें. बोलण्यास शोभा आणणारा जो धर्म त्यास अलंकार असें म्हणतात; कारण 'अलं-कार' या शब्दाचा मूळचा अर्थ 'शोभा आणणारा' असाच आहे. अलंकाराच्या योगानें एकीकडे चित्ताचें रंजन होत असतां मन प्रधान अर्थाचें ग्रहण सुखानें करितें व त्या आनंदाच्या नादांत प्रधान अर्थ चांगला व खरा आहे अशी बुद्धि होते. औषधांत साखर मिळविली असतां तिच्या गोडीखालीं औषधाचा कडूपणा किंवा तुरटपणा वगैरे अनुभवास न येतां जसें मूळ औषधच गोड आहे असें वाटतें, त्याप्रमाणेंच ही गोष्ट आहे. फार तर काय, बोलणारा किंवा लिहिणारा जर चतुर असला तर तो आपल्या भाषणाच्या किंवा लेखाच्या रसानें दुर्बल अर्थ सुद्धां ऐकणाऱ्यास किंवा वाचणाऱ्यास सबळ आहे असें भासवितो. मग मूळच्याच खऱ्या असलेल्या गोष्टी तो खऱ्या, चांगल्या आणि सबल करून

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दाखवील यांत नवल काय? न्यायसभेंत दुसऱ्याच्या तर्फेनें भाषण करणारे वकील, पार्लमेंटादि राजसभांतून स्वपक्षमंडणार्थ भाषणें करणारे मुत्सद्दी, लोकरंजनार्थ अथवा स्वमतस्थापनार्थ सभांतून भाषणें करणारे वक्ते, उपदेश करणारे लोक, शिक्षक, पुष्कळ लोकांनीं वाचावीं म्हणून पुस्तकें लिहिणारे ग्रंथकार, यांना आपल्या भाषेला शोभा कोणत्या गुणांनीं आणि कोणत्या तजविजींनीं आणतां येईल हें चांगलें समजत असल्यावांचून त्यांस आपापल्या कामांत पूर्ण यश कधींही येणार नाहीं.

संस्कृत भाषेंत ग्रंथरचना अपार आहे. तसेंच त्या भाषेंत कवि व ग्रंथकार यांचा नाना विषयांत लेखनव्यवहारही फार वर्षे चालू होता. यामुळें त्या भाषेंत अलंकारही पुष्कळ बनले आहेत. तसेंच त्या भाषेंत या विषयावर ग्रंथही पुष्कळ आहेत. त्या ग्रंथांच्या अनुकरणानें मराठी भाषेंतही या विषयावर कित्येक ग्रंथ झाले आहेत; परंतु ते ग्रंथ असावे तसे सुबोध नाहींत. संस्कृत भाषा पुष्कळ वर्षे प्रचारांत नसल्यामुळें त्या भाषेंतल्या अशा ग्रंथांना प्रायः केवळ शास्त्रीय स्वरूप आलेलें असतें, यामुळें मराठींत त्यांच्या अनुकरणानें जे ग्रंथ झाले आहेत, ते असेच केवळ शास्त्रीय आणि हिशोबी भाषेंत लिहिलेले आहेत. ते सुलभ, सुबोध आणि मनोरंजक असे नाहींत. यामुळें मराठी भाषेंत विशेष आढळणाऱ्या मुख्य मुख्य अलंकारांचें अगदीं सोप्या रितीनें शालापत्रकांत विवेचन करण्याचा विचार आहे. प्रत्येक विषय उदाहरणांच्या द्वारें अगदीं सोप्या भाषेंत विद्यार्थ्यांस समजून द्यावा, अशी नवी शिक्षणपद्धति सांप्रत उपयोगांत येत आहे. तदनुरूप अलंकार-विवेचनाचा प्रयत्न करण्याचा विचार आहे. हें वाचकांस व विद्यार्थ्यांस आवडल्यास या विवेचनाची ह्यापेक्षां अधिक उपयुक्त अशी बनविलेली पुनरावृत्ति पुढें मागें वाचकांस सादर करितां येईल.

२—बोलण्याचे दोन प्रकार.

भाषण किंवा बोलणें म्हणजे कांहीं तरी सांगणें किंवा वर्णन क-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रणें. सांगण्याचे किंवा वर्णन करण्याचे दोन प्रकार असतात:- (१) जसें असेल तसें यथातथ्य, सरळ वर्णन करणें, आणि (२) प्रकारान्तरानें वर्णन करणें. पहिल्या प्रकारचें वर्णन स्वाभाविक असतें म्हणून त्यास **स्वभावोक्ति** असें म्हणतात आणि दुसऱ्या प्रकारचें वर्णन अस्वभाविक म्हणजे वांकडें असतें, म्हणून त्यास **वक्रोक्ति** असें म्हणतात. दुसऱ्या प्रकारचें वर्णन हें अलंकारिक वर्णन होय. या ठिकाणीं ' वक्र ' याचा वाईट अर्थ घ्यावयाचा नाहीं.

वर्णनांत अलंकार करणें तों चमत्कारिक **अर्थ-रचना** करून करितात अथवा **शब्द-रचना** चमत्कारिक करून करितात. पहिल्या प्रकारचे अलंकार हे **अर्थालंकार** व दुसऱ्या प्रकारचे **शब्दालंकार** होत. वास्तविक पाहातां अर्थालंकार हे प्रमुख होत. शब्दालंकार गौण असतात. यासाठीं प्रथमतः प्रमुख अर्थालंकार सांगून मग कांहीं थोडे शब्दालंकार सांगूं.

अर्थदृष्ट्या वाक्याचे भाग दोन. एक प्रधानार्थ व दुसरा अलंकारिक अर्थ. प्रधानार्थ भाषणांत नेहमीं असलाच पाहिजे. अलंकारिक अर्थ बोलणाराच्या मर्जीप्रमाणें आणि गरजेप्रमाणें आणावयाचा असतो. व्याकरणशास्त्राचा भाग जो वाक्यपरिच्छेद, त्यामध्यें वाक्य होण्यास उद्देश्य आणि विधेय, आणि क्रियापद सकर्मक असल्यास कर्म, एवढी सामुग्री पुरे होते. परंतु केव्हां बोलणारा उद्देश्यास आणि कर्मास विशेषणादिकांनीं आणि विधेयास विधेयपूरकांनीं अलंकृत करितो. बोलणारास असें करण्याची हौस असते, किंवा अर्थनिष्पत्ति चांगली व्हावी म्हणून तसें करण्याची जरूरी पडते. ही जरूरी केवळ अर्थनिष्पत्तिकरितांच असते असें नाहीं, तर पुष्कळदां श्रोता व वाचक यांचें मन वेधण्यासाठींही वक्ता आणि लेखक यांना या युक्त्या करण्याचें कारण पडतें. यासाठीं भाषेंतील अलंकार हे केवळ चैनीच्या वस्तू आहेत असे नव्हे, तर ते पुष्कळदां जरूरीचे आणि अपरिहार्यही असतात.

---

३ स्वभावोक्ति.

प्रधानार्थ म्हणजे साधा, स्वाभाविक अर्थ, याला मागें **स्वभावोक्ति** असें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

म्हटलेंच आहे. हें स्वाभाविक वर्णनही जरी अगदीं साधें असलें, तरी चमकविणारें असतें. याचीं पुढील उदाहरणें पहाँ:-

मृगयेचें वर्णनः—

" वधिले व्याघ्र-वृक-खग-श्वापद,
धरिले प्रमत्त गज रानीं.
चिरिले किरि, लेशहि धृति
मृगयूथीं नुरविलीच गजरांनीं. " मोरोपंत.

तसाच युद्धाचा प्रसंगः—

" मारून रात्रिचरकटक, रुधिरनदी खळखळाट वाहविली,
चळवळ घटोत्कचाची मर्मीं भेदुनि मुहूर्त राहविली. " मोरो.

श्रीराम शिशुपणीं स्तनपान करीत आहे. त्याचें वर्णनः—

" पीतां स्तनातें क्षणमात्र राहणें,
महादरें मातृमुखास पाहणें;
वक्त्रांत तें दुग्ध तसेंचि वाहणें,
तेणेंचि फूत्कार करोनि नाहणें. "

मोरोपंत.

हें वर्णन सहज, नेहमींच्या परिपाठांतलें, परंतु अगदीं हुबेहुब नाहीं असें कोण म्हणेल ?

पुष्कळदां वर्णन अगदीं स्वाभाविक असतें, परंतु मधून मधून रसांचा व अलंकारांचा छटा असतो. तरी अशा स्थळीं मुख्य अलंकार स्वभावोक्तीच मानावा. स्वभावोक्तीचीं आणखी उदाहरणें—

---

* येथें अलंकारादिकांचीं जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं बहुतेक कवितेंतलीं दिलीं आहेत; यावरून अलंकार कवितेंतच असतात कीं काय, असें कोणास वाटेल. परंतु तसें समजूं नये. अलंकार गद्यांत असतात आणि पद्यांतही असतात. परंतु पद्यमय वर्णन हें मुद्दाम सुशोभित केलेलें असतें म्हणून पद्यांत उदाहरणें जास्त सांपडतात. शिवाय पद्यमय उदाहरणें विद्यार्थ्यांस ध्यानांत ठेवण्यास सोपीं जातात; म्हणून पद्यमय उदाहरणें जास्त दिलीं आहेत. तथापि ठिकठिकाणीं गद्यमय उदाहरणेंही दिलींच आहेत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(१). नंदस्त्री यशोदा दधिमंथन करीत आहे:—

" पृथु नितंब नितंबिनिचा, वरी । कटितटीं कटिसूत्रहि सांवरी,
कनककंकणवृंदहि वाजती । मुखिं सुखश्रमबिंदु विराजती.
श्रवणिंचे श्रवणीं नग हालती। गळति गुंफलिया शिरिं मालती;
घुसळितां कुचकुंभहि कांपती । अमृत ज्यांतिल घे कमलापती.
फिरविते रवि ते दधिभीतरीं । मिरविते रवितेज नगांवरी;
स्वकरिं ते करि चंचळता (आ) ननीं । उपरमे परमेश्वरगायनीं. "

वामन.

(२) कृष्णावर रागावलेल्या सत्यभामेचें वर्णन:—

" गडबडां धरणीवर लोळते । वदवती न कवीसहि लोळ ते;
रडत मूर्च्छित होय घडीघडी । पवन निश्चळ, नेत्र न ऊघडी.
अलक, हार गळ्यांतील, तोडिते । कुरळ केस मुखावरि सोडिते;
करयुगें उर-मस्तक ताडिते । वसन आणिक कंचुकि फाडिते. "

वामन.

(३) पुढील प्रसंग द्वंद्वयुद्धाचा आहे. पौरव नांवाचा राजा अभिमन्यूचें धनुष्य तोडून सारथ्यास मारितो, तेव्हां अभिमन्यु ढाल तरवार घेऊन रथाखालीं उतरून पौरवावर धांवतो, आणि त्याच्या सारथ्यास मारून, पौरवाची शेंडी डाव्या हातानें धरून उजव्या हातानें त्याचें शीर तोडणार, तों इतक्यांत जयद्रथ रथाखालीं उडी घालून अभिमन्यूवर चालून येतो. तेव्हां अभिमन्यु पौरवास सोडून जयद्रथावर धांवतो आणि त्याचा पराभव करितो;—

" करितां सारथिमस्तककोदंडच्छेद पौरवें अहितें,
आर्जुनि असिचर्म धरुनि गांठी अरितें—जसा गरुड अहितें.
खंडुनि सूतशिर, ध्वज, वामकरें केशभार दृढ धरिला,
पाडून रथाखालीं घावी जों त्या कबंधता अरिला—
तों खड्गचर्म घेउनि सिंधुप टाकुनि उडी रथावरुनी,
गर्जुनी हरिपरि अरिवारि, धांवे तद्वधमनोरथा वरुनी;
त्या पौरवासि सोडुनि, सौभद्र जयद्रथावरि उगारे,
हांसुनि म्हणे,—' हरिपुढें वृक-शश-कार्या न थावरिं, उगा रे ! '

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सैंधवसैनिकशस्त्रें खड्गें खंडुनि सरोजनाथाचा —
मोहीं वीरजनां हरसा, स्मरसा अप्सरोजनां—भाचा. ”
मोरो०

पुढील उतारे वामनकृत कालियामर्दनांतील आहेत:—

(४) कालियाच्या डोहाचें वर्णन:—

“ ऊसळे सळसळां जळ डोहीं । ज्यावरीं खग शके न उडों ही;
अंतरिक्षगत पक्षि जळोनि । लक्ष लक्ष पडतात गळोनी.
काळिया तरि जळांतचि आहे । जाति दूर गरळानळ आहे;
उष्णवारिविषवायु नभाला । व्यापितां न उडवे शलभाला. ”

या स्वभावोक्तींत अनुप्रासाचा छटा असल्यामुळें रमणीयपणा वाढला आहे.

(५) कृष्ण डोहांत उडी टाकितो:—

“ हरि चढोनि तयाचि तरूवरी । स्वरशना वसनासह सांवरी;
कसुनि कास कसी कनकांबरें । दृढ करी कटिसूत्र कटीं बरें;
प्रचंड डावा भुजदंड भारी । सव्यें करें वाजवि कैटभारी;
गर्जोनि वृक्षाचवरी तटाकीं । उडी विषाच्या सलिलांत टाकी. ”

(६) कालियामर्दन:—

“ नाच नाचत असोनि नटाचा । हाणितो सरसिजानन टांचा;
हानि यास्तव भुजंगबळाची । दृष्टि त्यावरि पडे अवलांची.
पतिभयें अतिविव्हळ झालियां । शरण कृष्णपदाप्रति आलियां,
स्मृति नुरे कबरांबरभूषणीं । मन समर्पियलें व्रजभूषणीं.
स्तन मुखीं धरुनी पिति लेंकरें । हरिस दाविति तें युवती करें;
हृदयिं भाविति कीं, ‘ व्रजपाळकें । न वधिजे फणि, देखुनि बाळकें. ’
पसरती युवती वसनांचळा, । करतळीं अबळा अतिचंचळा;
हरिस काकुळती करिती जळीं । किति अशा, कितिएक कृतांजळी.”

या स्वभावोक्तींत करुणरसाचेंही मिश्रण आहे. यामुळें ती विशेष खुलली आहे.

(७) कृष्ण डोहाबाहेर आलेला पाहून त्याचे सखे त्याला भेटतात:—

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" कड्यावरुनियां उड्या प्रथम टाकुनी त्या गड्या—
गडे पशुप भेटती; तटतटां भुजीं आंगड्या—
फुगोनि तनु फाटती, मनगटीं कडीं दाटती,
सुखें अमित वाटती, विरहसिंधु ते आटती "

वामन.

या सर्वच स्वभावोक्ति सुरेख आहेत. मात्र मधून मधून कांहीं शब्दालंकार परिपोषक झाले आहेत. परंतु ते वास्तविक दुधांत साखर घातल्या सारखेच आहेत !

४—'नवरस' विवेचन.

वाक्याचा प्रधानार्थ बहुतकरून रस असतो. भक्ति, दया, हर्ष, शोक, क्रोध, तिरस्कार, गर्व, उपहास, आनंद, भय, इत्यादि अनेकविध ज्या अंतःकरणवृत्ति त्या उत्कट झाल्या असतां त्यांस **रस** असें म्हणतात. या वृत्ति चित्तांत उत्पन्न कराव्या हा बहुतकरून ग्रंथकार, कवि आणि वक्ते यांचा एक उद्देश असतो.

मराठी काव्यांतील रसांमध्यें मूर्धाभिषिक्त रस **भक्तिरस** हा होय. आपले मराठी कवि बहुधा सर्व साधुसंत होते. त्यांनीं स्वभाषेंत काव्यरचना केली ती मुख्यतः साधारण जनांना ईश्वरभक्तीचा मार्ग सुलभ करून देण्यासाठीं केली. यामुळें मराठी काव्यग्रंथांत भक्तिरस प्रधानत्वानें आणि भरपूर आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, तुकाराम, वामन, रामदास, अमृतराय, मोरोपंत इत्यादि मुख्य कवींच्या काव्यांतून भक्तिरस उचंबळत आहे. पंताची केकावलि आणि तुकारामाचे अभंग यांमधून भक्तिरस जसा काय ओथंबळलेला आहे. तेव्हां याचीं उदाहरणें येथें द्यावीं तितकीं थोडींच आहेत. तथापि थोडीं निवडक उदाहरणें येथें देतों:—

(१) सदैव नमितां जरी पद ललाट केलें किणें,
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें;
नता करुन मुक्तही म्हणासि, 'मी बुडालों रिणें !'
अशा तुज न जो भजे मनुज, धिक् तयाचें जिणें !

केकावली.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(२) धर्म म्हणे, " श्रीकृष्णा, बुडतों मी, सत्य जाण, तार मला,
भव बुडवी म्हणुनिच तव भजनीं सनकादि जाणता रमला. "
मोरो.

(३) " नारायणीं घडे जेणें अंतराय,
हो का बापमाय, त्यजावी ते;
येर प्रियपुत्रा ऐसे कोण लेखा ?
करिती ते दुःखा पात्र शत्रू. "
" ब्रह्मानंदीं लागली टाळी
कोण देहातें सांभाळी. "
" अशक्य तें तुम्हां नाहीं नारायणा,
निर्जीवा चेतना आणावया;
कोठें गुंतलासि योगियांचे ध्यानीं,
आनंद-कीर्तनीं पंढरीच्या. "

(४) ऐसें भाग्य कई लाहता होईन,
अवघें देखें जन ब्रह्म-रूप;
मग तया सुखा अंत नाहीं पार,
आनंदें सागर हेलावती;
शांति क्षमा दया मूर्तिमंत आंगीं,
परावृत्त संगीं कामादीकां,
विवेकासहीत वैराग्याचें बळ,
धगधगीतज्वाळ अग्नी जैसा;
भक्ति नवविधा भावशुद्ध बरी,
अलंकारावरी मुकुटमणी;
तुका म्हणे, माझी पुरवी वासना,
कोण नारायणा तूजवीण ? "

अशा प्रकारचीं मराठी काव्यांतलीं या रसाचीं उदाहरणें द्यावीं तेवढीं थोडींच आहेच. तुकारामाचे अनेक अभंग द्यावेसे वाटल्यासारखें आहेत. परंतु ते सर्वांस उपलब्ध आणि भक्तिरसपूर्ण असे ओळखून येण्यासारखे असल्यामुळें पाल्हाळ करीत नाहीं. तथापि मोरोपंताचीं आणखी थोडीं उदाहरणें देऊन पुरे करूं.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आपल्या पुराणांत श्रीकृष्ण हा पूर्णावतार मानिलेला आहे. यामुळें तो आणि त्याचे भीष्मार्जुनादि प्रेमळ भक्त, यांच्या संबंधाचे प्रसंग कवि वर्णन करूं लागले, म्हणजे तें वर्णन सहजींच भक्तिरसानें परिपूर्ण असतें. भारतीय युद्धांत अर्जुनाच्या कैवारानें कृष्ण भीष्मावर चालून आला. तेव्हांचा प्रसंग आठवून भीष्म म्हणतो:—

(९) "जो म्यां विशिख विखरितां निज विजयसख्या विलोकितां खिन्न,
धांवे मजवरि—जैसा सिंधु, करुनि सेतुबंधना भिन्न;
शीघ्र रथावरूनि उडी टाकुनि रथचक्र चक्रपाणि वरी,
धांवे मला वधाया तैसा हरि, करिवधार्थ जेंवि हरी;
पळभरि मनुष्यनाट्यस्मृति न धरुनि शीघ्र जेधवां चाले,
तों प्रतिपदीं जगदुदरपरमेश्वरपदभरें धरा हाले;
पडला गळोनि येतां मजसंमुख उत्तरीय पट वाटे;
दोहीं कटकांसि कृपाकर केशव कोपला—निपट वाटे;
म्यां चापपाणिचा खरशरनिकरें ध्वस्त करुनि कवच रणीं;
ताडूनि न्हाणिला प्रभु रक्तें,—ज्याच्या सुलीन भव चरणीं;
धांवोनि विजय धरि, परि हरि करि वरि वेग, नावरेचि तया;
तेव्हां मत्प्राण म्हणति ' युष्मत्कृत निधन हित, न जीवित या; '
जरि विजयपक्षपाती दिसला लोकप्रतीतिनेंची तदा,
परम अनुग्रह मजवरि हरि करि, जाणे असेंचि माझि तदा;
भक्तोक्त सत्य व्हाया, धरि करुणासिंधु चक्र कोपनसा,
अंतःसरसा, कंटककवचा, निंदील कोण हो पनसा ?
माझी गति तोचि असो, जो एवं किंकरासि गौरवितो,
ऐसें यश सुरधेनुक्षीरधिफेनापरीस गौर वितो."

मोरोपंत—भीष्मभक्तिभाग्य.

अशा प्रकारें आपल्या भक्तिभाग्याचें वर्णन करीत असतां भीष्म हा भक्तिरसांत यथेष्ट पोहत होता. या प्रसंगाचें वर्णन वाचून भीष्म आत्मस्तुति करीत आहे असें कोणास वाटण्याचें कारण नाहीं. कारण थोर भगवद्भक्त म्हणून त्याचा अधिकारच तसा होता! भीष्मच पुढें आणखीही मागील स्मरण करून आपल्यावर चालून येणाऱ्या कृष्णाचें भक्तिरसयुक्त स्वभावोक्तीनें वर्णन करितो:—

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(६) " युद्धीं अश्वखुरांनीं धूळ उडविली; तिनें सकळ भरले,
मुखरुचि न मळो म्हणवुनि जाणो रक्षावया पुढें सरले;
सर्वत्र चपळ धांवति अलक, हरिति तरि पुनःपुन्हा येती —
श्रमजलबिंदु, जयाच्या वदना शोभा मनोहरा देती;
माझ्या तीक्ष्ण शरांहीं ज्याचें खंडूनि कवच वपु भग्न—
केलें, त्या कृष्णीं हो मन— जैसें लवण सागरीं—मग्न: "

सरते शेवटीं भीष्म भक्तिरसपरिपूर्ण असे पुढील उद्गार काढतोः—

(७) " सरसतमालश्यामल रविकरगौरांवरद्वयें युक्त,
जें विश्वमनोहर, ज्या मुक्ति त्यागून वांच्छिती मुक्त;
ऐसें जेणें धरिलें अति रुचिर शरीर, ज्यांत मुखपद्म—
शोभे अलक-मधुप-कुल-परिवृत करुणाविभूतिचें सद्म;
त्या जिष्णुच्या सख्या श्रीहरिच्या ठायीं अहैतुकी स्वरती—
राहो सदा, कदापि न हो क्षणहि त्यजुनि तत्पदा परती ! "

भक्तिरसांच्या खालच्या पायरीचा **वीररस** होय. हाही मराठी कवितेंत आणि मराठी बखरींमधून भरपूर आहे. हा रस ज्यांत आहे, असे मराठी अमदानींतले उदात्त रसभरित पोवाडेही पुष्कळ आहेत. मोरोपंताच्या भारतांत वीररस भरपूर आहे. त्यांतही गदापर्वांत तो अगदीं परिपूर्ण आहे. दुर्योधन हा जरी दुष्ट होता, तरी पंतांच्या मतें तो अत्यंत शूर क्षत्रिय आणि बाणेदार योद्धा होता. यामुळें गदायुद्धाच्या अगोदरचीं आणि ऐन युद्धप्रसंगींचीं त्याचीं भाषणें वीररसानें परिप्लुत आहेत. पंतांनीं गदापर्वांत आपलें पूर्ण कौशल्य खर्च केलें आहे. हें पर्व साऱ्या मोरोपंती भारतांत उत्तम आहे; आणि तसें तें उत्तम होण्याचें कारण त्यांतला भरपूर वीररस हेंच होय.

(१) गदायुद्ध सुरू होण्यापूर्वीं दुर्योधन कोणत्या स्थितींत होता हें वाचकांस ठाऊक आहेच. त्यावेळीं त्याला भीम खोंचून बोलला असतां त्यानें त्यास दिलेलें सणसणीत उत्तरः—

कुरुराज म्हणे, " मंदा मेळविलें बहुविकत्थनें काय,
हाय म्हणवितों, युद्ध-श्रद्धेसह भांगितों तुझा काय.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

न्यायें शत्रु मज गदा–युद्धीं जिंकी असा असे कोण ?
तूं महिष तोंचि, जोंचि न शोण-गदा-शक्ति-दृष्टिचा कोण ?
न्यायें मज जिंकाया न समर्थ गदारणीं सुनासीर,
ये भूमींत, वितिलका व्हाया त्या पांडुच्या सुना, सीर !
वदलासि दुर्विचेष्टित माझें जें जें खरेंच, भीमा, तें;
मंदा, न तदेकप्रति–कृत घडलें म्हणुनि लाज, भी, मातें !
म्यां करुनि तुम्हां वल्कल-धर, दीन, सुचिर वनोवन फिरविलें,
अज्ञातवास, दास्यहि करवुनि, निजतेज दुःसह मिरविलें.
तुज लाविलें स्वतेजें म्यांच कढी, भात, वरण, घाटाया,
वांटाया प्राज्य पुरण, पापड, पोळ्या प्रभूत लाटाया.
माझे, तुझेहि, मेले आप्त वहू क्षय समान दोघांचा—
काळें, जैसा घटजें त्या पूर्वापरसरस्वदोघांचा.
भाग्यें घडेल जरि, तरि मज परम श्लाघ्य संगरीं पतन,
जतन क्षत्रिय न करिति, जोडिति नाकीं तनुव्ययें वतन.
अद्यापि मला कोणीं धर्में जिंकी असा असे न गदीं,
छद्में वधितां तुमची होइल अपकीर्ति, विषचि ती अगदीं.
कौंतेया, त्वां शारद-वारिघनापरि वृथा न गर्जावें,
बळ असल्या दावावें, प्रथम विकत्थन समग्र वर्जावें ! ”

मोरोपंत.

(२) भीष्माला परशुराम अयोग्य गोष्ट करावयास सांगत असतां आणि त्यास ‘ मी एकवीस वेळा पृथ्वींतील सर्व क्षत्रिय वधिले ’ इत्यादि आत्मश्लाघेच्या गोष्टी सांगून धाक दाखवीत असतां भीष्म उत्तर करितोः—

(मी) वदलों, “ धर्मन्यायें हा देह तपोवनांत रावावा,
त्यजुनि दुरभिमान धरुनि शांतिसि तारुनि जनांतरा बावा;
ठाव्या आहेत मला, सांगा गोष्टी यथेच्छ अन्या या,
तरि भय भलत्यापासुन होइल जरि मी करीन अन्याया;
वधिले क्षत्रिय जेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव, समज,
देवांसी मागते ते झाले मरणीं करोनि नवस मज;

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गेलें गुरुत्व तुमचें, कां हो म्हणतां वधीन अनघातें,
येइल पदरांत कसें यश, धर्म-न्याय-निष्ठ-जन-घातें;
सच्छिष्याला विद्या गुरु झांकायाशि काय हो शिकवी?
पांडित्य पहा माझें, पाहोनि मला म्हणाल, 'होशि कवी.'"

(३) शल्य कर्णास खोंचून बोलला असतां कर्ण त्यास उत्तर देतोः—

कर्ण म्हणे, "शल्या, गति भीष्माची शत्रुंनीं तशी केली,
गुरुहि अधर्में वधिला, विजयश्री ओढुनि बळें नेली.
परि मी चित्तीं निर्भय, युद्धोत्सुक सिद्ध जाहलों आहें,
पाहें उत्साह, जगीं निस्तुळ माझेंची धैर्य बापा हें.
भ्यालासी मूढमते, वडबडशी फार, वानिशी अरिला,
भाव तुझा मज कळला, धीर तुझा मृत्युच्या भयें हरिला.
येतील कृष्ण दोघे मज एकावरि, जगांत मी धन्य,
लोकत्रयीं सुजन्मा मत्सम माझ्यामतें नसे अन्य.
ते मारितील मज कीं, त्यांला मारीन मी, स्वबळ जाणें,
कृष्णांला कर्ण न भी, तनु टाकुनी एकदां असे जाणें!
दोघांची काय कथा, जरि कृष्णार्जुन सहस्र येतील,
तरि माझे शर त्यांच्या प्राणधनांसी हिरोन घेतील."

(४) अभिमन्यु चक्रव्यूह भेदण्यास जाण्याचा निश्चय करून धर्मास म्हणतोः—

[सौभद्र म्हणे] "शिरतों व्यूहीं, डोहीं जसा मतंगज, वा-
हरिपोत दंतियूथीं, कीं दहनीं करूनियां पतंग जवा.
व्यूहीं शिरेन शरसा, मागें परतेन एक पदही न,
युष्मत्पदप्रसादें होतिल युष्मत्सपत्न मदहीन."

पुढील वर्णनः—

ज्येष्ठपित्याला देउनि अभय, म्हणे तो सुवीर सूतातें,
"हूं, हांक रथ, म्हणावी माय सुभद्रा सुवीरसू तातें;"
तो सूत सुमित्र म्हणे, "भो आयुष्मन्, कुमार आपण कीं,
हांकिन हरि अरिवरि, परि कुरुगुरुशीं गांठि कठिण हा पण कीं."
हांसुनि सौभद्र म्हणे "हटकीन हठें रणांत भीमातें,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शक्रार्जुनकृष्णांसी करितां समर न शिवेल भी मातें. "

वीर रस म्हणजे केवळ युद्धांतील शूरत्वाचेंच वर्णन असें नाहीं. तर इतर प्रसंगींही धीटपणा, उत्साह अथवा दृढनिश्चय दाखविला आहे असें वर्णन असतां त्याला **वीररस** म्हणण्यास चिंता नाहीं:—

" देह जावो अथवा राहो । आमुचा पांडुरंगीं भावो " -
तसेंच—" मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास,
कठीण वज्रास भेदूं ऐसे. "

येथें ईश्वरभक्तिसंबंधाचा दृढनिश्चय वर्णिला आहे.

मृच्छकटिक नाटकांतील चारुदत्ताच्या पुढील उक्ती पूर्ण दृढनिश्चय दाखविणाऱ्या, अतएव वीररसमयच आहेत:—

" भिक्षा मागून तिचें ठेवीचें ऋण कसेंही फेडीन,
परि कीर्तिविघातक जें अनृत, मुखांतुनि कधीं न काढीन. "
" दैवेंचि गांठ पडली, आतां मी मन तुझें न मोडीन,
सोडीन प्राणांतें, परि तुज शरणागता न सोडीन. "

परशुरामपंत.

संस्कृत वाङ्मयांत **नवरस** मानितात. तथापि ते कोणते यासंबंधानें थोडा बहुत मतभेद आहेच. मराठी वाङ्मयांत भक्ति, वीर, व पुढील आठ असे एकंदर दश रस मानावे. यांचीं नांवें व थोडक्यांत लक्षणें:—

(३) **शृंगार**—सुंदर वस्तूंचें मनोवेधक वर्णन.
(४) **करुण**—दुःखशोकांचें वर्णन.
(५) **अद्भुत**—चमत्कार वाटल्यासारखें किंवा अद्भुत प्रसंगाचें वर्णन.
(६) **हास्य**—हसूं येण्यासारखें विशेषतः थट्टास्पद असें वर्णन.
(७) **भयानक**—भीतियुक्त प्रसंगाचें वर्णन.
(८) **वत्सल**—बंधु, पुत्र, माता, इत्यादिकांचा जो स्नेह, म्हणजे माया, तिचें वर्णन.
(९) **शांतरस**—मनाला उपरति झाल्याचें अथवा शांततेचें वर्णन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(१०) **उदात्त**—सृष्टिशोभेचें, वनश्रीचें अथवा एकाद्या प्रसंगाचें हुबेहुब आणि मनोवेधक वर्णन.

हे जे मुख्य दहा रस त्यांचे प्रसंग मराठी वाङ्मयांत भरपूर आहेत. कविता वाचणारांस यांचीं उदाहरणें पाहिजेत तितकीं आढळतील. येथें फारसा पाल्हाळ न करतां प्रत्येक रसाचीं थोडीं थोडीं उदाहरणें देऊं.

(३) **शृंगार**—कृष्ण रुसलेल्या सत्यभामेला समजावून तिची वेणी वगैरे घालितो;—

" अशी ते बुझावूनि रंभोरु, हातें—
तिच्या धूतसे हो मुखांबोरुहातें;
उटी लावुनि वांटल्या केशरा जी,
स्वहस्तांबुजीं विंचरी केशराजी.
पतीनें अलंकारितां फार साजे,
सखीचे करीं पाहते आरसा जे;
गमें कीं, स्वसौंदर्यसीमा न साहे,
प्रिया प्रीतिनें वाढवी मानसा हे.
करि हरि यमुना हो मूद गंगावनाची,
मिरवि धवल पुष्पीं दीप्ति गंगावनाची;
सित-असित नद्यांच्या संगमीं श्रीत्रिवेणी,
तशिच यदुपतीनें घातली चित्र वेणी."

रुक्मिणीचें वर्णनः—

"चहूंकडूनिहि आनन शोभलें,
पदक खालुनि शोभतसें भलें;
श्रवणिंचे नग शोभति दोंकडे,
वरुनि चांचर केशहि वांकुडे."

(४) **करुणारस**—अभिमन्यूच्या वधाची वार्ता ऐकून अर्जुन शोकानें विव्हळ होऊन म्हणतोः—

" कुंतीस काय सांगूं ? कृष्णेला दाखवूं कसें वदन,
दुष्कर मला सुभद्रासांत्वन, दुर्दर्श उत्तरासदन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हा वत्सा रक्ताक्षा झाले त्वत्सुगुण आजि घातकसे,
बा, वाहले परांचे तुजला हाणावयासि हात कसे? "

रामानें सीतेकरितां केलेल्या शोकाचें वर्णन मोरोपंतानें आपल्या निरनिराळ्या रामायणांत केलें आहे. त्यांत भारतीय रामायणांतलें वर्णन फार मनोवेधक आहे. त्यांतली एकच आर्या येथें देतों:—

" हा सीते ! हा सीते ! असंसिल अद्यापि तूं कशी सासू ?
ऐकुनि या वार्तेतें प्रियसखि वांचेल ती कशी सासू ? "

करुणारसांत आणखी वियोगाच्या प्रसंगाची भर पडलेली असली म्हणजे तो फारच सुंदर होतो. पुढील आर्यांमध्यें नळ दमयंतीचा त्याग करून जात आहे, त्या वेळचें वर्णन आहे: —

" जाय, पुन्हां नळ परते, पाहे येउनि तिच्या मुखाला हो,
साश्रु नळ म्हणे, ' देवा, हे वामाक्षी सती सुखा लाहो ! '
जाय पुढें, ये मागें परतोनि सवेंचि, जेंवि दोला हो,
तो लाहो भेटीचा घे, कीं न पुढें स्वदृष्टि लोला हो;
विश्वंभरे, क्षमे, या साध्वीला रक्ष, म्यां निरविली हो,
सर्वसहे, तुजपुढें न स्वाधिकता इणें मिरविली हो;
बापा, सतिव्रता, हे तुजबहु जपली, न जीवितास सती,
तूंहि हिला बहु जप गा; त्वां त्याजिल्या न स्त्रिया बऱ्या दिसती."

उत्तररामचरितांत रामानें सीतेसाठी केलेला शोक:—

" हा हा देवी हृदय फुटतें देह माझा गळाला,
वाटे शून्य त्रिभुवन मला, अंतरात्मा जळाला;
या आत्म्यानें किति तरि सदा दुःखभारा धरावें,
मोह व्यापी फिराफिरुनियां, काय आतां करावें ? "

(४) अद्भुतरस—दुष्यंतराजा स्वर्गांतून खालीं रथावर बसून उतरत असतां त्या वेळच्या देखाव्याचें विस्मयकारक वर्णन:—

" शैलांचीं शिखरेंच येति वरतीं, जाते मही खालती,
अंतर्लीनपणा त्यजून तरुच्या शाखा पहा हालती;
रेखाप्राय नद्यांत सत्वरगती पाणी कसें दाटतें,
हा भूगोल अतित्वरें मजकडे येतो असें वाटतें. "

शाकुंतल.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

[stamp]

ब्रह्मदेवानें दमयंती कशी बनविली, त्याचें वर्णन:—

" धाता करींच करिता मृदु ते न होती
या कारणास्तव मनोमय मूस ओती;
तेथें भरोनि पहिला रस पूर्ण केली,
ओंतींव हे न घटिताकृति बोलिजेली." रघु०

रामानें शिवधनुष्याचा भंग केला, त्या समयाचें अद्भुत वर्णन कवि आनंदतनय करितो;—

" रामें लोकाभिरामें मदनशतसमें पूर्णकल्याणधामें,
लीलाभूभृल्ललामें तुकुनि शिवधनू ओढिलें पूर्णकामें;
ओढी घेतां तडाडी, निविड दशदिशीं घोष मोठा झडाडी,
मध्यें भंगे कडाडी, प्रतिनिनद नभीं मेघ जैसा गडाडी."

अभिमन्यूनें युद्धांत अनेक मोठ्या मोठ्या वीरांना ' त्राही भगवान् ' करून सोडलेलें ऐकून धृतराष्ट्र आश्चर्य पावून म्हणतो:—

" अंध म्हणे, रे संजय, हें त्या पौत्रास वर्ष सोळावें,
लोळावें मांडिवरी, तेणें द्रोणादिकांसि घोळावें !"

(१) हास्यरस—उत्सवप्रकाशांत शिमग्यांतल्या धुळवडीचें वर्णन केलें आहे तें:—

" आणून गाढव तयावरी बैसवोनी—
एकास, त्यास बुरणूसचि नेसवोनी,
डोक्यावरी धरुनि सूपाचि छत्र, त्याची—
नेती वरात बहु गोजिरिया वराची;
घोडे पुढें बहुत चालति कोतवाल,
मध्यें वराश्व धरितो बहु मंद चाल;
भोंते वऱ्हाडि जन चालति राजमार्गीं
ऐशी वरात नच पाहिल तो अभागी;
कुंभारवाड्यांतिल ठाणवंदा,
अश्वांत तो अश्व बहूत खंदा;
मांडी ढळेना वरि राजबिंडा,

---

१ म्हणजे शृंगार रस.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बोले तुम्ही स्वस्थपणेंचि हिंडा;
झाडीत लाथा बहु आरडोनी,
ख्यां ख्यां करीतो परि ओळखोनी--
स्वारी, पहा जेराचि जेर झाला,
त्या सोहळ्यानें वर फार धाला;
पाठाड मोठें, वसणार पक्का,
कोठें न पावे गरदींत धक्का;
वाद्यें ठणाणा बहु वाजताती,
बुजे न घोडा, जणुं भद्रजाती;
मुंडावळी बांधुनि खेटरांच्या,
पलांडुच्या, आणिक गाजरांच्या,
कंठांत घालूनिहि माळिकेला,
तो सोहळा फार वरास केला;
येतां चवाठ्यांत वरात-टोळी,
वधूवरें पाहुनि भातपोळी-
ओंवाळुनी टाकिति, कीं न यांस-
हो दृष्टि, पावोत सदा जयास;
तो जातिवंत जरि अश्व, तरी तयाची,
हुक्की बहू उपजली क्षण लोळण्याची;
तेव्हांच तें तुरगरत्न बहुत लोळे,
तें दंपतिद्वय धुळींत बहूत घोळे. ''

रावण आपला बंधु कुंभकर्ण यास रामाबरोबर युद्ध करण्यास जाण्यासाठीं जागें करीत आहे:—

" मग सत्वर रात्रिंचर गेले तो कुंभकर्ण उठवाया,
पाठविले दशवदनें जे तन्निद्राधनासि लुटवाया;
त्याच्या निकट मधुरुधिरघट शतसंख्याक ठेविती पूर्ण,
मत्स्यवराहमहिषमृगमांसांचे राशि निर्मिती तूर्ण.
विंध्य तसा निजला तो; वदनदरीमाजि निबिड आंधार-
फार भयंकर भासे, पातालाचेंच काय तें दार !
श्वासानिलरयपतित क्षणदाचर तूलतुल्य ते भ्रमती,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नासाप्रवेश निर्गम गतागतें मशकसे किती भ्रमती !
' हे कुंभकर्ण, राजा बलावितो, ' मारिती अशा हाका,
हा कांहींच वदेना निद्राप्रिय इंद्रशत्रूचा काका.
एकसहस्र महारवदुंदुभिंसहि ताडिलें कितेकांहीं,
मुद्गरमुसलें करिती ताडन, परि लागती न ते कांहीं !
शतसंख्याक जलाचे कुंभहि आणून रिझवले कानीं,
केशोन्मूलन केलें, झाले निजकंठ शुष्क हाकांनीं.
चावुनियां काय वळें, धांवुनि अंगावरूनियां हसती,
मृतवन्यगजास जसे वायसगण वेष्टिती तसे दिसती.
दशशतगज देहावर चालविले, ताडिलीं शिलाशिखरें,
निद्रापराजयास्तव केलें त्यांनीं प्रसिद्ध युद्ध खरें ?''
ऐसा बहुतां यत्नें जागा केला, जसा महाकाल,
मधुलोहित घट घटघट सेवी मांससमेत तत्काल;
क्षत्तृट्-परिहारातें करुनी निद्रालसस्वभावानें,
कश्यादांसि म्हणे, ' मज ऊठविलें किन्निमित्त भावानें ? ,"

मोरोपंत–मंत्ररामायण.

या उताऱ्यांत किळस येण्यासारखें बरेंच वर्णन आलेलें असल्यामुळें बीभत्स रसही आहे.

(७) भयानक रस—भीमानें दुःशासनास मारून त्याच्या उराचें विदारण केलें, आणि प्रतिज्ञेप्रमाणें त्याचें रक्त पीत आहे:—

" अशनिहतशिळातळ जळ, रक्त तसें खड्गभग्न तें उर वी,
तृषित घटोत्कचतात प्राशी शोणित न लेश ही उरवी;
मग कंठनाळ चरचर तो सत्य करावया बिरुद कापी,
मिटक्या देउनि मटमट, घटघट त्या स्वाहितासृगुदका पी;
' जे जे लोकीं असती रस, त्यांची तों न माधुरी थोडी,
परि अरिच्या रक्तरसीं मज बहु त्यांहून लागली गोडी;
ऐसें वदोनि ओष्ठाप्रांत जिभेनें पुनःपुन्हा चाटी;
अवलंबी अत्युग्रा भीम अतृप्तद्विपारिची धाटी;
रिपु शूर, दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

किति पडती, किति दडती, कितिएकांचीं धृतायुधें गळती. ”

सीतास्वयंवरप्रसंगीं रावण शिवधनुष्य उचलण्यास पुढें आला आणि त्यानें धनुष्यास हात घातला, तेव्हां सीता, तिच्या सख्या आणि इतर जन भयचकित झाले, त्या प्रसंगाचें वर्णन आनंदतनय करितो:—

“ लंकानायक सायकासनगुणीं सज्जावया सज्जला,
तों सीता भयकंपिता, जन महाचिंतांबुधीं मज्जला;
झाल्या म्लानमुखी मनोरम सखी तो जों भुजा सांवरी,
तों आकार विकार देखुनि उठे हाकार माडीवरी. ”

विराटपुत्र उत्तर मोठ्या आढ्यतेनें कौरवांशीं युद्ध करावयास आला, परंतु सैन्य पाहातांच त्याची गाळण होऊन म्हणतो,—

बोले, “ बृहन्नडे, हें कुरुबळ कल्पांतसिंधुसें गमतें,
ने रथ पुरांत, माझें मन नयनहि पाहतां बहु भ्रमतें;
आज्ञा नसतां आलों, रागें न भरेल काय हो तात ?
रोमांच, घर्म, कंप, प्रगट व्यापूनि काय होतात;
दुर्योधन, दुःशासन, कर्ण, कृप, द्रौणि, भीष्म ज्या कटकीं,
त्यांत मरेनाचि शिरतां, कांख्यावरि घालितां चिरे पट कीं ! ”

(८) वत्सलरस—राम अरण्यवासास निघून गेल्यावर भरत त्याला चित्रकूटीं येऊन भेटला, तेव्हांचें वर्णन:—

“ रडे, फुंदफुंदे, शिरीं पादपद्मा—
धरी, सद्मा मानीतसे नित्य पद्मा;
वळें क्षेम दे त्यासि ओढून राम,
स्वभक्तप्रिय, स्वामि भक्ताभिराम.
मांडियेउपरि बैसविला हो, अश्रुनीर पुसि, घे सुख लाहो;
‘ वांसरा न रड, सांग सुवार्ता ! ’ शब्द हा निववि दुःखदवार्ता. ”

वामन.

तान्ह्या मुलाचें कौतुक करीत असतां आईला कसा आनंद होतो:—

“ शिशु पाळण्यांत घालुनि हालवितां निजवितां सुखें ‘ जो जो ! ’
धात्री म्हणति; सखीला अमृतरसाचि तो, निघे मुखें जो जो ”;

मोरोपंत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कृष्ण शिष्टाई करण्यास गेला असतां त्याची आणि कुंतीची भेट फारां दिवसांनीं झाली तिचें वर्णनः—

" वैकुंठाच्या कंठीं घालून मिठी रडे पृथा आर्या,
ब्रह्मासहि गहिंवरवी महिवर-वीरेन्द्र-पांडूची भार्या. "

मोरो०

प्रद्युम्न हरवलेला फार दिवसांनीं सांपडला. रुक्मिणीनें त्यास पाहतांच तिची काय अवस्था झाली, ते वर्णनः-—

" वैदर्भी यास पाहे, द्रव हृदयिं धरीं, तत्क्षणीं स्तन्य वाहे,
कीं ते आनंद लाहे, जरि तनुज असें ज्ञात होणेंची आहे;
वाष्पानें कंठ दाटे, सकल तनुवरी क्षिप्र रोमांच थाटे,
शोकाचा सिंधु आटे त्वरित परम तद्दर्शनीं लोभ वाटे. "

मोरो०

कृष्ण आणि सुदामा यांच्या भेटीचें वर्णनः—

" सदनांगणांत दूरुनि पाहुनि सन्मित्र बंधुला सहसा,
सहसात्विकभाव प्रभु धांवे, तो होय मूर्त सन्महसा;
राहे हर्षीं न मना नमनाचें भान बंधु पाहूनी,
बाहुनि प्रेमानें मानें आलिंगिलाचि बाहूंनीं;
दोघांचेंही होतां आलिंगन हृत्प्रमोदकारि गळे—
दाटति; दोघांच्याही नेत्रांतून प्रभूत वारि गळे. " मोरो०

या आर्यामधील सुंदर अनुप्रासांनीं या वर्णनास विशेष गोडी आली आहे.

कृष्णानें देवकीला तिचे मृतपुत्र दाखविले, तेव्हां देवकीची जी स्थिति झाली तिचें वर्णनः—

" बाळें जेव्हां पाहे, पान्हा श्रीदेवकीस्तना दाटे,
आटे शोकांभोधि, स्वांताला हायसें तिला वाटे;
भेटे त्या पुत्रांतें, पाजी, चुंबी, रडे सुखें हांसे,
जाणो ते मायेनें मोहाचे घातले गळां फांसे ! " मोरो०

दुष्यंत भरतास पाहून उद्गार काढतोः—

" देखून दंतमुकुलां अनिमित्त हासे,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ते बोबडें वच तसें परिसोनि खासें,
अंकावरी बसवुनी तनयां वहाती,
त्यांच्या रजीं मळति, ते जगीं धन्य होती. ''

शाकुन्तल.

या वत्सलरसाला प्रेयान्रस असेंही कोणीं म्हटलें आहे.

(९) शांतरसः—

" संसार हें दीर्घ स्वप्न, जाजावती 'मी' 'माझें' म्हणून,
सावध व्हा, उघडा नयन, निजसदन विचारा. " श्रीधर.

" कवणाचें घर कवणाचें दार। सोडोनी संसार जाणें लागे;
जाणें लागे अंतीं एकला एकट। व्यर्थ खटपट जन्मवरी;
जन्मवरी जाण संसारीं गोवीलें। नाहीं कांही केलें आत्महित;
आत्महित गेलें संसाराचे ओढी। अंतीं कोण सोडी रामावीण;
घातकची आहे लोकांचा तो संग। म्हणोनी निःसंग तुका राहे. "

" न जाणतहि ये मुखा हरि, तथापि पापें हरी;
स्मरोनि महिमा स्मरे वदनि तींच नामें तरी—
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनांचीं मनें,
विरक्त करितो हरी स्वगुणनामसंकीर्तनें. "

वामन.

" एकाग्रचित्त, तनुनिश्चळ, मौन वाचे,
जे ये रिती कवळ घेति कथामृताचे,
ब्रह्मा म्हणे, अजित तूं तुज जिंकणारे
नाहींत, यद्यपि तयां वश तूं मुरारे !
टाकूनियां इतर साधनमात्र धंदा,
तूझी कथा सतत आइकती, मुकुन्दा;
त्यांचें जिणें सफळ, जे भगवत्कथेतें—
मानून जीवन पिती, त्याजिती व्यथेतें. "

शांतरस मराठी कवितेंत भरपूर सांपडणारा आहे; यासाठीं त्यांचीं आणखी उदाहरणें देण्याचें कारण दिसत नाहीं. भक्तिरस हा शांतरसाचाच प्रकार होय.

(१०) उदात्त रस—सातपुड्यांतील वनश्रीचें वर्णनः—

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" हें जंगल म्हणजे वस्तुतः सातपुड्यांतील जंगल होय, व तें श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या राज्यांतील इतर जंगलांपेक्षां फार विस्तृत, फार दाट, व फार भयाण आहे. याचे कांहीं भागांस तर जंगल म्हणण्याऐवजीं सृष्टीकर्त्यानें पेरलेलीं 'बांबूंचीं शेतें' असें म्हटलें तर एका अर्थीं अधिक शोभेल! एकाद्या शेतांत बाजरी किंवा एकादें दुसरें धान्य पेरलें असतां तें जितकें दाट उगवतें व त्यांतून शेताच्या एका बांधावरून दुसऱ्या बांधाकडे जाण्यास नुस्ती वाट सुद्धां मिळत नाहीं, त्याप्रमाणेंच या प्रदेशांत एकास एक खेटून उगवलेलीं बांबूंचीं असंख्य बेटें असल्यामुळें हें रान कांहीं भागीं तर अगदीं दुर्गम झालें आहे! अशा बांबूच्या गर्द झाडींतून जंगल तोडून केलेल्या रस्त्यानें जों जों पुढें जाऊं लागलों, तों तों त्यांतील अनेक प्रकारच्या वृक्षवनस्पति दिसूं लागल्यामुळें त्याचें खरें वैभव कळूं लागलें, पण त्याबरोबरच त्याचें स्वरूपही अधिकाधिक भयानक भासूं लागलें! यांत कांहीं ठिकाणीं रस्त्याचे दोन्ही बाजूंवर मोठमोठे गगनचुंबित वृक्ष जागच्याजागीं जळून व कोळपून गेलेले व कांहीं तर रक्षाराशिरूप होऊन आमचे मार्गांतच आडवे पडलेले आढळत होते! कित्येक ठिकाणीं नजर पोंहचत होती तेथपर्यंतचें सर्व रान वणवा लागून जळून गेलेलें व रक्षेनें झांकिलेली त्यांतील धरित्री शुभ्र वस्त्र परिधान केल्यासारखी दिसत होती! अशा जागचीं उन्हानें व वणव्यानें करपलेलीं व वाऱ्यानें खडखड वाजणारीं वृक्षांचीं पानें शोकगीतेंच गात आहेत काय असें भासे. या भूप्रदेशाचे जागजागीं अनेक भाग करणारे, वर्षाकाळीं तापी मातेस भेटावयास जाण्याकरितां पर्वतांगांवरून उड्या टाकीत येतांना आपल्या बरोबर हत्तींच्या अंगासारख्या महाप्रस्तरांस सहज लीलेनें ओढीत आणणारे, प्रायः सर्व जलौघ कोरडे ठणठणीत पडले होते! पावसाळ्यांत ज्यांत पुरुष दोन पुरुष पाणी सतत असावयाचें, व अनेक प्रकारच्या वृक्षवल्लींनीं व सुंदर पुष्पांनीं झांकले असल्यामुळें ज्यांमध्यें नाना जातींच्या पक्ष्यांचें वास्तव्य असावयाचें, असें सर्व लहानमोठे जलाशय, डबकणीं व नाले-ओढे, यांत एका मुंगीचीही तहान भागेल एवढीही आर्द्रता उरलेली दिसत नव्हती!

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हातांत धरण्याच्या काठीपुरतेंही लांकूड मिळण्याची मारामार, असे मोठमोठे शिरीष वृक्ष कांहीं ठिकाणीं उभेच्या उभे जळत व कांहीं ठिकाणीं मार्गांत आडवे असल्यामुळें तोडून टाकिलेले आढळत होते! कोठें कोठें पंचवीस पंचवीस तीस तीस वर्षांच्या वयाचे खैर, जणू कात पुरविण्याचा मक्ता घेण्याकरितांच उभे आहेतसे दिसत होते. कोठें कोठें अतिशय उंच व विस्तृत असे मोहाचे वृक्ष, या ऋतूंत एवढ्या मोठ्या जंगलांत क्वचित् एकादे जागीं आढळणारी छाया पसरून राहिले होते. पिंवळ्या फुलांचे झुबक्यांनीं शोभायमान दिसणारे बाहावे, भूमीवर कफनाशक फळांचा सडा घातलेले बेहडे, व बुंधाशीं रंगदार फुलांची बिछायत घातलेले पळस वारंवार भेटत होते. अर्जुन, सादडा, धावडा, हळदखा, इत्यादि वृक्ष तर या जंगलांत कोणास घर बांधणें झाल्यास आम्ही,तुळया, लगा इत्यादि इमारती लांकडांची वाण पडूं देणार नाहीं, असें आश्वासन देण्यासच जागजागीं उभे होते! जुन्या धर्मकल्पना जागृत असलेल्या भोळ्याभाविकांचें समाधान करण्याकरितां बेल, उंवर, शमी, वड, पिंपळ इत्यादि पुराणपूज्य वृक्ष, ठायीं ठायीं होते! शिवण, तणस, ऐण, धामण, कळंव, पिंपरी, लिंव, इत्यादि वृक्षही ठिकठिकाणीं—परंतु प्रायः ओढ्यांचे काठीं—दिसत होते. कोठें लिंबावर पिंपळाचें बांडगूळ वाढलेलें दिसे, तर कोठें तीन चार जातींच्या वृक्षांचीं खोडें एकरूप होऊन गेलेलीं आढळत; कोठें वृक्षांच्या शाखांवरून लोंबकळ्या घेत जमीनीकडे येणाऱ्या, तर कोठें त्यांस कवटाळीत बुंधापासून वर चढणाऱ्या व त्यांचे अवयवांस झांकून टाकणाऱ्या लतावेली दिसत! याप्रमाणें या अरण्यांतील नाना जातींचें व अनेकविध स्थितींतले वृक्ष प्रत्यक्ष नजरेस पडल्यामुळें, अशा अरण्याचीं सुकवींनीं केलेलीं वर्णनें केवळ काल्पनिक व अतिशयोक्तिपूर्ण नसतील असें वाटलें, व अनेक प्रकारच्या वृक्षवनस्पतींची अशी गर्दी केवळ कवीच्या काल्पनिक अरण्यांत मात्र असूं शकेल—म्हणजे एक समयावच्छेदें-करून दिसूं शकेल, असा जो ग्रह मनावर उमटला होता तो या वनसंचारानें समूळ नाहींसा झाला व मन कांहींसें बावरल्यासारखेंही झालें!”

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तापीकांठावर बसून पाहिलेला प्रातःकाल:—

"पूर्वदिशा हळूं हळूं सुप्रकाशित होऊं लागली. उजेड जसजसा वाढत गेला, त्या मानानें पक्ष्यांची किलबिलही अधिकाधिक मोठ्यानें ऐकूं येऊं लागली. आतांपर्यंत ते बसल्या फांदीवरूनच शब्द करीत होते, पण जसें अधिकाधिक दिसूं लागलें, त्या मानानें ते त्याच वृक्षाच्या अथवा वल्लीच्या या फांदीवरून त्या फांदीवर व त्या फांदीवरून या फांदीवर असे उडूं बागडूं लागले. आतांपर्यंत वृक्ष-वनस्पती यांचे जागीं कांहीं काळ्या आकृती मात्र दिसत होत्या, पण आतां प्रभा फांकूं लागली, त्या मानानें हळूं हळूं मोठ्या वृक्षांच्या फांद्या, फांद्यांस फुटलेल्या लहान फांद्या, त्यांस फुटलेलीं पानें व फुलें इत्यादि अवयव क्रमाक्रमानें अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागले व सृष्टी जणूं आतांच निर्माण होत आहे कीं काय, अशीही कल्पना मनांत आल्यावांचून राहिली नाहीं! एकादा चित्रकार एकाद्या चित्रपटावर आकाश, वृक्ष वनस्पती, नद्या, पर्वत इत्यादिकांच्या बाह्य रूपरेषा प्रथम एकदां भराभर रेखाटतो, व मग त्या चित्रांत दाखविलेल्या वस्तूंचे बारीक भाग स्वस्थपणें कोरीत व रंगवीत बसतो, त्याप्रमाणें रात्रीं पसरलेल्या काळ्या पटावर प्रथमदर्शनीं आसपासचे डोंगर, खडक, नदीचे तट व त्यांवरील उंच उंच व महान् वृक्ष यांच्या अस्पष्ट आकृती प्रथम दिसूं लागल्या, व प्रकाश हळू हळू वाढत गेला, त्या मानानें त्या प्रत्येकाचे सूक्ष्म भाग व रेखीव कडा क्रमाक्रमानें सुव्यक्त होऊं लागल्या. पूर्वीं सर्वत्र जेथें एकच काळा रंग दिसत होता, त्याचे जागीं आतां कोठें हिरवा, कोठें तांबडा, कोठें भगवा कोठें पिंवळा असे निरनिराळे रंग व त्या प्रत्येकाच्या पोटच्या व प्रत्येकाचा दुसऱ्यांशीं संयोग होऊन झालेल्या अनेक छटा दिसूं लागल्या! हे रंग मूळचे त्या पदार्थांचे अंगीं असतात, अथवा ते सूर्याचे किरणांत गुप्त असून पदार्थांच्या संसर्गानें मात्र प्रकट होतात, हें कांहींच कळेना. एकादा गारोडी आपले समक्ष आंब्याची कोय पुरून अल्पकालांत तिचें झाड करून व त्यास आंबे आणून दाखवितो, व एकसारखें आपलें ढोलकें पिटून स्वतांची तारीफ करीत असतो, तेव्हां तो आरंभीं या खेळांवर पांघरूण घालून त्याची सर्व क्रिया आपणांस पाहूं व कळूं देत नाहीं, व हा सर्व तमाशा नजरबंदीचा आहे असें आपण सम-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जतों व म्हणतों, तरी त्यामुळें अतिशय चकित होऊन जातों व त्याची प्रशंसा करीत सुटतों; परंतु सृष्ट्युत्पत्तिस्थितिनाशाचा अतिशय मनोरंजक खेळ करणारा गारोडी, खेळावर पांघरूण न घालतां त्यांतील सर्व सूक्ष्मासूक्ष्म क्रिया, आरंभापासून अंतापर्यंत, प्रत्यहीं आपले समक्ष करीत असतो, इतकेंच नाहीं, तर त्या आपणांस चांगल्या समजाव्या व दिसाव्या, म्हणून आपल्यास बुद्धी व दृष्टी देत असतांही आपण तो लक्षपूर्वक पाहात नाहीं, एवढेंच नव्हे, तर तो करणारा आपलें ढोलकें आपणच वाजवीत सुटत नाहीं, या त्याच्या थोरवीमुळें त्याची खरी थोरवी आपण जाणत नाहीं, व त्याची प्रशंसा तर राहो, पण नित्य स्मरण करण्यास ही कसे चुकतों हे विचार यावेळीं मनांत आले! गारोड्याच्या खेळांत कोयीचें झाड त्यानें हात-चलाखीनें कसें करून दाखविलें एवढेंच ओळखण्याचें असतें; पण मी पाहात होतों अशा प्रसंगीं ह्या अनंत वृक्षवल्ली, हे पक्षी, हे अत्युच्च डोंगर, हा अगाध व अस्खलित वहाणारा जलप्रवाह, एकंदरींत ही अगाध सृष्टी, कशी व केव्हां निर्माण झाली व हीस उत्पन्न-व्यक्त करणारा कोण, केवढा, कसा, कोठें असेल व तो कसा प्रतीत होईल, हेच विचार मनांत घोळूं लागले व मनही गोंधळून गेलें!

"आणखी पांच दहा मिनिटें अशींच गेलीं. पक्षी आपापल्या चाऱ्याच्या शोधार्थ कांहीं थवेच्या थवे करून, कांहीं एकाकी, कांहीं जोडप्यांनीं उडून जाऊं लागले. प्रातःकाळच्या वाऱ्याच्या झुळुकांनीं झाडांच्या खांद्या हललेल्या दिसत. त्यांवरून त्यांत चैतन्य गोचर झालें, किंवा त्यांस जणूं धुगधुगी येऊं लागली असा भास होई. क्रमाक्रमानें पूर्व दिशेचा रक्तिमा कमी होत जाऊन ती ज्यास्त उजळली. क्षितिजाकडे रक्तवर्ण व विशाल सूर्यबिंब दिसूं लागलें आणखी थोड्या वेळानें त्याचाही रक्तिमा व आकार हीं कमी होत जाऊन, त्यांत पिंवळेपणा मिसळूं लागला. पिंवळ्या रेशमाच्या धाग्यासारखा किंवा सुवर्णाच्या बारीक तारांसारख्या अनंत पीतवर्ण किरणरूप तंतूंचें जाळें सृष्टीवर पसरलेलें आहे कीं काय, अथवा रात्रीं सृष्टीस आलेली मलिनता, किरणरूप सोन्याच्या तारांच्या कुंचल्यानें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कुंचलून काढून टाकून उजळाच दिला जात आहे कीं काय, अथवा सूर्य-बिंबापासून निघणारे किरण, हे सूर्यरूप हजाऱ्यांतून गळणाऱ्या सुवर्ण-जलाच्या धारा अथवा चिळकांड्याच उडत असून, त्यांनीं तमोरूप मळ धुतला जात आहे कीं काय, असा भास झाला. सुवर्णाभिषेक झाल्यानंतर सृष्टिदेवी रात्रीं परिधान केलेल्या कृष्णवस्त्राचा त्याग करून पिंवळ्या रंगाचें तकतकीत व झिरझिरीत पातळ नेसल्यासारखी दिसूं लागली. व ती तापीचे पात्रांत प्रतिबिंबित झालेली पाहून जशी कांहीं वेणीफणी करून व पिंवळा शालू नेसून आपलें प्रसन्न मुख या महानदीचा विस्तृत जलौघ, हाच कोणी आदर्श, त्यांत पाहात आहे कीं काय, अशी उत्प्रेक्षा मनांत आली ! ”

तापीतटाकींचें सूर्यास्ताचें वर्णनः---

“ह्या वेळ सूर्यास्ताचा असल्यामुळें दिवाचारी प्राण्यांची गजबज कमी होत चालली होती. वाळवंटावरील एका डबकणाजवळ वसलेल्या बद-कांच्या एका जोडप्याशिवाय दोन्ही कांठांवर कोणी चिट्टपाखरूंही दिसत नव्हतें. अशा सायंकाळच्या वेळीं अशा घोर अरण्यांतून अगदीं शांतपणें वाहणाऱ्या तापीच्या विस्तीर्ण जलौघाकडे नुस्तें पाहिल्यानें मनां-तील भगभग बहुतेक नाहींशी होऊन त्यास शांति आली, पण तीब-रोबरच तींत निमज्जन करण्याविषयींची उत्सुकताही वाढली; व तीस रसा एकाद्या उतरणीवरून एकादी मोठी शिला गडगडत जावी, त्या-प्रमाणें कराड्यावरून झपाट्यानें उतरून धुडुमदिशीं तापीचे पात्रांत जाऊन पडलों ! या ठिकाणीं तापीचें पात्र नेहमीं नितकें खोल व वि-स्तृत असावयाचें, त्या मानानें पाहिलें तर या सालीं अनावृष्टीमुळें तें संकुचित व उथळ झालें होतें, आणि त्यांतील पाणी स्वच्छ व शंखेंदु-कुंदोज्ज्वल असल्यामुळें खालचा तळ स्वच्छ दिसत होता. जलप्रवेश केल्यानंतर शेंपन्नास हातपर्यंत इकडे तिकडे फिरून सरासरी कमेरइतकें खोल पाणी असलेलें एक स्थळ शोधून काढलें. दहा पंधरा मिनिटें तेथें स्वस्थ डुंबत बसून शरीरतापाचा निःशेष परिहार झाल्यावर बाहेर येऊन, अंग पुसून व कोरडें नेसून, विश्रांतीकरितां म्हणून एका तुंग शिलोत्संगा-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वर बसलों; तों समोरच सकाळपासून आतांपर्यंत त्रिभुवनांतील सर्व व्यापार चालवितां चालवितां भागल्यामुळेंच कीं काय, थकलेल्या व शिथिलगात्र झालेल्या सूर्यनारायणाचें दीर्घ, पण तेजोहीन झालेलें बिंब दिसलें ! त्या सभोंवारचा नभःप्रदेश संध्यावर्णयुक्त झाला होता, व त्यासह तें तापीच्या पात्रांत प्रतिबिंबित झालें होतें, यावरून सूर्याचे रथवेगानें त्याचे आंगावर व आसमंतात् जंगलांतील डोंगरी तांबडी माती उडाली असून, तीं धुऊन टाकण्याकरितां व श्रमपरिहाराकरितां तो तापीनदींत स्नानार्थच उतरला आहे कीं काय, अशी कल्पना मनांत आली ! यानंतर कांहीं वेळानें प्रतिक्षणीं मंदतेज होत होत, हळू हळू मावळत जाणारें व आकाशांगणासुद्धां तापीचे पात्रांत प्रतिबिंबित झालेलें सूर्यबिंब, एकसारखें पाहातांना, घरीं असतां ग्रहणाचे दिवशीं ताम्हनांत पाणी घेऊन त्यांत बिंबलेल्या सूर्याकडे पाहून, ग्रहण लागलें किंवा नाहीं, ग्रास किती झाला व तें सुटलें किंवा नाहीं, हें पाहाण्याच्या लहानपणच्या—केवळ लहानपणाच्याच नव्हे, तर ह्या वयांतल्याही—गमतीच्या खेळाचें, किंवा खरें ह्मटलें तर, प्रयोगाचें स्मरण झालें, व दहा पंधरा मिनिटें मोठी करमणूक झाली; पण लवकरच हें बिंब पश्चिमेकडील डोंगराचे मागें बुडल्यामुळें दिसेनासें झालें व शरीरांतील आत्मा गेल्यानंतर जड शरीर जसें काळवंडून व भेसूर होऊन पडतें तसा, त्याच्या पुढचा विशाळ काळा पर्वतदेह मात्र नदींत अस्पष्ट रितीनें प्रतिबिंबित झालेला पाहून, दृष्टी तेथून फिरली व वर आकाशाकडे गेली."

"या सुमारास आकाशमंडळांत हळू हळू तारका गोचर होऊं लागल्या होत्या. या खरोखरीच्या तारा आहेत अथवा तापीच्या एकंदर जलप्रवाहांत वहावत असलेल्या व प्रतिक्षणीं उद्भूत व नष्ट होणाऱ्या कोट्यवधि बुद्बुदांप्रमाणें आकाशसागरांत हे बुद्बुदच आहेत; हे असंख्यात बुद्बुद व तशाच या अगणित तारका कोणाच्या इच्छामात्रेंकरून, कांहीं निमित्तानें उत्पन्न झाल्या असतील, अथवा हें सर्व अफाट विश्व आपोआपच घडलें गेलें असेल; अनंतपार अशा विश्वांत अनंत अशा काळाचा ओघ, तापीच्या अमोघ व अखंड जलौघाप्रमाणें सतत वहात राहील, किंवा त्यासही कांहीं अंत असेल; तापीच्या पोटीं असलेल्या मत्स्यांपैकीं कांहीं तळपत असतांना मात्र त्यांचीं पोटें चमकल्यामुळें त्यांचें अस्तित्व जसें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आपणांस प्रतीत होतें,पण त्यांखेरीज किती लक्षपट तरी मत्स्य व इतर अनंत अणोरणीयान् व महतोमहियान् जीव तिचे उदरीं असतात, त्याप्रमाणेंच नमो-मडळांत आपणास दिसतात येवढ्याच तारका व ग्रहगोल असतील अथवा आणखी अगणित असतील, व असतील तर त्यांचा उपयोग काय, त्यांची घटना कशी असेल, त्यांत व आपल्यांत अंतर किती असेल, अशा प्रकारचे विचार करीत तेथें कांहीं वेळ बसलों. मग सावकाश सावकाश कराडा चढून वर येऊन कांहीं उपहार करितों, तों ७॥–८ वाजले ! ”

हे जे उदात्तरसाच्या उदाहरणांचे उतारे दिले आहेत, हे रा० चिप-ळूणकर यांच्या ‘ मृगयाकुतूहल ’ या पुस्तकांतील आहेत. हें केवळ कल्पनामय वर्णन नसून वर्णिलेली सृष्टिशोभा ग्रंथकार यांनीं प्रत्यक्ष पाहून वर्णिली आहे. यामुळें ते विशेष चांगले आहेत. जुने मराठी कवी अमृतराय, मुक्तेश्वर, श्रीधर यांनीं अनेक ठिकाणीं उदात्त वर्णनें केलीं आहेत; पण तीं केवळ कल्पनामय आहेत. आधुनिक मराठी कवीं-पैकीं कित्येकांनीं प्रत्यक्ष सृष्ट्यवलोकन करून कांहीं वर्णनें लिहिलीं आहेत.

हें स्वभावोक्तीचें वर्णन झालें. हें जरी अगदीं स्वाभाविक असें वर्णन असतें, तरी तें खुबीदार, सरस आणि रंजविणारें असलें म्हणजे त्यास **स्वभावोक्ति** असें अलंकाराचें नांव देण्यास चिंता नाहीं असें मागें सांगण्यांत आलेंच आहे.

दुसरा बोलण्याचा प्रकार **वक्रोक्ति** किंवा **वक्रोक्त**. वक्रोक्ताचे ‘ **पर्यायोक्त** ’ ‘ **समासोक्त** ’ आणि ‘ **अतिशयोक्त** ’ असे तीन भेद होतात.

> “ केलेंचि धन्य दर्शनदानें येऊनि कानना मातें;
> आजि देवेश ! निवावे बहु हे सेवूनि कान नामातें. ” मोरो०

उजू व सरळ वर्णन न करितां पर्यायानें वर्णन करणें, हें पर्यायोक्ताच लक्षण. ‘ सूर्य उगवला ’ असें न म्हणतां ‘ त्रिभुवनास प्रकाश देणारा उगवला ’ असें म्हटलें कीं पर्यायोक्त झालें. ‘ आपलें रूप पाहिलें, आतां नांव ऐकूं द्या’ हें संक्षिप्त तत्त्व, सावित्री यमास वरील आर्येंतील पर्यायो-क्ताच्या द्वारें कळवीत आहे. ‘ गंगा ’ असें न म्हणतां ‘ जें पाप, ताप

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वारी वारी, विश्वेश्वरासही तर्पी ' असें म्हटलें म्हणजे सुरेख पर्यायोक्त झालें. ' शिव ' असें न म्हणतां ' ज्यानें विलया नेली स्मरतनु ' असें म्हटलें म्हणजे शुद्ध पर्यायोक्त झालें. ' ज्यानें विलया नेली स्मरतनु ' यास ' जाशि दीपकप्रभा वातें ' हें जोडल्यास, पर्यायोक्तास उपमा मिळाली आणि दुधांत साखर पडली. ' विष्णू ' किंवा ' कृष्ण ' असें न म्हणतां ' ज्याच्या सुलीन भव चरणीं ' असें म्हटल्यास, शुद्ध पर्यायोक्त. ' अभिमन्यू ' न म्हणतां ' सरोजनाभाचा भाचा ' म्हणणें हा पर्यायोक्ताचाच प्रकार.

" मातेचें मन असतां संसारीं सुत उदास कळकळतें,
गंगेच्या वात्सल्यावरुनि असें मज बुधा सकळ कळतें. " मोरो०

ही भीष्मोक्तीही पर्यायोक्ताचाच प्रकार. ' संसारीं उदास होऊन आपल्या आईस वाईट वाटेल असें न वागणें ' असें सरळ न सांगतां भीष्म साक्षात् आपलें व आपल्या आईचें उदाहरण देऊन ' पर्याया'नें धर्मास कळवीत आहे. इतकेंच कीं या पर्यायोक्तांत अर्थांतरन्यासाची थोडी छटा मारत आहे.

अप्रस्तुत म्हणजे डोळ्यांसमोर नसलेल्या वृत्ताचें वर्णन करून त्या वर्णनाच्या योगानें प्रस्तुत म्हणजे आपल्या पुढें असलेल्या वृत्ताचा बोध करून देणें, हा ' पर्यायोक्ता 'चा दुसरा प्रकार. यास ' अन्योक्ति ' किंवा ' अप्रस्तुत-प्रशंसा ' असें म्हणतात.

" मधुपासि बहु प्रिय जो आत्मप्राणव्रजासम स्तबक,
सकलरसिकप्रिया त्या न ढुंकोनिहि पाहती समस्त बक. "
" ती सुमति म्हणे—' ताता, न त्यजुनि पयोधिला नदी परते,
न पतंगचित्तवृत्ति क्षणही रत्नीं त्यजूनि दीप रते,' "
" शशमंडळींत कोल्हा म्हणतो—' मी सिंह '—वल्गना करितो,
जोंवरि न पाहिला गजमुक्तफलकवलभक्षिता हरि तो. " मोरो०

' रामास प्रिय झालेला अंगद शिष्टाई करण्यासाठीं येऊन उपदेश करीत होता तो राक्षसांस आवडला नाहीं ' या प्रस्तुत वृत्ताचा बोध ' मधुप, स्तबक, बक ' या तीन अप्रस्तुत पदार्थांचें वर्णन पाहिल्या आर्येंत करून कवीनें केला आहे. ' सत्यवानास तूं वरूं नकोस, दुसऱ्या

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कोणास वर ' असें बाप म्हणूं लागला, तेव्हां सावित्रीनें दिलेला जबाब दुसऱ्या आर्येंत आहे. ' पयोधि ' व ' दीप ' या दोन अप्रस्तुत पदार्थांपासून सत्यवानाचा बोध होऊन, ' नदी ' व ' पतंगचित्तवृत्ती ' या पदार्थांपासून सावित्रीचा बोध होतो, आणि ' रत्न ' या अप्रस्तुत पदार्थापासून प्रस्तुत अशा दुसऱ्या वराचा बोध होतो. तिसऱ्या आर्येंत शल्याच्या म्हणण्याप्रमाणें ' शश ' म्हणजे कौरव, 'कोल्हा' म्हणजे कर्ण, आणि ' सिंह ' म्हणजे अर्जुन.

' पर्यायोक्त 'चा आणखी तिसराही प्रकार आहे, त्यास ' अर्थांतरन्यास ' म्हणतात. विशिष्ट गोष्ट दाखल करून, तीस बळकटी आणण्यासाठीं म्हणून उदाहरणाप्रमाणें सामान्यही दाखल केलें म्हणजे ' अर्थांतरन्यास ' झाला.

" वदुनि असें, मान्य करी धर्मवचन सबहुमान सत्वर तें;
गुरुकार्यासचि कविचें, निजकार्यी न बहु मानस त्वरतें. " मोरो०

सात्यकीनें धर्माच्या वचनास मान दिला तें ठीकच केलें, हें ' स्वकार्यास बाजूस ठेवून चांगले लोक वयोवृद्धांचें कार्य पहिल्यानें करितात. ' असा सामान्य नियम दाखल करून कवी वाचकास पर्यायानें कळवीत आहे. या अलंकारांत ' झालें किंवा केलें, व्हावें किंवा करावें, तेंच ठीक, ' असें साक्षात् प्रतिपादलेलें किंवा ध्वनित केलेलें असतें.

" संरक्षिली वनीं मधु पाजुनि मातेविना शकुंतांनीं;
असतां विधिकवच, नव्हे काळाच्याही विनाश कुंतांनीं. " मोरो०

हा अर्थांतरन्यासही सुरेख आहे; इतकेंच कीं दुसऱ्याही अलंकाराची म्हणजे समासोक्तीची छटा याच्यामध्यें मारत आहे.

" तदितर खग भेणें वेगळाले पळाले,
उपवन-जल-केली जे कराया मिळाले;
स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो;
कठिण समय येतां कोण कामास येतो ? "

हा रघुनाथ पंडिताचा अर्थान्तरन्यास सुरेख साधला आहे.

' पर्यायोक्तां ' त जसा विस्तार असतो, तसा 'समासोक्तीं'त अर्थाचा 'समास' म्हणजे संक्षेप केलेला असतो. अचेतनावर चेतनासच योग्य अशा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

क्रियेचा आरोप करण्यांत येऊन, त्या आरोपाचें पर्यवसान एकाद्या रसांत झालें, म्हणजे ' **समासोक्ति** ' झाली.

" रमले मुहूर्तपरिमित निद्रेसीं, सर्व जीव विश्रमले."

" मग भगवान् विधु उगवे, पळवी देऊनि कांप तिमिरासी; " मोरो०

पहिल्या अर्धांत अचेतन निद्रेवर रममाण झाल्याचा आरोप केला आहे, तो असल्या स्थळीं स्त्रीसच योग्य आहे. या आरोपाचें पर्यवसान शृंगारांत होतें. ' निद्रा ' ही जशी काय एकादी विसावा देणारी स्त्रीच, असा निद्रेवर झालेला स्त्रीत्वाचा आरोप स्पष्ट शब्दांनीं दाखविलेला नसल्यामुळें, ही ' समासोक्ती ' झाली. ' रमणें ' या क्रियेप्रमाणें ' निद्रा ' शब्दाचें स्त्रीलिंग ही ' समासोक्ती ' ची कल्पना झटकन लक्षांत आणून देण्याच्या उपयोगीं पडत आहे. दुसऱ्या अर्धांत ' विधू ' शब्दाच्या पुल्लिं-गाचा व ' कांप देऊन पळविणें ' या क्रियेचाही तसाच उपयोग होत आहे. इतकेंच कीं या स्थळीं पर्यवसान वीररसांत आहे, शृंगार-रसांत नाहीं.

" बहु दुःख दे त्यजुनि मज, आपण वरिली तुझ्या चिता तातें. "

यांत ' चिता वरिली ' म्हणजे ' सवत केली ' असा अर्थ ध्वनित होतो; कारण ' चिता ' शब्द स्त्रीलिंगी असून ' वरण्याची क्रिया ' मुख्यत्वें-करून स्त्रीलाच उद्देशून असते. या स्थळीं पर्यवसान करुणरसांत आहे.

" धांवुनि गळांचि पडली होती जी राज्यभू, तिला भरत—
झिडकारूनि निघे कीं रामपद-प्राज्य-भूति-लाभ-रत. " मोरो०

ही समासोक्तीही मनोरम साधली आहे. इतकेंच कीं या स्थळीं पर्यवसान भक्तिरसांत असून, शृंगाररस आहे तो भक्तिरसास अधिक खमंगपणा आणणारा आहे.

" कलि, दमयंतीप्रेमा, हे दोघे वोढिती नळाला हो;
प्रेम्याला त्याचें मन सांपडलें, देह त्या खळाला हो. "

ही आर्याही समासोक्तीचेंच सुरेख उदाहरण आहे. इतकेंच कीं पर्य-वसान रसांत नाहीं. ' प्रेमा ' मोठा भाग्यशाली, कीं " मनरूपी निधान होतें तें त्याच्या हातीं लागून, देहरूपी कोरडी माती राहिली ती दुष्ट कलीस मिळाली "— असें या आर्येचें पर्यवसान आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

येथवर जे अलंकार सांगितले ते काव्याचे आत्मभूत होत. यांच्या खेरीज ग्रंथाला काव्यपणाच नाहीं. हे अगदीं स्वाभाविक उत्पन्न होतात. परंतु कवी यांच्याही पुढें मजल मारून अतिशयोक्तामध्यें आणखी सामुग्री घालितात आणि त्यास सजवितात. यामुळें अनेक अलंकार उत्पन्न होतात. हे सर्व अलंकार अतिशयोक्ताचेच भेद होत. आतांपर्यंत सांगितलेले व पुढें जे सांगावयाचे ते अलंकार नीट समजावे म्हणून प्रथमतः त्यांच्या परस्पर संबंधाचें दर्शक असें कोष्टक देतों:—



अतिशयोक्ति सजविण्यासाठीं जी सामुग्री कवी घालितात, ती उपमादि गोष्टींची किंवा कार्यकारणभावाची असते. तिच्या योगानें झालेले अनेक अलंकार संस्कृत साहित्यांत सांगितले आहेत. ते मराठी कवींनींही आपल्या काव्यांत साधले आहेत. या अलंकारांतले

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काहीं निवडक अलंकार येथें सांगतों. हे सर्व अतिशयोक्तीचेच भिन्न प्रकार होत हें वर सांगितलेंच आहे.

या सृष्टीमध्यें निरनिराळ्या पदार्थांमध्यें नाना तऱ्हेचें साधर्म्य म्हणजे सादृश्य दिसून येतें. त्या साधर्म्याचा उपयोग करून कवी आपल्या वर्णनास शोभा आणितात. पुष्कळदां कोणास एकादी साधी गोष्ट सांगितली, तर तितकी पटत नाहीं. पण अमुक अमक्यासारखें आहे असें सांगितलें असतां अधिक चांगलें पटतें. यामुळें कवी सादृश्य सांगूं पाहातात. तसेंच कोणाला एकादी गोष्ट सांगितली असतां तत्संबंधाचा कार्यकारणभाव सांगितल्यानें ती मनांत चांगली ठसते. या कारणानें कवी कार्यकारणभावही सांगतात. या गोष्टी कवी वर्णन करितांना आपल्या भाषेमध्यें सहज व कुशलतेनें गोंवून देतात. यामुळें काव्यरसाचा स्वाद जास्तच चढतो असें म्हटलें असतां चालेल.

उपमेचे अलंकार.

'तोंड उजळ आहे,' असें म्हटलें असतां अगदीं साधी गोष्ट सांगितली. परंतु 'तोंड चंद्रासारखें उजळ आहे' असें म्हटलें कीं, सांगण्यांत गोडी जास्त आली आणि ऐकणाराची अधिक चांगली समजूत पडली. तोंड उजळ असतें. पण तें वास्तविक पाहिलें असतां चंद्रासारखें उजळ कसें असेल? ही खरोखरी पाहतां अतिशयोक्ति झाली. परंतु कवीस आणि श्रोत्यास तसें कांहीं वाटत नाहीं, तर उलट अधिक चांगलें वर्णन झालें असें वाटतें! पदार्थां पदार्थांमध्यें सृष्टींत स्वभावतः आढळणारें जें साधर्म्य, तें अतिशयोक्तीचा पाया होय; आणि त्याच्यावर अलंकारांची इमारत उभारलेली असते.

अगदीं साधें असें जें साधर्म्य त्याला उपमा असें म्हणतात. हें साधर्म्य, अधिकाधिक अतिशयोक्तीनें वर्णिलें असतां वर्णन जास्त जास्त अलंकृत होतें. या योगानें अतिशयोक्ति वाढते. पण ऐकणारास तसें कांहीं न वाटतां उलट जास्तच मौज वाटते. उपमा पायरी पायरीनें चढवीत नेऊन अलंकार कसे करितात हें पाहा:—

श्रीरामचंद्राचें मुख चंद्रासारखें
सुंदर आहे. } — उपमा (१)

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीरामचंद्राचें मुख इतकें सुंदर आहे कीं जणूं काय चंद्रच.	— उत्प्रेक्षा (२)
श्रीरामचंद्राच्या मुखाचें सौंदर्य पाहून असा संदेह उत्पन्न होतो, म्हणजे शंका वाटते, कीं हा चंद्र आहे कीं काय?	— संदेह (३)
श्रीरामचंद्राच्या मुखाचें सौंदर्य पाहून असें वाटतें कीं हें मुख नव्हे तर चंद्र आहे.	— अपन्हुति (४)
श्रीरामचंद्राचा मुखचंद्र पाहून कौशल्येस फार आनंद झाला.	— रूपक (५)
श्रीरामाचें मुख इतकं सुंदर होतें कीं त्याला दुरून येतांना पाहून 'अहो, हा चंद्रच उगवला काय !' असें लोक म्हणूं लागले.	— रूपकातिशयोक्ति (६)
श्रीरामचंद्राचें मुख असें सुंदर आहे कीं त्याच्या सारखें सुंदर तेंच. [त्याला दुसरी कशाची उपमा साजावयाची नाहीं.]	— अनन्वय (७)
श्रीरामचंद्राचे मुखाला पूर्णचंद्राची उपमा शोभली असती; पण चंद्रावर कलंक आहे, तेथें उपाय नाहीं. [येथें मुखाची चंद्रापेक्षां श्रेष्ठता वर्णन केली.]	— व्यतिरेक (८)

हे सर्व उपमेचेच चढत्या पायरीचे प्रकार आहेत. यांत पहिल्या प्रकारांत केवळ साधें साधर्म्य सांगून, पुढें तें साधर्म्य अतिशयोक्तीनें एकेक पायरी चढवीत चढवीत, शेवटच्या प्रकारांत साधर्म्याची मर्यादा उल्लंघन करून, मुखास ज्या चंद्राची प्रथमतः उपमा दिली होती, तो सौंदर्यांत कनिष्ठ, पण मुख श्रेष्ठ, असें वर्णिले आहे.

आतां हे उपमेचे निरनिराळे प्रकार त्यांच्या लक्षणांसह, जास्त उदाहरणें सांगून विशेष स्पष्ट रितीनें सांगतों.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१–उपमा—अगदीं साध्या साधर्म्यास उपमा असें म्हणतात, असें मागें सांगितलेंच आहे. ‘ तोंड हें चंद्रासारखें सुंदर आहे ’ यांत तोंडास चंद्राची उपमा दिली आहे. येथें ‘ तोंड ’ यास उपमेय व ‘ चंद्र ’ यास उपमान असें म्हणावयाचें. ज्यास उपमा द्यावयाची तें उपमेय आणि ज्याची उपमा द्यावयाची तें उपमान. तसेंच, या वाक्यांत ‘ सुंदरपणा ’ हें साधर्म्य आहे आणि ‘ सारखें ’ हा उपमादर्शक शब्द आहे. उपमा नीट चांगली होण्यास वाक्यामध्यें उपमेय, उपमान, साधर्म्यदर्शक शब्द आणि उपमादर्शक शब्द, या चार गोष्टी असल्या पाहिजेत हें उघडच आहे. उपमेचीं कित्येक उदाहरणें:-

(१) ‘त्याचे ते अमृतासारखे मधुर बोल ऐकून सर्व सभा तृप्त झाली.’

(२) ‘ तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें झालीं रणांत शुष्क रसें,
शोभे विजयोत्साहें अभिमन्युमुख प्रफुल्ल पुष्करसें. ’[1]

मोरोपंत.

(३) ‘ गाल टेंकुनी हस्ततलावरी जी चिंतातुर बैसे,
अलक लोंबती मुखावरी तैं कमलीं मधुकर जैसे[2]. ’

चिपळूणकरकृत मेघदूत.

(४) ‘ ऐसें सती वदे, तो बोल शशी, देव तोहि सागरसा—
प्रेमें उचंबळे हो, धारि कारुण्यें द्रवासि साग रसा[3]. ’

मोरो.

(४) ‘ तें सत्यलोकतुल्याचि आश्रमपद, ज्यांत अण्वघ न साच;
तेथील तापस शिखी-चातकसे, त्यांत कण्व घनसा चें[4]. ’

मोरोपंत.

(५) ‘ जो धैर्यें धरसा, सहस्रकरसा तेजें, तमा दूरसा,
जो रत्नाकरसा गभीर, शिरसा भूपां, यशोहारसा;
ज्ञाता जो सरसावला नवरसांमाझारि शृंगारसा,
शोभे तामरसाक्ष तो नळ रसानाथ स्तवूं फारसा[5]. ’

रघुनाथ पंडित.

---

१. हें संजयानें धृतराष्ट्रास युद्धकथा सांगतांना म्हटलें आहे. २. यक्षानें केलेलें आपल्या विरही पत्नीचें वर्णन. ३. सावित्रीचें बोलणें ऐकून यमधर्माची काय स्थिति झाली तिचें वर्णन. ४. हें कण्वाश्रमाचें वर्णन आहे. अण्वघ–अणु-अघ–थोडंही पाप. शिखी–मोर. ५ हें नळराजाच वर्णन आहे. शिरसा–श्रेष्ठ. यशोहार–यश हेंच आहे हार म्ह० अलंकार ज्याचा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

उपमा हा अलंकार सर्व अलंकारांचा जीवात्मा असल्यामुळें त्याचें संस्कृत अलंकारशास्त्रांत फारच विवरण केलें आहे, आणि त्याचे नानाप्रकारचे भेद व उपभेद वर्णिले आहेत. असलें विवरण कोणतीही गोष्ट मनांत चांगली ठसण्यास फार उपयोगीं पडतें. आपणास तूर्त अशा प्रकारच्या विस्तृत विवरणाची गरज नाहीं. तथापि उपमेचे कित्येक मनोरंजक प्रकार येथें सांगूं

पूर्णोपमा—उपमा होण्यास जरूरीच्या अशा ज्या चार गोष्टी वर सांगितल्या, त्या वर्णनामध्यें असल्या म्हणजे ती **पूर्णोपमा.** पूर्णोपमेचीं निराळीं उदाहरण देण्याची गरज दिसत नाहीं. वर जीं उपमेचीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांमध्यें आणि आणखी उदाहरणें येतील त्यांमध्यें उपमानोपमेयादि प्रकार कोणते आहेत हें विद्यार्थ्यांनीं लक्षपूर्वक पाहावें, म्हणजे उपमालंकार चांगला लक्षांत राहील.

लुप्तोपमा—हे जे चार प्रकार यांतील एक किंवा अधिक यांचा वाक्यांत पूर्ण उल्लेख नसला म्हणजे लुप्तोपमा म्हणतात. उदाहरणार्थ वरील चौथी आर्या, यांतील

‘ तेथील तापस शिखी-चातकसे, त्यांत कण्व घनसा च. ’

या आर्यार्धांत उपमेय, उपमान व उपमावाचक शब्द या गोष्टी आहेत; पण साधारणधर्म गुप्त आहे. कण्व मेघासारखा कां, तर विद्या देणारा म्हणून; आणि तापस मोर आणि चातक यांसारखे कां, तर ते विद्यार्थी म्हणून तसेंच—

‘ व्यूहीं गमे सुभद्रासुत गजयूथांत जेंवि बाल हरी;
त्यावरि पडल्या सेना, त्या मंथाद्रिवरि जेंवि वा लहरी. ’

यांतही साधारणधर्म लुप्त आहे.

‘ दुर्योधन, दुःशासन, कर्ण, कृप, द्रोण, भीष्म ज्या कटकीं,
त्यांत मरेनाचि शिरतां; कांख्यावरि घालितां चिरे पट कीं. ’[1]

मोरोपंत.

यांत उपमाप्रतिपादक शब्द लुप्त आहे.

---

१. उत्तर हा बृहन्नडेला सारथी करून कौरवसैन्यावर चालून गेला असतां सैन्य पाहून घाबरला आणि म्हणत आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

' भीम म्हणे कुंतीला, ब्राह्मण-समुदाय रडति कां, पूस;
त्यांचें दुःख हराया अग्नीला भार काय कापूस. '

मोरोपंत.

' अग्नीला जसा कापसाचा भार होत नाहीं, त्याप्रमाणें आम्हांस यांचें दुःख हरण करणेंही कठीण नाहीं ' असें भीम म्हणतो. या उपमेमध्येंही जरूरीच्या चारी गोष्टी उक्त नाहींत. पूर्णोपमा आणि लुप्तोपमा यांचीं आणखी अनेक उदाहरणें सहज वाचतांना आढळतील. आतां फक्त उपमेचे कित्येक चमत्कारिक प्रकार सांगतों.

प्रतिवस्तूपमा—जेथें 'सारखें' इत्यादि उपमादर्शक शब्द न घालितां वस्तूचें साम्य केवळ प्रतिवस्तूनें किंवा उपमानानें दाखविलें असतें, अथवा जेथें उपमान वाक्यांत व उपमेय वाक्यांत एकाच साधर्म्याचें कथन शब्दभेदानें (क्वचित् त्याच शब्दांनें) केलें असतें, तेथें प्रतिवस्तूपमा होते. उदाहरणें:—

(१) ' त्या त्या क्रीडेंत मुलें भीमापासून पावती भंग;
सन्माणिक्यमणिपुढें गोमेदाचा फिका पडे रंग. '

(२) ' नररत्न तोचि, तूंचि स्त्रीरत्न, उदंड आडनांवांचीं;
न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि आड-नांवांचीं. '

(३) ' होईल जा धर्म म्हणे, परि करि अनुगमन नबहुमान सती,
कीं जी हंसी हंसावांचुनि मानील न बहु मानस ती. '

मोरो०

या आर्यांतील प्रतिवस्तूपमा स्पष्टच कळून येणार आहेत.

वाक्योपमा—केव्हां दोन निरनिराळीं वाक्यें उपमावाचक शब्दानें जोडलेलीं असतात; आणि दोन वाक्यांपैकीं एक उपमानवाक्य व दुसरें उपमेयवाक्य असतें. अशा उपमेला वाक्योपमा असें नांव देतात.

(१) " ज्याप्रमाणें मदमत्त गजानें केळीचें अथवा झंझावातानें वृक्षाचें मर्दन करावें, त्याप्रमाणें कुरुगुरु द्रोणानें पांडवसैन्याचें मर्दन केलें "

१. हें भीमाचें बोलणें बकासुरवधाच्या अगोदरचें आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(२) " प्रचंड वात ज्याप्रमाणें रानें लोळवितो त्याप्रमाणें अभिमन्यूनें शेंकडों रथ धुळींत लोळविले.

(३) " जशि अब्जिनी[1] प्रमुदिता उदितार्कानें विलोकितां होती,
तशि हर्षली अयोध्या पाहुनि रघुवंशभूषणा हो ती. "

मोरो०

राम हा आयोध्येचा राजा म्हणून आयोध्या ही नायिका झाली. म्हणून या आर्येंत समासोक्तीही सुरेख आहे.

मालोपमा—एकाच उपमेयास अनेक पदार्थांची उपमा एकदम दिलेली असते, तेव्हां मालोपमा होते. उदा०—

(१) ' सौभद्र म्हणे, शिरतों व्यूहीं, डोहीं जसा मतंगज, वा—
हरिपोत दंतियूथीं, कीं दहनीं करुनियां पतंग जवा. '

(२) ' तो शर गर-धर[2]-वरसा, पविसा, रविसा, स्मरारिसायकसा,
पार्थभुजांतरिं शिरला, वल्मीकामाजि नागनायकसा. '

मोरोपंत.

(३) ' गुरुपरि उपदेश करी, संकटसमयीं उपाय ही सुचवी '
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथा पुरवी.
कांतेपरी सदोदित स्वांतातें हर्षवूनियां रिझवी,
आनंदसागरीं मन बुडवुनि चिंताज्वरासि ती विझवी. '

कृ० चिपळूणकर.

उत्प्रेक्षा—जेव्हां उपमेय हें जणूं काय उपमानच आहे असें वर्णन[3] केलेलें असतें, तेव्हां उत्प्रेक्षा होते.

[या अलंकारांत कीं, कीं काय, जणो, जाणो, जणूं, जणुं काय, जसें काय, गमे, वाटे, भासे, इत्यादि शब्द असतात.]

(१) ' या मुलांची अक्षरें जणूं काय मुक्ताफळेंच आहेत. '

---

१ कमलिनी. २ गर-धर=सर्प. ३ या दोन आर्या विद्येच्या संबंधाच्या आहेत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(२) ' भाऊस लढतांना पाहून लोकांना वाटलें कीं हा प्रत्यक्ष भारती वीर अर्जुनच आहे. '

(३) ' महाराज, आपले हे बोधाचे शब्द जसे काय अमृत-बिंदूच वाटतात. '

(४) ' प्रभुचा[1] मर्मीं हाणी सर्वांसहि तीन तीन शर भाचा;
वाटे, बहुसिंहांशीं कलह करी कुपित पोत शरभाचा. '

मोरोपंत.

भारतीय रामायणांत पंतांनीं सेतूचें वर्णन केलें आहे, त्या ठि-काणीं उत्तम प्रकारच्या उत्प्रेक्षा आहेत. तेथें कित्येक आर्यांमध्यें अपन्हुति अलंकारही आहे. या आर्या विद्यार्थ्यांनीं अवश्य वाचाव्या.

उत्प्रेक्षेचे निरनिराळ्या तऱ्हेनें भेद करतात. ज्या उत्प्रेक्षेमध्यें जाणों, वाटे, इत्यादि उत्प्रेक्षासूचक शब्द स्पष्ट असतात, ती **स्पष्टोत्प्रेक्षा**, आणि ज्या ठिकाणीं हे शब्द मानावयाचे असतात, अथवा तदर्थक दुसरे शब्द घातलेले असतात, ती **व्यंग्योत्प्रेक्षा**.

हे भेद शब्दरचनेचे आहेत. अर्थावरून उत्प्रेक्षेचें (१) स्व-रूपोत्प्रेक्षा, (२) हेतूत्प्रेक्षा आणि (३) फलोत्प्रेक्षा असे तीन भेद करितात.

(१) एकाद्या पदार्थाची अथवा क्रियेची दुसऱ्या पदार्थाशीं किंवा क्रियेशीं एकरूपता वर्णिली असते, तेथें स्वरूपोत्प्रेक्षा होते. उत्तर पुढें पळत सुटलेला असून त्याच्या पाठीं बृहन्नडा लागली आहे, याचें वर्णन पंत करितात.—

' वाटे पुढें पळे तो स्त्रीसंगविरक्तधी कुमारमणी,[2]
पुत्रस्नेहें धांवे त्यामागें शंभुची उमारमणी. '

' वृषपर्व्यासि म्हणे कवि,[3] ' मी विप्रची कीं अविप्र, मत्तनया—
पीडावी, हरिसि हंसति वाटे, सोडुनि अवि[4] प्रमत्त नया. '

१ प्रभुचा—श्रीकृष्णाचा—भाचा—अभिमन्यू. २ कार्तिकस्वामी. ३ शुक्राचार्य. ४ मेंढा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" कौसल्या मालिना, कृशा, स्वतनयाश्लेषें[1] तदा हर्पली,
आनंदाश्रु करूनि राघवशिरीं हुंगूनियां वर्षली;
पूर्वींच्यापरि विघ्न होईल असें मानूनियां क्षिप्र ती—
कोणातेंहि न पूसतां करि जणों राज्याभिषेकाप्रती. " मोरो०

येथें कौसल्येच्या डोळ्यांतून अश्रू पडले, ते अश्रू म्हणजे जणूं काय तिनें राज्याभिषेक केला असें कवि सांगतो.

अहेतूवर हेतूचा, व अफलावर फलत्वाचा आरोप केला असल्यास अनुक्रमें (२) हेतूत्प्रेक्षा आणि (३) फलोत्प्रेक्षा होतात. उदाहरणें—

" स्मरतां प्रियसुतगति रवि होउनियां म्लान सागरीं बुडतो;
उडुगण तयासि म्हणती, पडतां जलबिंदुवृंद जो उडतो. "

यांत सूर्य नित्याप्रमाणेंच अस्तास जात आहे, परंतु कवि म्हणतो कीं कर्णाची दुर्दशा झाली हें रवि निस्तेज होऊन बुडण्याचें कारण किंवा हेतु आहे.

" ही आम्रपंक्ति पवनें बहु डोलताहे,
शाखाग्रपल्लवकरें कुसुमांसि वाहे;
जाणों, स्वरोपक वसंत गृहासि आला,
तत्पूजनार्थ बहु हर्षाचि तीस झाला. "

यांत आम्रावरील मोहोर गळण्याचा हेतु वसंतावर पुष्पवृष्टि करण्याचा होता असें वर्णन आहे.

' तेव्हां धर्म खवळला, सोडी अत्युग्र बाण, तो यातें—
भेदुनि महींतहि शिरे प्याया पाताळसिंधु-तोयातें. '

वास्तविक बाण महींत शिरला तो पाताळसिंधुतोयातें पिण्याचे हेतूनें शिरला नाहीं. पण तो हेतु येथें प्रदर्शित केला आहे.

" असें बोलोनी नळें रंजवीला,
अंजुळीमाजीं हंस बैसवीला;
गमे, चंपककुसुमौघहार-झेला,
पाठवाया युवतीस सिद्ध केला. "
रघु०

---

१ आश्लेष—आलिंगन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

येथें नळानें आपल्या ओंजळींत सुवर्णवर्णी हंस बसविला; याचा परिणाम किंवा याचें फल असें झालें कीं तो जणूं काय चंपकपुष्पांचा हारच असा वाटला. म्हणून ही फलोत्प्रेक्षा होय.

केव्हां उत्प्रेक्षेमध्यें उपमेय एकच असून उपमानें अनेक असतात. तेव्हां तिला **मालोत्प्रेक्षा** असें म्हणतात. जसें—

' समरीं मत्त मतंगज, कीं दोघे व्याघ्र, कीं मृगाधिपती,
कीं वृष, कीं घन, कीं ग्रह, कीं नग, कीं अंधकं-स्मरारातीं
मोरो०

येथें लक्ष्मण आणि इंद्रजित हे युद्ध करीत असतां त्यांना अनेक उपमा दिल्या आहेत.

३. **संदेह**—केव्हां उपमेय हें उपमानच आहे असा **संदेह** म्हणजे संशय उत्पन्न होऊन किंवा भ्रांति वाटून वर्णन केलें असतें. उदाहरणार्थ ' हें तोंड चंद्रच आहे असें वाटतें;' अथवा ' हें तोंड चंद्रच आहे असें समजून चकोर त्या सभोंवतीं घिरट्या घालितात,' असें वर्णन असतें. यास संदेह असें म्हणतात. याला कोणी **भ्रांतिमान** असेंही नांव देतात. कोणी **संदेह** व **भ्रांतिमान** असे दोन निराळे अलंकार मानितात. ' हें तोंड चंद्रच आहे,' किंवा ' हें तोंड म्हणजे चंद्रच नव्हे ना ! ' अशी शंका आली हा **संदेह**. परंतु त्या शंकेवरून पुढें कृति घडली, म्हणजे ' हें तोंड चंद्रच आहे असें वाटून चकोर त्यासभोंवतीं घिरट्या घालूं लागले, ' असें वर्णन असलें म्हणजे **भ्रांतिमान**. वस्तुतः हे उत्प्रेक्षेचेच प्रकार होत. याचीं उदाहरणें:—

' चाफेकळीपरिसही सरलत्व नाकीं,
जीचा धरी अधर विद्रुमभावना कीं;
भासे मनांत मज बिंबफलभ्रमानें,
कीं सत्य चंचुपुट वोढविलें शुकानें. '
रघु. पं.

हें दमयंतीचें वर्णन आहे.

' पवैन-तपनसुत ' गमले शक्र-प्रल्हाद, राम-रावण वा,
वाटे गगनीं तच्छरसंघर्षज दहन पामरा वणवा. '

१ शिवानें मारलेला एक दैत्य. २ शंकर. ३ पोंवळें. ४ तोंडलें. ५ भीम व कर्ण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

'भीमें झुगारिली रथशक्ति प्रगटावया ठळक लीला;
अशनीच मानिली बहुजननयनांहीं नभीं झळकलीला.'
'उडुगण तयांसि म्हणती पडतां जलबिंदुवृंद जो उडतो.'
मोरो०

पुढील दोन श्लोक हे नळाची हंसाप्रत उक्ति आहे:—

'हंसा, विलोकुनि सुधाकर अष्टमीचा,
तो मानिला निटिलदेश तिचाचि साचा;
शंखद्वयीं धरुनि, कुंकुम कीरवाणी—
लावावया तिलक लांबविला स्वपाणी.'
'भृंगें विराजित नवीं अरविंदपत्रें—
पाहून, मानुन तिचींच विशाल नेत्रें,
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं—
आहा, वृथा उतरलों, भिजलों विलोकीं.'

संदेह किंवा भ्रांतिमान बहुतेक उत्प्रेक्षेप्रमाणेंच वाटतात. ही उत्प्रेक्षा आणि अपन्हुति यांच्या मधली पायरी आहे.

४. अपन्हुति—उपमेय हें उपमेय नव्हे तर उपमानच आहे असें वर्णन असतें तेव्हां अपन्हुति होते. उदाहरणार्थ, 'हें तोंड नव्हे, तर चंद्रच आहे.' उत्प्रेक्षेमध्यें नकार अथवा निषेध असला म्हणजे अपन्हुति होते. उदाहरणें:—

'न हें नभोमंडल, वारिराशी,
न तारका, फेंसचि हा तयासी;
न चंद्रमा, नावचि चालता हे,
न अंक, तो तीवर शीड आहे.'

येथें नुस्ता निषेध आहे. म्हणून ही साधी अपन्हुति आहे. पण हेतु सांगून निषेध असला, म्हणजे हेत्वपन्हुति असें म्हणतात. उदा०—

'संताप दे, यास्तव चंद्र नोहे, रवी म्हणावा तरि रात्र आहे.'

निषेध स्पष्ट नसून तो 'छलें,' 'व्याजें,' 'मिषें,' अशा शब्दांनीं सूचित असला म्हणजे मिषापन्हुति होते. उदा०—

१ लोक म्हणती; म्हणजे लोकांस तसें वाटतें. २ कपाळ. ३ खरोखर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

‘ धेनुमिषें त्या मुनिची सुतपस्यासिद्धि कोपली वाटे. ’

‘ मुनि म्हणति, त्या नृपाच्या उटजीं सिद्धि स्नुषामिषें वसती.’

‘ ‘ तो सत्यवान् म्हणे, हे पितृराज्यश्री तपोवनांत पती—
हो आपन्मुक्त म्हणुनि बहुधा आपणहि यामिषें तपती. ’

हें सावित्रीचें वर्णन आहे.

‘ कर्णानें त्या समयीं सात्यकि बहु पीडिला शरस्तोमें;
दिधले ढेंकर भेरीनादमिषें बाणपूरित व्योमें. ’

‘ हे भेरीचे प्रतिध्वनी नव्हत, तर बाणांनीं पोट भरलेल्या आकाशाचे ढेंकर होत. ’ असें वर्णन आहे.

साकी.

‘ मत्स्य उसळतां उदरें त्यांचीं चमकति वारंवार,
त्याच मिषें ती नदी तुजवरी फेंकिल कटाक्ष फार.’

मेघदूत.

अपन्हुतीचीं आणखी उदाहरणें:—

‘ सेतु न तो,—यत्पतिनें स्वसुता नेली जशी वृकें एणी,
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी. ’

‘ ते सत्य सर्प, न विशिख; कर्णहि न, तदीय सदन वारुळ तो;
कीं माणिक्यसर जयश्रीवरणीं शर गळां नवा रुळतो.’

दुर्योधनानें भरसभेंत द्रौपदीचा अपमान केला, तेव्हां कर्णानें ‘ शाबास ! ’ म्हणून त्याचे हातावर टाळी दिली. त्यावर कवि म्हणतो:—

‘ सखि-हस्तीं हस्त न, वृषें पांडवहृदयांत सायका मारी,
क्रोधातें धर्म गिळी, गरळातें जेविं काम कामारी.’

पंतांनीं शंकराच्या घरीं रती राहिली होती, तिचें वर्णन केलें आहे:—

‘ जैसें रूप, तसेंचि नाम दुसरें मायावती हें धरी;
शत्रूच्या सदनीं न पाक, तप ती पत्याप्तिसाठीं करी.’

९. रूपक—उपमेय आणि उपमान यांच्यामध्यें अभेद आहे असें मानून वर्णन केलेलें असलें म्हणजे रूपक होतें. ‘ हें तोंड चंद्रच आहे, ’ असें समजून ‘ मुखचंद्र ’ असें म्हटलें कीं रूपक झालें. ‘ मुखचंद्र ’ हा रूपक समास. ‘ मुख हाच चंद्र, ’ म्हणजे ‘ मुख ’

१. कामधेनु. २. दमयंती. ३. भेरी. ४ दुर्योधन. ५ कर्ण. ६ शंकर. ७ रति.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आणि 'चंद्र' यांमध्यें भेद बिलकुल नाहीं, असा भाव. 'चंद्रासारखें मुख' हा उपमित समास होईल. उपमेंत उपमेय मुख्य असून उपमानाकडे गौणत्व असतें. परंतु रूपकामध्यें उपमान मुख्य आणि उपमेय गौण अशी स्थिति असते.

'पार्थ-पयोधर[1] गर्जे, स्पर्धा मंडूक तूं वृथा धरिशी,
त्याच्या पुढें टुरुटुरू टरों टरों शब्द हे किती करिशी?'

हें शल्य कर्णास बोलला आहे. यांतील रूपक उघडच आहे.

'निषधपति कथा हे जे सुधेतें जयन्ती,
परिसुनि दमयंती रंजली रजयंती;
नवल मज न भासे, चंद्रवंशैकशाली—
नल तरि वनमाळी, भीमकी हेच झाली.'

यांत नळावर वनमाळी म्हणजे कृष्ण याची आणि दमयंतीवर भीमकी म्हणजे रुक्मिणी इची अभेदानें कल्पना केली आहे.

'हा मेघ आर्द्रमहिषोदरतुल्य काळा,
शंखाकृती धरि करांत बलाकमाळा;
विद्युत्प्रभा-वसन-पीत कसोनि कांसे,
विष्णूच आक्रमितसे गगनासि भासे.'

हें एक सुंदर रूपक आहे.

विश्वामित्रानें हरिश्चंद्राचें सत्त्व पाहण्यासाठीं त्याचा अत्यंत छल केला. त्या छळाला हरिश्चंद्र शेवटपर्यंत टिकला. अखेरीस चांडाळ-धन्याच्या आज्ञेनें राजा हरिश्चंद्र आपल्या पत्नीचा वध करण्यास तयार झाला असतां त्या प्रसंगाचें वर्णन मुक्तेश्वरानें पुढील सुंदर रूपकांत केलें आहे:—

'शुद्धसत्व-कला-षोडशीं, पूर्ण देखोन नृप-शशी,
कौशिक-हृदय-पूर्णसिंधूशी, प्रेम-भरतें दाटलें;
प्रतिज्ञा भगून वल्लरी[2], नयनीं लोटल्या अश्रु-लहरी,
उदित[3] हात वरच्या वरी, शस्त्र जाऊन वारिलें;
कौशिक-कृपेचा वरद वात, डोलतां विबुधें[4]-पारिजात,
सुकृत[5]-सुमनें परागभरित, राजमुकुटीं वर्षती.'

१ मेघ. २ सीमा. ३ उचललेला. ४ देव. ५ पुण्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रूपकाचे १ साङ्ग, २ निरङ्ग आणि ३ परंपरित असे तीन भेद करितात.

अनेक रूपकें अवयवांसारखीं कल्पून त्या सर्वांमिळून एक समग्र रूपक तयार झालें, म्हणजे तें **सांग रूपक** झालें. मुक्तेश्वराच्या वरील ओव्यांमध्यें दोन सांग रूपकें सुरेख साधलीं आहेत. त्याचप्रमाणें पंतांचीं पुढील सांग रूपकें पाहा:—

' दुष्यंत-सद्म-पद्मीं त्या श्रीकण्वाख्य-शिष्यभानु–करीं,
नेली पुत्र-सुगंधासह धर्मनयांबुपूर्ण नगर-सरीं[1]. '
' खळमूषक लंकातृणराशिस्थ स्वकुळ सर्व चाटून,
तो खावयावया ने त्या साध्वीवर्तिलागीं दाटून[2]. '

रूपकास अंगें म्हणजे अवयव नसले, कारण एकच असलें, व अनेक रूपकें असलीं तरी प्रत्येक प्रधान असलें म्हणजे तें **निरंगरूपक**. उदा०—

' तो भीमसेन चित्तीं अतिदुःसह कोप-पावकें कढला,
उदयगिरिशिरीं रविसा भासे मत्तद्विपोत्तमीं चढला. '
' मद्दुःख सागराचा अगस्त्य तूं; काय या तुझें नांव ?
चिंतानदींत बुडतां दैवें कोठोनि धाडिली नांव ? '

मोरो०

जेथें प्रथमतः एक रूपक केलें म्हणून तदवलंबी असें दुसरें रूपक परंपरेनें करावें लागतें, तेथें **परंपरा रूपक** होतें. परंपरा रूपकांत निरनिराळीं रूपकें सापेक्ष असून कवीची रूप्य आणि रूपक यांच्या साधर्म्याकडे दृष्टी नसते. उदा०—

' गुरु-कर्णधार, त्याची सुदृढा तत्त्वोपदेशवाक् सुतरी,
धरुनि भवांबुधि तरले बहु बुध; तत्कीर्तिही जना उतरी. '

या आर्येंत ' तत्त्वोपदेशवाक् ' यावर ' तरी ' चा म्हणजे होडीचा आरोप केला म्हणून गुरूला ' कर्णधार ' म्हणजे नाविक म्हणावें लागलें.

---

१ कण्वशिष्य भरतासह शकुंतलेला दुष्यंताकडे घेऊन गेले, त्या वेळचें हें वर्णन आहे. २ रावणानें सीता नेली त्या प्रसंगाचें वर्णन. उंदीर तेवत असलेली वात नेतो त्याप्रमाणें रावण सीतारूप वात, लंकारूप तृणराशीवर असलेलें स्वकुळ जाळण्याकरितां मुद्दाम नेता झाला.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

‘ होऊन वज्रपंजर रक्षितसे वासुदेव कीरा या,
तत्संगाहुनि त्याला बहु न यशोदा, न देवकी, राया. ’

या आर्येमध्यें अर्जुनास ‘ कीर ’ म्हणजे पोपट कल्पिल्यानें परंपरया कृष्णाला वज्रपंजर म्हणावें लागलें. नाहीं तर कृष्ण आणि पिंजरा यांत साधर्म्य कांहीं नाहीं.

‘ वंदुनि पुत्रसुहृज्जनशोक-नटाच्या मनोज्ञ अजिरा या,
धृतराष्ट्रासि म्हणे, मी संजय, व्हा सावधान अजि राया ! ’

यांत ‘ शोक ’ आणि ‘ नट ’ यांत साधर्म्य नाहीं. पण शोकाला नट म्हटलें म्हणून धृतराष्ट्रास ‘ अजिर ’ म्हणजे नाचण्याचें अंगण म्हटलें. वस्तुतः ‘ धृतराष्ट्र ’ व ‘ अजिर ’ यांतही साधर्म्य नाहीं.

रूपकामध्यें केव्हां एकावर अनेक पदार्थांचा आरोप केलेला असतो,— रूपकांची केवळ मालिकाच असते,-तेव्हां त्याला **मालारूपक** असें नांव देतात. वर सांगितलेल्या तिन्ही भेदांत मालारूपक होऊं शकेल. उदा०—

‘ कवी सृष्टीचा अलंकार, कवी लक्ष्मीचा शृंगार,
सकल सिद्धींचा निर्धार, ते हे कवी.
कवी सभेचें मंडन, कवी भाग्याचें भूषण,
नाना सुखांचें संरक्षण, ते हे कवी. ’ रामदास.

‘ राम धनंजय तूंही कापुर, तृण, तूल, काष्ठ, घृत, तैल;
शैलहि पिचविल हें तुज नुमजे, तूं मातला जसा बैल. ’
मोरोपंत.

‘ जो ज्ञानारविंद-मकरंदू, वैराग्यवल्लीचा मूलकंदू,
विवेकसागरींचा पूर्णेंदू, तो नारदू पातला. ’
मुक्तेश्वर.

मराठी कवितेंत हा अलंकार भरपूर सांपडणारा आहे. मोरोपंत, मुक्तेश्वर, श्रीधर, आणि वामन यांनीं आणि अन्य कवींनींही आपल्या कवितेंत ठिकठिकाणीं अनेक रूपकें केलीं आहेत यासाठीं यांचीं उदाहरणें द्यावीं तितकीं थोडींच आहेत.

६. **रूपकातिशयोक्ति**—जेव्हां रूपकामध्यें उपमान आणि उपमेय यांचा अभेद अशा रीतीनें वर्णिला असतो कीं उपमेय मुळींच गाळून

१ अमी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्याबद्दल उपमानच घातलेलें असतें, यास **रूपकातिशयोक्ति** असें म्हणतात. यांत उपमेय उक्त नसतें. त्याचा उपमानांत अंतर्भाव असतो व उपमानावरूनच त्याचा बोध व्हावयाचा असतो. 'मुख-चंद्र' असें म्हटलें असतां उपमेय आणि उपमान दोन्ही उक्त आहेत व त्यांमध्यें भेद नाहीं, असें बोलणारा मानतो. पण रामाचें सुंदर मुख पाहून लोक म्हणूं लागले, 'अहो हा पूर्णचंद्रच उदयास आला कीं काय?' ही **रूपकातिशयोक्ति** झाली. यास नुसतें **अतिशयोक्ति** असेंही म्हणतात. हा अतिशयोक्तीचाच प्रकार आहे. अतिशयोक्ति या दृष्टीनें याचें पुढें आणखी वर्णन येईल. उदाहरणें:—

'हरिच्या पुनःपुन्हा कां काड्या नाकांत घालिशी, शशका!
यश काय पक्षिपतिचें येइल हे चार करुनियां मशका?'

हें कोणीं दुर्योधनास म्हटलें आहे. येथें 'हरी' आणि 'पक्षिपति' म्हणजे धर्म; शशक (ससा) आणि मशक (माशी) म्हणजे दुर्योधन; आणि नाकांत काड्या घालणें म्हणजे चिडविणें. यांत धर्म आणि दुर्योधन या उपमेयांचा उल्लेख केला नाहीं.

'ज्या शिखिशिखेसि[1] भुलला तो दुष्ट पतंग मत्त पाहून,
ती म्यां विलोकिली; तप गुरु अन्याचें न मत्तपाहून.'

हें मारुतीनें सीतेला भेटून आल्यानंतर म्हटलें आहे. यांत 'शिखिशिखा' म्हणजे सीता; 'दुष्ट पतंग' म्हणजे रावण.

'सुटला दांव्यापासुनि वत्स स्तन्यार्थ[2] जेविं गाईला,
धांवे अक्रूर तसा भेटाया कडकडोनि आईला.'

या ठिकाणीं 'श्रीकृष्ण' हें उपमेय मुळींच गाळून त्याबद्दल 'आई' उपमानच घातलें आहे.

७. **अनन्वय**—जेव्हां उपमेयाची त्याची त्यालाच उपमा दिलेली असते, म्हणजे एकच पदार्थ उपमेय आणि उपमान झालेला असतो तेव्हां **अनन्वय** होतो. उदाहरणः—'तुझ्यासारखा कोडगा तूंच.' 'गगन हें गगनासारखेंच आहे.'

'यासम हाचि धनुर्धर म्हणतां उपमन्युसुरतरु[3] रुसेना.'

'तेरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती;
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती?'

---

१ अग्नीच्या ज्वालेस. २ स्तन्य,—दूध. ३ अर्जुन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

' अशि साधु साधुपतिशीं गांठि पडे ती जशी अया परिसा,
यापरि साचा ह्यांचि प्रेमळ, याच्याचिया जया परिसा. '

मोरो०

' घडे दैवें किंचित् कलुष परि संतापाति मनीं,
अशांतें ताराया असति बहु तीर्थें त्रिभुवनीं;
जयां प्रायश्चित्तें नसति कुनरां दे गति अशी,
समर्था, या लोकीं तुजसम, अर्थी, तूंच असशी. '

वामन.

' श्रीरामरावणसमर होय श्रीरामरावणसमरसा. '
' झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु परंतु यासम हा. '
' होय रामराज्य रामराज्यसेंचि तोखद,
व्याधि जो भवाख्य उग्र, हें तयासि ओखद. '

मोरो०

८. व्यतिरेक—या अलंकारामध्यें उपमान व उपमेय ह्या दोहोंचें साधर्म्य दाखवून लगेच वैधर्म्यही दाखविलें असतें. तसेंच, केव्हां उपमेय हें उपमानापेक्षां श्रेष्ठ आहे असें दाखविलेलें असतें. उदाहरणार्थ,—

' शर जेविं किरण भंवते, जें कौरवकटक तोचि परिवेष,
रविच कविमतें अर्जुन तेजें रूपेंहि, भिन्न परि वेष. '

मोरो०

येथें कवीनें अर्जुन हा सूर्यासारखा आहे असें वर्णून, लगेच भिन्न कसा आहे हेंही सांगितलें आहे.

" श्रीरामाचें मुख चंद्रासारखें सुंदर आहे असें कवि वर्णन करितात, परंतु मला तर तें चंद्रापेक्षांही सुंदर वाटतें; कारण चंद्र लहान मोठा होतो, त्याला ग्रहण[1] लागतें, आणि त्यावर कलंक आहे; हे दोष श्रीरामाच्या मुखाच्या ठाईं कोठें आहेत? " " दारिद्र्य हें मरणासारखें दुःखद आहे असें कोणी म्हणतात, परंतु मला तर तें मरणापेक्षां जास्त दुःखद वाटतें; कारण मरणाचें एकदांच काय तें दुःख होईल, परंतु दारिद्र्याचें दुःख निरंतर असतें ! "

१ सूर्यचंद्रांस खळें पडतें तें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

या अलंकारांत उपमानाचें श्रेष्ठत्व दाखविलें असतें तें उपमेच्या उत्कर्षानें किंवा उपमानाच्या अपकर्षानें दाखविलें असतें.

' वज्राहुनि काठिण हृदय, शोक घनाहत, तरी तगे, न चिरे. ' येथें कवि ' वज्राहून हृदय जास्त कठीण; कारण तें शोकरूपी घनापुढें टिकतें, चिरत नाहीं,' असें हृदयाच्या म्हणजे उपमेयाच्या कठीणपणामधील श्रेष्ठत्वाचें वर्णन करितो.

ज्ञानेश्वरी ग्रंथ पूर्ण झाल्यावर कवि ज्ञानदेव आनंदित होत्साते गुरूला उद्देशून म्हणतात,—

' मजलागीं ग्रंथाची स्वामी । दुजी सृष्टी जे हे केली तुम्हीं,
ते पाहोनी हासों आम्हीं । विश्वामित्रातेंही. '

येथें ज्ञानदेव म्हणतात कीं, " गुरूमहाराज, आपण माझ्याकडून ही जी गीतेची प्रतिसृष्टि करविलीत, ती इतकी उत्तम आहे कीं ती पाहून आम्ही विश्वामित्रानें पूर्वीं केलेल्या प्रतिसृष्टीला हासतों; " म्हणजे तिच्यापेक्षां आमची प्रतिसृष्टि श्रेष्ठ आहे असा भाव. येथें उपमानाचा अपकर्ष वर्णिला आहे.

व्यतिरेकाचीं आणखी कांहीं उदाहरणें:—

(१) नेत्र इचे अति चंचल देखुनि घालिती मत्स्य जलीं शरिरासी;
वर्तुळ आणि विशाळ विलोकुनि, नित्य कुरंग फिरे वनवासी;
अंजनयुक्त सुसुंदर पाहुनि लज्जित खंजन[1] लंघि दिशांसि;
सूर्यविकासिनि पद्मिनि नेत्रदळां पहतां करि म्लान मुखासी. '

अनंतकवि.

(२) ' हे वामनैकपदभूमि; नसोनि जंघी—
सातां दिसांत दिनराज नभासि लंघी;
वाराशि वानरविलंघित होय तो कीं;
लोकीं नसे नलयशस्तुलना विलोकीं. '

(३) ' चंद्रासि लागति कळा, उपराग येतो,
गंगेसि भंग बहु पाणउतार होतो;

१ ज्याचे डोळे सुंदर आहेत असा एक पक्षी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

SRI JAGADGURU
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamwadi Math, VARANASI.
Acc. No. 3548

जें चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला,
नाहीं समान नळराजमहायशाला.'

रघु० पं०

(४) 'कथा-सुरभि[1] त्या भल्या स्वजननीहुनी वाटती,
शिशूंस जरठांसही निराखितां रसें दाटती;
दुहोत भलते सदा, तरि न लेशही आटती,
स्ववत्समल भक्षिती, परि न सर्वथा बाटती.'

केका.

(५) 'श्रीरामानें एक क्रतु करुनी एक रक्षिला विप्र,
नामा, नेले, नेशी अमित क्रतु साङ्गासिद्धिला क्षिप्र.'
(६) 'या पुष्करा[2]परिसही सीतेचें नेत्रयुग्म बहु रुचिर.'
(७) 'कैंचा विचार ? भुललें थोरपणें[3] मन तसें न मद्य-शतें.'

मोरो०

या आठ उपमादि अलंकारांमध्यें उपमा अगदीं स्पष्ट आहे. परंतु यापुढें जे कांहीं अलंकार सांगावयाचे आहेत त्यांत उपमा तितकी स्पष्ट नाहीं, तर गर्भित आहे.

९. निदर्शना—यांत एका गोष्टीची असंभाव्यता तशाच प्रकारच्या दुसऱ्या असंभाव्य गोष्टीची उपमा किंवा उदाहरण सांगून दाखविली असते. जसें, (१) 'हा दगड परीक्षेंत उतरणें आणि मुसळाला अंकूर फुटणें हीं दोन्हीं सारखींच.' (२) तुझ्या सारख्या मूर्खाला एकादी चांगली गोष्ट सांगूं जाणें म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखें होय.' (३) 'असल्या मनुष्यावर कांहीं उपकार करावयाचे म्हणजे कातळावर दाणे पेरण्यासारखें समजावयाचें.' (४) कवि कालिदास म्हणतो, "माझ्यासारख्या अल्पबुद्धीच्या मनुष्यानें रघुवंशांतील थोर, कीर्तिमान राजांचें वर्णन करूं पाहणें म्हणजे लहानशा होडीनें सागर तरून जाण्याचा प्रयत्न करण्यासारखें किंवा एकाद्या ठेंगू माणसानें उंच झाडावरचें फळ काढावयास पाहण्यासारखेंच आहे." या चारी उदाहरणांमध्यें प्रत्येकांत दोन अशक्य गोष्टींचें साम्य कसें दाखविलें आहे, हें सहज दिसून येण्या-

१ कामधेनू. २ पुष्कर—कमळ. ३ गर्वानें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सारखें आहे. ' लहान तोंडीं मोठा घांस, ' ' गाढवाला गुळाची चव काय ? ' हीं निदर्शनेचीं अगदीं व्यवहारांतलीं उदाहरणें आहेत.

' राजसुतेचें यश जें तुज येईल काय गे दरिद्रे, तें ?
पाहसि विकावया तूं केसरमौल्यें कसें हरिद्रेतें ? '

मोरो०

यांत शर्मिष्ठा देवयानीस म्हणते, "तुझ्यासारख्या भिकारड्या ब्राह्मणाच्या मुलीनें आपणास एकाद्या राजकन्येप्रमाणें वागवूं पाहाणें हें केशराच्या किमतीनें हळद विकूं पाहाण्यासारखेंच अशक्यकोटींतलें आहे. "

एका चांगल्या गोष्टीच्या उदाहरणानें दुसरी चांगली गोष्ट झाली असें वर्णन असलें म्हणजेही निदर्शना होते; उदा०—

' येतांचि उदया सूर्य श्री देतो कमळां नवी,
संपत्तीचें हेंचि फळ, आप्तपोषण शीकवी. '

यांत सूर्य कमळांना शोभा देणें ही चांगली गोष्ट करून, संपत्तीचा चांगला उपयोग करावा असें लोकांना सुचवितो असें वर्णन आहे. बाकी हें वर्णन दृष्टान्तासारखें आहे.

निदर्शनेचीं आणखी उदाहरणें:—

(१) ' जे का ज्ञानें लाधलें सद्विचारा,
संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा ?
पद्माचा जो तंतु तो वारणाला—
वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला. '

(२) ' सर्पातें बिसतंतुनें सुदृढ तो बांधावया इच्छितो,
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें भेदावया पाहतो;
किंवा, तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिला आणितो,
जो मूर्खास सुभाषितें वश करूं ऐसें झणीं बोलतो. '

वामन.

(३) ' त्वद्रत्नतस्करालों[1] केला मी बोध, फार आरडलों,
अंध-भसितें[2]-बधिरीं तें दीप-हवन-गीत, कीं वनीं रडलों!'

---

१ सीतेला चोरून नेणाऱ्या रावणाला मी म्ह० बिभीषण. २ राख.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(४) ' कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे,
तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे.

ही गोष्ट कशी आहे, तर—

' तातादिक म्हणति मनीं सुमति खळाला, अचक्षुला रत्न,
शूद्रास श्रुति देतो रामें; न चाले तयापुढें यत्न. '
मोरो०

१०. दृष्टान्त—एकादी विशेष गोष्ट मनांत चांगली बिंबावी म्हणून तशाच प्रकारच्या दुसऱ्या एकाद्या गोष्टीचें उदाहरण घेतलें असतें, तेव्हां त्यास दृष्टान्त असें म्हणतात. उदाहरण;—(१) " ज्याप्रमाणें अग्नीवर नकळत जरी पाय पडला, तरी पाय भाजतोच, त्याप्रमाणें परमेश्वराचें नांव जरी तोंडांतून नकळत आलें, तरी सर्व पाप नाहींसें होतें. " (२) " जशी प्रथमतः गडगडाट होऊन नंतर मोठी वृष्टि व्हावी, त्याप्रमाणें साक्रेटिसाच्या बायकोनें त्यास प्रथम पुष्कळ शिव्या दिल्या आणि नंतर घाणेरडें पाणी बाहेर टाकून द्यावयास आणिलें होतें, तें त्याच्या डोळ्यावर ओतिलें. "

दृष्टान्त हा अगदीं सहज समजण्यासारखा अलंकार असून त्याचीं उदाहरणें नेहमीं बोलण्यांत आणि वाचण्यांत शेकडों येतात. येथें कांहीं ठळक ठळक उदाहरणें सांगतों:—

(१) ' आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी;
नामप्रतापहि यथामति याचरीती—
सीमा न पावति तथापि मुनीन्द्र गाती. '

(२) ' विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा,
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा;
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं—
तो सर्प काय न डसे खळ अंतरंगीं ? '
वामन.

---

१ वसुदेव इत्यादिक. २ बळराम.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(३) ' खल न खलत्व त्यागी जरि सामें गौरवून बोळविला,
लकुच कटुचि, अमृतकराकरवींही शर्करेंत घोळविला. '

(४) भूप म्हणे ' न वरावा वत्से, जरि सुगुणसागर ल्वायू,
शीतल, मंद, सुगंधहि, वद सेवावा कसा गरलवांयू ? '

मोरो०

(५) ' हें पाखरूं मजशि येईल काय कामा—
ऐसें नृपा न वद, पूरितलोक कामा;
मळें उणें व्यजन तें धरितां पुढारीं,
छाया करी, तपनदीप्तिसही निवारी. '

रघु० पं०

टीप—उपमा आणि दृष्टान्त या दोन अलंकारांमध्यें पुष्कळसें साम्य आहे. परंतु उपमेमध्यें एक पदार्थ अशा अशा कारणांनीं दुसऱ्या पदार्थासारखा आहे असें वर्णन असतें. दृष्टान्तामध्यें अमुक अमुक गोष्ट अमुक अमुक गोष्टींसारखी आहे, किंवा हा जसा विचार आहे तसाच हा दुसरा विचार आहे असें वर्णन असतें. अर्थात उपमेमध्यें **दोन वस्तूंचें** साम्य असतें, व दृष्टान्तामध्यें **दोन विचारांचें** साम्य असतें. उपमेयामध्यें वस्तुदर्शक असे दोन शब्द असतात; दृष्टान्तामध्यें विचारदर्शक अशीं दोन वाक्यें असतात. ' तोंड हें चंद्रासारखें सुंदर आहे, ' यांत तोंडाला सौंदर्यगुणासंबंधानें चंद्राची उपमा दिली म्हणजे सादृश्य दाखविलें. परंतु ' पूर्णिमेचा चंद्र पाहून लोकांना जसा आनंद होतो, तसाच श्रीरामाचें मुख पाहून सर्वांना आनंद होत असे. ' यामध्यें दोन विचारांमध्यें सादृश्य आहे. वाक्योपमा व दृष्टान्त यांमध्यें फारच साम्य दिसून येईल. दृष्टान्त आणि वाक्योपमा दोन्ही एकच होत, असें पुष्कळांस वाटेल. परंतु आपल्यास या बारीक भेदांचा विचार कर्तव्य नाहीं.

१०. **दीपक**—दोन गोष्टींचें साम्य दाखवावयाचें असतां दोहोंमधील साम्यतादर्शक असा एकच गुण सांगून तुलना केली असते, आणि उपमेय म्हणजे प्रस्तुत आणि उपमान म्हणजे अप्रस्तुत यांचा एकाच गुणावर अन्वय दाखविलेला असतो, तेव्हां **दीपक** हा अलंकार होतो. या अलंकारामध्यें उपमान, उपमेय आणि दोहोंमध्यें असणारा धर्म या सर्वांवर जसा काय प्रकाश पडतो म्हणून यास **दीपक** असें म्हणतात. उदाहरण:—' व्यवहारामध्यें शब्द आणि संगरामध्यें हातांतील तरवार हीं अचल असावीं

१ चंद्राकडून. २ विषयुक्त हवा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हें वर्णन ' ज्याप्रमाणें व्यवहारामध्यें शब्द अचल असावा त्याप्रमाणें संगरामध्यें हातांतील तरवार ही अचल असावी.' असेंच वास्तविक आहे. परंतु वाक्य एकच करून उपमान आणि उपमेय यांचा ' अचल असणें ' हा धर्म एकदांच सांगितला आहे.

' कवि म्हणति, वाणि वर्णुनि देवा, कीं सुज्ञ मानवा वेंच.'

यांत वेंचणें म्हणजे खर्च होणें ही क्रिया देवाचें वर्णन करणें आणि सुज्ञ मानवाचें वर्णन करणें या दोन गोष्टींच्या संबंधानें सांगितली आहे.

शक्र म्हणें ' वदलासि प्रथम तसें वचन, मग असें वदसी,
अचल करींच असावा व्यवहारीं शब्द, संगरीं सदसी. '

हें इंद्र नळराजास बोलला आहे. प्रथम तुमचें काम करीन असें वचन देऊन आतां दमयंतीकडे निरोप घेऊन जाणार नाहीं असें म्हणतोस, असें तो त्यास लागून बोलत आहे.

' काककथा कथितों ती ऐकावी मग यथेच्छ वर्तावें;
पडतां गिरिशिखरच्युत बृहदुपलें कीं खळें न पर्तावें. '

एकाद्या पर्वताच्या शिखरावरून ढकललेला दगड पडत असतां परतत नाहीं, अथवा खळ अधोगतीस जात असतां परतत नाहीं, असें यांत वर्णन आहे. दीपकाचे (१) क्रिया-दीपक, (२) कारक-दीपक, आणि (३) माला-दीपक असे भेद करितात.

(१) अनेक कर्त्यांचा एकाच क्रियेशीं संबंध असून दीपक झालें असतां तें **क्रिया-दीपक**; जसें,—

' दुर्मंत्रें नृप, संगतीस्तव यती, कीं पुत्रही लालनें,
वेदानध्ययनें द्विजाति, कुल दुष्पुत्रें, खलाराधनें—
नासे शील, न पाहतां कृषि, मदें मा, लाज मद्यें फुका,
शाठ्यें मित्रपण, प्रवासगमनें स्नेह, प्रमादें रुका. '

वामन.

(२) कर्ता एक असून क्रिया अनेक असल्या म्हणजे **कारक-दीपक** होतें; उदा०—

' उवरे, चढेचि, वर्षे, गर्जे, पाडी घनांधकारातें,
प्राप्त-नव-श्री-पुरुषापरि मेघ धरी अनेक रूपांतें. '

मृच्छकटिक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

' पायीं भ्रमली, श्रमली, निजली, भिजली निजाश्रूंनीं रानीं,
धार्मिक न पाहिला तो, जो जाय अशीस टाकुनी रानीं. '

हें नलानें त्याग केलेल्या दमयंतीच्या संबंधानें म्हटलें आहे.

' आतां सोडवितों पशु, खळबळ पळ न लागतांचि पळवीतों,
मी विजय असें तुजाचि न सकळांही कौरवांसि कळवीतों. '

मोरो०

अनेक दीपकांचा यथाक्रम संबंध जोडून त्यांची मालाच आहे असली रचना असली म्हणजे त्यास माला-दीपक असें म्हणावें. उदा०—

' दशशतभुजार्जुनाचें रामें, त्याचें तुवां, तुझें आजीं—
सर्व यश हराया मी आलों तुजशीं करावया आजी. '

या अलंकारास कोणी तुल्ययोगिता असेंही नांव देतात. ' दीपक ' व ' तुल्ययोगिता ' यांतील भेद कोणी असा सांगतात कीं प्रस्तुत व अप्रस्तुत यांचा अन्वय असेल तेव्हां दीपक व प्रस्तुत-प्रस्तुतांचा किंवा अप्रस्तुताप्रस्तुतांचा संबंध असेल तेव्हां तुल्ययोगिता. हा भेद वास्तविक अगदीं क्षुल्लक आहे. या अलंकाराचीं आणखी कांहीं उदाहरणें:—

(१) ' ऐसा श्रीमद्गुरुनें केला अम्हांवरी प्रसाद बुधा,
तन्मधुरता न जननीस्तन्यास, न कामधेनुच्याहि दुधा. '

(२) ' निजबंधुवधक्षोभें वीर नृपति-सात्यकीसवें भांडे,
ज्याच्या नेत्रांतुनि जळ पळ पळ रक्तौघ तनुंतुनी सांडे. '

(३) ' चंद्रासि लागति कळा, उपराग येतो,
गंगेसि भंग बहु, पाण उतार होतो;
जें चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला ?
नाहीं समान नळराजमहायशाला. '

(४) ' त्या राघवें पुरीला वियोग दिधला, नृपेंहि धरणीला,
ईर्ष्या पुत्रासह ही केली कीं दाखवून करणीला. '*

---

* राम अरण्यांत गेला आणि दशरथ मरण पावला त्या वेळचें हें वर्णन आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जंगमवाडी मठ नागपूर

(९) ' कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें,
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें;
जाणोनि हें सुजन ज्या दुबळीक आली,
त्याची कधीं न करिती सहसा टवाळी. '

(६) ज्ञानेश्वरींतील पुढील ओव्यांत साधूची समवृत्ती, एकेक पदार्थाची अन्यत्र समवृत्ती कशी असते हें सांगून वर्णिली आहे. यांत प्रत्येकीं सुंदर अशी तुल्ययोगिता किंवा दीपक आहे.

' उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे,
हें कांहींच नेणिजे । वसुधा जेवीं. ' १
' कां राजाचे देह चाळूं । रंका परौतें गाळूं,
हें न म्हणेचि कृपाळू । प्राण पैं गा. ' २
' गाईची तृषा हरूं । व्याघ्रा विष होवोनि मारूं,
हें नेणेंची गा करूं । तोय जैसें. ' ३

निदर्शना, दीपक, दृष्टान्त आणि **अर्थान्तरन्यास** यांची परस्पर तुलनाः— निदर्शनेमध्यें अशक्य गोष्टींची तुलना केलेली असते; दीपकामध्यें आणि दृष्टान्तामध्यें अशक्य गोष्ट नसते. दृष्टान्तामध्यें मूळ गोष्ट आणि दृष्टान्तादाखल सांगितलेली गोष्ट या स्पष्ट निराळ्या दर्शविलेल्या असतात. दीपकामध्यें दृष्टान्ताची गोष्ट केवळ सूचित केलेली असून क्रियापद एकदांच असतें. दृष्टान्तांत एकाद्या विशेष गोष्टीच्या स्पष्टीकरणार्थ तशाच दुसऱ्या एकाद्या विशेष गोष्टीचें उदाहरण घेतलेलें असतें; अर्थान्तरन्यास यामध्यें विशेष गोष्टीच्या समर्थनार्थ सामान्य गोष्ट सांगितलेली असते, अथवा सामान्य गोष्टींच्या स्पष्टीकरणार्थ विशेष गोष्ट सांगितलेली असते. या चारी अलंकारांमधील हा परस्पर भेद मागें दिलेल्या विवेचनावरून आणि उदाहरणांवरून स्पष्ट होणार आहे.

११. विरोध—एका पदार्थावर एक किंवा दोन विरुद्ध गुणांचा आरोप केला असतो, तेव्हां त्यास विरोध असें म्हणतात. ' हे गृहस्थ घरांतल्या माणसांचे कर्दनकाळ, परंतु बाहेर गेले म्हणजे अगदीं गोगलगाय ! ' यांत विरोधालंकार आहे. हा वास्तविक रूपकाचा पोटभेद आहे. ' हा जसा काय कर्दनकाळच आहे. ' ' हा जसा काय गोगलगायच आहे. ' हीं दोन रूपकें झालीं. पण हीं एकत्र आणून दोहोंचा विरोध दाखविला म्हणजे विरोधालंकार मानावयाचा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

' यच्चरितें सुजनांच्या हृदयीं अमृतेंचि, शत्रुच्या शल्यें,
सद्विज, सामात्य, सबळ तो भरतश्रेष्ठ पूजिला शल्यें. '

यांत एका चरित्रावर परस्पर विरुद्ध अशा अमृतत्वाचा आणि शल्यत्वाचा आरोप केला आहे.

' तो पात्र होय होउनि कठिणहृदयही पृथासुत दयेतें. '

येथें कठीण हृदय असूनही दयेतें पात्र होय असें वर्णन आहे. ' आपण एवढे सुज्ञ, शहाणेसुरते होऊन असें भलतेंच कसें वरळतां, किंवा मूर्खासारखे कसे वागतां? ' हें व्यावहारिक भाषेंतलें विरोधाचें उदाहरण आहे.

या अलंकारासच कोणी—

१२. विरोधाभास—असेंही नांव देतात. प्रत्यक्ष विरोध वर्णिला असेल तेथें विरोध, आणि जेथें खरोखर विरोध नसून विरोध आहे असें दाखविलेलें असेल, म्हणजे विरोधाचा आभास असेल, तेथें **विरोधाभास,** असा पाहिजे तर भेद धारितां येईल. ' आमच्या बागेंत घागरीएवढाले आंबे आले आहेत. ' यांत घागर म्हणजे पाण्याची मोठी घागर, असा अर्थ घेतला तर विरोध दिसतो. पण घागरीएवढे म्हणजे मुलाच्या पायांत रुप्याची घागरी असते तेवढाले, असा अर्थ केला तर वास्तविक विरोध नाहीं.

' शुकभाषणानुकार प्रेमें करितो मयूर, हें चित्र! '

यांत मोर पोपटासारखें बोलतो असा अर्थ केला असतां विरोध दिसतो. पण शुक म्हणजे भागवतकथा सांगणारा शुकमुनी; त्याच्या बोलण्याचें अनुकरण मयूर म्हणजे कवि मोरोपंत करितो असा अर्थ केला कीं विरोध नाहीं. विरोधांत श्लेष असला म्हणजे तो विरोधाभास होतो, असेंही म्हणतां येईल.

१३. विरुद्धगुणन्यास—दोन वस्तूंचे अगदीं परस्पर विरुद्ध असे गुण स्पष्टपणें दाखवून त्यांची तुलना केलेली असते, आणि त्या गोष्टी परस्परांहून कशा अगदीं भिन्न आहेत हें दाखविलें असतें, तेव्हां **विरुद्धगुणन्यास** हा अलंकार होतो. ' तुमच्यासारखे, श्रीमंत कोणिकडे आणि आमच्यासारखे भिकारडे कोणिकडे. ' ' कोठें इंद्राचा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ऐरावत, आणि कोठें शामभट्टाची तट्टाणी!' 'तो नरवर अर्जुन कोणीकडे, आणि तूं सूतपुत्र, हलक्या कुळांतला मनुष्य कोणीकडे?'

कर्णानें अश्वत्थाम्याची निर्भर्त्सना केली, आणि "तुझ्यासारख्या ब्राह्मणबटूनें काय पराक्रम करावयाचा आहे? बापाच्या दुःखाचा प्रतिकार करण्यासाठीं आतां रड!' असें म्हटलें; तेव्हां अश्वत्थामा त्यास उत्तर देतो—

'माझें शस्त्र तुझ्यापरी न गुरुंच्या[1] शापें जळालें असे,
कीं सोडून रणा पलायनें न म्यां, त्वां[2] आजि केलें असें;
नाहीं सारथिच्या कुळीं जनि[3] मला, कीं निंद्य[4] नाहीं जिणें,
दुःखाचा प्रतिकार कां करिन मी अस्रांचि[5], शस्त्राविणें?'

दुर्योधनाचा एक वृद्ध सेवक भीष्मासारखा योद्धा पडला तेव्हां दुर्योधनाला काय वाटलें, आणि लहान पोर अभिमन्यू पडला तेव्हां काय वाटलें याची तुलना करून म्हणतोः—

'ज्याचा शत्रुकुळीं अखंड परशू त्याचाहि[6] जेता जरी,
पंडूच्या कुमरीं शरीं निजविला, बाधा न झाली तरी;
प्रौढांनीं, बहुतीं, अशस्त्र, समरीं जो श्रांतही जाहला,
एकाकी अभिमन्यु बाळ वधतां राजा सुखा पावला!'

वेणीसंहार.

'धनपति जरि तूं रे, मी असें शास्त्रवेत्ता,
भट समरिं जरी तूं, मी महावादिजेता[7];
अनुचर जरि तूंतें सेविती छात्र[8] मातें,
न गणिशि मज, जातों तुच्छ मानोनि तूंतें.'

वामन.

हें कोणीं पंडितानें आपला अपमान करणाऱ्या राजाला म्हटलें आहे.

१४. **प्रत्यनीक**—उपमेय हें आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे असें पाहून उपमान त्याचा सूड घेण्यास पाहातें अशा प्रकारचें 'वड्याचें तेल

---

१ परशुरामाच्या. २ द्रोणास मारलें तेव्हां सर्व पळून गेले होते. ३ जन्म.
४ दुर्योधनाचा सेवक म्हणून निंद्य जिणें. ५ अश्रु ढाळून.
६ परशुरामाचा.
७ मोठ्या वाद करणाऱ्या विद्वानांना जिंकणारा. ८ शिष्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बांग्यावर काढणें ' असल्या न्यायाचें वर्णन असतें, तेव्हां हा अलंकार होतो. यामध्यें उपमेयाचें श्रेष्ठत्व कबूल असतें, म्हणून 'व्यतिरेक ' गर्भित असतो.

" हा सीते, जे त्वत्कच-भार-जित-कलाप मोर, हा सीते!
हा सीते, ते नाचति मज पाहुनि मजसमोर हा सीते!
बहु लाजवीत होतों करि-केसरि-कीर-केकि-हरिणां मीं,
हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं! "

राम सीतेकरितां शोक करितांना तिला उद्देशून म्हणतो. ' हे सीते, तुझा कचकलाप (म्हणजे केश) हे मोराच्या पिसाऱ्यापेक्षां सुंदर म्हणून मोर इतके दिवस तोंड लपवून होता. पण आतां तूं नाहींशी झालीस असें पाहून तो माझ्यापुढें येऊन नाचत आहे. मी इतके दिवस तूं एकेक गोष्टींत त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ म्हणून सिंह, हत्ती, पोपट, कोकीळ, हरीण यांस लाजवीत होतों, पण तेच मला आतां हिणवीत आहेत! ' या रामाच्या उक्तीचें पर्यवसान अर्थान्तरन्यासानें झालें आहे, यामुळें एकंदर वर्णन सुंदर जुळलें आहे.

प्रत्यनीकामध्यें उपमेय हें आतां जाग्यावर नाहीं, तेव्हां त्याच्यावर सूड घेतां येत नाहीं, म्हणून तो सूड उपमेयाच्या संबंधाच्या अशा दुसऱ्या कोणावर उपमान घेत आहे अशा प्रकारचें वर्णन असतें. वरील उदाहरणांत मयूरादिक सीतेच्या संबंधाचा सूड रामावर घेत आहेत, असें वर्णन केलें आहे.

१९. **स्मरणालंकार**—' स्मरणें ' या धातूचा किंवा तदर्थक धातूचा उपयोग होऊन उपमेंत पर्यवसान असलें म्हणजे **स्मरणालंकार** होतोः—

" बहु रक्त दिसे, खेळुनि होय जसा काय बा गुलालातें,
पळतां कर्ण स्मरलें, भिउनि पळे पोर बागुलाला तें. "
" अरिहरिपासुनि सुटतां करि करि-भूपति-पलायन त्वरित,
स्मरलें सुरांसि तेव्हां कालयवन भीत-शौरिचें चरित. "
" पार्थाचा धैर्य न दे रिपुदमनीं त्या तदा शर थिराया,
तेव्हां मज आठवला वालिवधख्यात दाशरथि, राया! "

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१६. **सहोक्ति**—' सह ' शब्दाचा प्रयोग असून उपमेंत सुंदर पर्यवसान असलें म्हणजे **सहोक्ति** अलंकार होतो:—

" मारुनि रावण, त्याचे दार तदस्नेंकरून न्हाणून,
गेल्या निजकीर्तिसह श्रीमत्सीतासतीस आणून. "

" अभिमंत्रुनि बाणत्रय गांडीवाच्या गुणासि तो लावी,
सोडी अश्रुसह नृपा, ती अद्भुत शक्ति काय बोलावी? "

टीप—सहोक्तीमध्यें प्रसंगापुरते अभिन्न मानलेले आणि तुलना केलेले असे दोन धर्म पाहिजेत. ' सह ' म्हणजे ' बरोबर ' असा नुसता अर्थ असतां सहोक्ति होत नाहीं. ' रामासहित लक्ष्मण गेला, ' ही सहोक्ति नव्हे. परंतु ' रामानें रावणास मारून आपल्या गतकीर्तीसह श्रीसीता परत आणिली ' या ठिकाणीं सहोक्ति मानावयाची.

६—कार्यकारणभावाचे अलंकार.

सर्व अलंकारांचा पाया सादृश्य हा आहेच. परंतु हें सादृश्य उत्तरोत्तर दूर जाऊन पुढें त्याला कार्यकारणभावाचें स्वरूप येतें. आतां पुढें जे अलंकार सांगावयाचे त्यांत सादृश्य म्हणजे उपमानोपमेयसंबंध केवळ ध्वनित असून कार्यकारणांचा भाव अधिक स्पष्ट आहे असें दिसून येईल.

१७. **अतिशयोक्ति**—अतिशयोक्ति करून बोलणें, म्हणजे वास्तविक जसें असावयाचें त्याच्यापेक्षां कांहीं निराळें आहे असें सांगणें, हा आपल्या बोलण्याचा साधारण धर्म असतो. यासाठीं प्रत्येक विशेषप्रकारचें बोलणें म्हणजे अलंकार अतिशयोक्तिच होय, असें मागें सांगितलेंच आहे. नेहमींच्या बोलण्यांतली आतिशयोक्ति, हिची आपणांस इतकी संवय झालेली असते कीं तिच्या संबंधानें कधीं कांहीं वाटतच नाहीं तो असावा तसाच नित्यांतला प्रकार आहे, असें आपण समजतों. किंबहुना तशी आतिशयोक्ति न केली तर बोलणें नीट झालें नाहीं असेंही आपण मानितों.

परंतु हीच अतिशयोक्ति विशेषप्रकारें ठरलेल्या मर्यादेच्या बाहेर जाणून बुजून केली म्हणजे तो निराळा अलंकार समजतात.

मागें **रूपकातिशयोक्ति** (६) हा जो अलंकार सांगितला आहे, तो सर्वप्रकारें अतिशयोक्तिखालीं येईल. त्यामध्यें रूपक उघड उघड

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असतें. परंतु उपमेय काढून टाकलें असतें, यामुळें अतिशयोक्ति होते. रूपकातिशयोक्तीला हवें तर **अभेदातिशयोक्ति** असें म्हणावें.

भेदीं अभेदाची, अभेदीं भेदाची, संबंधीं असंबंधाची, असंबंधीं संबंधाची किंवा कार्यकारणांचा क्रम अन्यथा झाल्याची कल्पना कवीनें केलेली असल्यास '**अतिशयोक्ति**' अलंकार होतो.

" ज्या शिखिशिखेसि भुलला तो दुष्ट पतंग मत्त पाहून,
ती म्यां विलोकिली; तप गुरु अन्याचें न मत्तपाहून."
" वनदेवता ह्मणति त्या—' बा, गा मूर्च्छोत्थिता चकोरा'हो—
स्वस्थ; ज्योत्स्ना कीं हे, द्रुत उठचि, नमावया नको राहों.' "

खरोखरी पाहातां सीता आणि अग्निज्वाळा हे पदार्थ अगदीं भिन्न आहेत. तरी दोहोंमध्यें कवीनें पहिल्या आर्येत अभेदाची कल्पना केली आहे. तोच प्रकार पतंगाच्या संबंधानें आहे. दुसऱ्या आर्येत सत्यवानास चकोर आणि सावित्रीस ज्योत्स्ना असें मानिलें आहे.

" चतुर चराचरचेतश्चोर चतुर्बाहु चारुचारु, रुची—
अन्या; सन्यासिजनें चिंतावें मात्र हें शरीर शुची."

यांत कृष्णाची कांति तीच असतां, भिन्न नसतां, तीस अन्या म्हणून कवि अभेदाची कल्पना करितो.

" त्याजितील पंचभूतें स्वगुणांसि, रविच्छवीस सोडील,
शीतत्वातें चंद्रहि, शक्रहि कर विक्रमासि जोडील,
उष्णत्व त्यजिल दहन, मर्यादेतेंहि सिंधु सोडील,
धर्मपर धर्मराजाहि सद्धर्मप्रीतिलाहि तोडील,
परि हा शांतनव तुझा सुत केवळ कृपण मान, सत्य जिंता—
मेल्याहि न टाकील, प्राणांसि न भीत मानस त्यजितां."

यांत जे जे संबंध तुटतील म्हणून भीष्मानें म्हटलें आहे, ते कधींही तुटावयाचे नाहींत. ते संबंध कदाचित् तुटतील, पण मी आपली प्रतिज्ञा मोडणार नाहीं, अशी भीष्मानें आपल्या दृढनिश्चयाची पराकाष्ठा सांगितली आहे.

---

१ कांति. २ जिवंत असतां.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" श्री रामानें हा रथ मजें दिधला, यावरुनि पार्थ मारीन,
तद्रक्षणासि अंतक आला, तरि मी तयास वारीन;
जरि सगुण सकल हरि-यम-वरुण-कुबेरादि लोकपति आले,
जिंकिन तेही, मद्गुरुशक्तिपुढें कालशक्तिहि न चाले."

अर्जुनाचें रक्षण करण्यास यम, वरुण, इंद्र इत्यादिक येण्याचा वास्तविक संबंध नाहीं. परंतु आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा सांगण्यासाठीं कर्ण तसें म्हणतो.

"हा शिष्य वसिष्ठासीं भृगुरामासींहि सम; न वेदांत—
शास्त्रांत उणा; आधीं या आले वेद, मग नवे दांत!"

एकादा मनुष्य वसिष्ठासीं किंवा परशुरामाशीं सम कदाचित् होईल. परंतु दांत येण्यापूर्वी वेद आले, असें होण्याचा संभव मुळींच नाहीं. कारणाचा व्यापार लक्षांत येण्यापूर्वींच कार्योत्पत्ति झाली, किंवा कारणाचा व्यापार अतिशय त्वरेनें होत आहे असें येथें वर्णन आहे. 'माझी कोणीं मान कापिली, तरी मी अमुक अमुक करणार नाहीं.' 'एक वेळ सूर्य पश्चिमेस उगवेल, परंतु अमुक अमुक घडणार नाहीं.' असे अगदीं साधारणतः अतिशयोक्तीनें बोलण्याचे प्रकार अनेक असतात. अतिशयोक्तीचीं आणखी कांहीं उदाहरणेंः—

(१) " उत्तर म्हणे, ' कुरुकटक न पशूंस, यशासही स्वसे नेतें;
अवकाश पळहि नाहीं कळवाया वृत्त हें स्वसेनेतें. ' "

(२) " पुनरपि तशीच बसली अंकीं घेऊनियां स्वपति शीर ती[3],
जशि चेतना धवांगीं, होय तिची जीवितांत मति शिरती. "

(३) " वनदेवता न पाहों शकती लज्जानता नलास्याला;
करिति न रोमंथाला हारिण, मयूरहि तदा न लास्याला. "

(४) " किंबहुना बहुशोणितपूरीं योधबळ वाहवी[*] राया;
तेव्हां सुरर्षि वदले,—' सद्यश यो धवलवाह[4] वीरा या ! ' "

---

१ परशुरामानें. २ कर्णास.

३ सावित्री.

४ पांढरे घोडे ज्याचे आहेत असा वीर अर्जुन.

* अर्जुनानें शत्रुसैन्य इतकें मारिलें कीं त्याच्या रक्ताचा प्रवाह सुरू होऊन त्यांत घोडे वाहावत गेले, असें अतिशयोक्तीचें वर्णन आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१८. **समुच्चय**—अनेक पदार्थ, अनेक गुण किंवा अनेक क्रिया यांचा सहवास इष्ट असला, किंवा एकादें कार्य होण्यास एक कारण पुरेसें असतां दुसरीं अनेक कारणें उपस्थित होऊन कार्योत्पत्ति जास्त चांगली झाली असें वर्णन असलें म्हणजे **समुच्चय** होतोः—

"मज शंतनु-गंगा-गुरु-गो-विप्रवर प्रसाद पात्रास,
या त्रासभयभ्रंशें दुर्गति, ऐसा धरूं नको त्रास."
"भुलला धर्म द्युतिला, धृतिला, मतिला, तथा तिच्या स्तुतिला,
न करुनि विचार, जावी मागें म्हणवुनि म्हणे तथास्तु तिला."

पहिल्या आर्येंत भीष्म म्हणतो कीं मला इतक्यांचे वर असतां दुर्गति कशी प्राप्त होईल? दुसऱ्या आर्येंत असें वर्णन आहे कीं सावित्रीचें तेज इत्यादि गुण समुच्चयेंकरून (किंवा पृथक्पणें) यम-धर्मास भूल पडण्यास कारण झाले. याचीं आणखी उदाहरणें:—

(१) "तवें संततिच न केवळ, बुडविलि निखिला महीहि या पापें,
निर्दय, निर्भय, निस्त्रप, भस्म करावाचि हा तुवां शापें."[1]

(२) "सुनीतिपथ सेवणें, मलिन कर्म मानेचि ना,
घडो मरण, नावडे खलजनाप्रति प्रार्थना;
विपत्तिसमयांतही प्रकटवीच ना दीनता,
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता?"

१९. **समाधि**—एका कारणाचा व्यापार चालू असतां किंवा पुरा होत असतां आणखी एका कारणाची कार्ये उत्तम रितीनें घडून येण्यास भर पडली किंवा कार्यास बळकटी आली असें वर्णन असतां **समाधि**-नामक अलंकार होतोः—उदाहरण—"आम्ही तेथें गेलों तों अगोदर तें सुंदर मंदिर आणि त्याच्या सभोंवतालचें तें कुसुमित उपवन हीं पाहू-नच मन थक्क झालें, आणि आमच्या प्रवासश्रमाचा परिहार होऊन आम्ही आराम पावलों. त्यांत आणखी त्या विनयशील यजमानानें आमचा फारच आदरसत्कार केला. तेव्हां मग कांहीं दिवस तेथेंच मुक्काम केला."

---

1 हें कृष्णानें गांधारीस म्हटलें आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अर्जुन श्रीकृष्णास म्हणतो—

" मी आधींच कांहीं नेणें,
वरी कवळिलों मोहें येणें,
श्रीकृष्णा, विवेक या कारणें,
पुसिला तुज. "

" आधींच उल्हास, आणि त्यांत फाल्गून मास, ' हें समाधिचें अगदीं लौकिकांतलें उदाहरण आहे.

टीप—समुच्चय आणि **समाधि** यांतला भेद असा आहे कीं समुच्चयांमध्यें सर्व कारणें प्रवळ असून सर्वांमिळून कार्य झालें असें वर्णन असतें. समाधीमध्यें एकेक कारण कदाचित् प्रवल असेल. परंतु अमुक एक कारण आकस्मिक घडून कार्यसिद्धि सुलभ आणि त्वरित झाली असें सांगितलेलें असतें.

२०. **असंगति**—कारणभूत क्रियेचा व्यापार एका स्थलीं चालून कार्यभूत क्रिया स्थलांतरीं घडते अथवा दृष्टोत्पत्तीस येते, असें वर्णन असलें म्हणजे **असंगति** अलंकार होतो; उदाहरण, ' चोर सांडून सन्याशास सुळीं. ' ' सोन्याला गळूं आणि गोम्याला वाधणा. ' " घटका पाणी पिते आणि तास टोले खातो. " " खल हा एक विलक्षण तऱ्हेचा कृष्ण सर्प आहे; तो एकाच्या कानाला चावतो, आणि त्याची विषबाधा दुसऱ्यास होऊन त्याचा प्राण जातो—नाश होतो ! "

" पांडव जेवुनि आधीं, मग राक्षस जीवितास आंचवला,
सन्मणि न कोटिलक्षा ये, येतो काय राक्षसा चवला ? "

जो जेवतो, तो आंचवतो. पण येथें जेवणाची कारणभूत क्रिया करितो भीम आणि आंचवण्याची कार्यरूप क्रिया करितो बक राक्षस.

" हार विलासवतीनें केला हा लक्ष्मणप्रसूनें कीं,
हारविला सवतीनें क्षितिनें; पुजिला सुरप्रसूनें कीं. "

भानुमतीनें दुर्योधन हा आपल्या गळ्यांतला हार केला, परंतु तिची संवत जी पृथ्वी, तिनें तो हरविला. हा हार गळ्यांत घालणारी भानुमती आणि तोच हार हरवणारी पृथ्वीः म्हणून अलंकार असंगति.

१ दोन आण्यांस. २ दुर्योधनाची स्त्री भानुमती.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२१. **विशेष**—क्रियेचें कारण किंवा आधार नाहींसा झाला असतांही कार्य चालू आहे, किंवा एका कारणास अनेक कार्यरूपी फळें आलीं आहेत, अथवा एक कार्य करीत असतां दुसऱ्याच अनपेक्षित कार्याची सिद्धि झाली असें वर्णन असलें म्हणजे **विशेष** अलंकार होतो. तसेंच गुणांचें दोषत्वेंकरून अथवा दोषांचें गुणत्वेंकरून वर्णन असतें, तेथेंही **विषम** अलंकारच समजतात. 'सुंभ जळलें तरी पीळ जात नाहीं,' हें याचें लौकिकांतलें उदाहरण आहे. 'करायला गेलों एक, आणि झालें दुसरेंच,' असेंही यांत वर्णन असतें.

भारतीय-युद्धानंतर रणभूमीचें अवलोकन करीत असतां, भीमानें ऊर विदारण करून पडलेल्या दुःशासनास पाहून गांधारी कृष्णास म्हणते:—

"हा दुःशासन कृष्णा, मेला ही दाखवी न पाठ; उनीं—
पडला पहा उताणा, अभिमान असे असूंस पाठवुनी."

जरी प्राणरूपी आधार गेला तरी अभिमान अजून आहेच, असें येथें वर्णन आहे.

"ऐसी भूभर सारा साराया यादवेन्द्र करि युक्ती;
वीरांसि सुगति द्याया, त्या स्वयशःश्रवणसादरां मुक्ती."

कृष्णानें एका उद्देशानें जी युक्ति केली, तिच्या योगानें भूभार सरला, वीरांस सुगति मिळाली आणि यश श्रवण करणारांसही मुक्ति मिळाली. याप्रमाणें एका क्रियेस तीन फळें आलीं.

"तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे,
मला वाटे मोठा तुजजवळि हा दोषचि वसे;
शुका, तीच्या योगें सतत पिंजऱ्यामाजि पडशी,
गड्या, स्वातंत्र्याचीं अनुपमसुखें सर्व मुकशी."

कृष्णशास्त्री.

येथें शुकाची वाणी हा गुण नसून दोषच आहे असें वर्णन आहे.

२२. **विभावना**--प्रतिरोधक सामुग्री हजर असतांही अभावरूपी किंवा भावरूपी कार्याची उत्पत्ति झाली असें वर्णन असतें, किंवा प्रत्यक्ष कारणावांचून कार्य झालें अथवा विरुद्ध कार्यापासून कार्योत्पत्ति झाली असें वर्णन असतें, तेथें **विभावना** जाणावी.—

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" आला प्रकाश नेत्रीं, अंधत्वाचा वरें नुरे गंध,
परि भूप पुत्रमोहें केला पहिल्यापरीसही अंध. "
वनपर्व.

" गेलें अंधपण, नूमजला तो हें, झाला पुत्रमोहें पुन्हा अंध."
सावित्रीगीत.

यमाच्या वराच्या योगानें डोळे आले असतांही पुन्हां पुत्रशोकानें राजास अंधत्व आलें.

" ऐसें वदोनि देवी ती—' क स राजा ' असें पुसे धर्मा,
कांपे चळचळ तो प्रभु, घालुनिहि अभेद्य सत्तपोवर्मा. "

यांत अभेद्य सत्तपोवर्म घातलेलें असूनही गांधारीला पाहून धर्म भीतीनें कांपूं लागला असें वर्णन आहे.

" सहदेवातें कुंती पोटाशीं धरुनियां म्हणे ' हाय ! '
गाय सुकविजन यश, परि वीरांची परमदुःखिता माय. "

वीरांचें यश कविजन गातात, परंतु त्यांची आई दुःखितच असते.

" अल्पावशेष केला अवयव खाउनि वृकादिकीं जरि तो,
तरि दृष्टिप्रीति पहा कृष्णचतुर्दशींतिथीन्दुसा[2] करितो. "

" न ताप निवला, तृषा न शमली, रजें माखलें—
शरीर, अजुनी नसे कमल एकही चाखलें;
न सोंड उजळूनियां कमलिनी गजें स्पर्शिली,
हकाक[1] मधुपीं पहा, अधिंच काय आरंभिली ! " कृ. शा.

येथें भ्रमरांनी कारण नसतांना हकाक केली असें वर्णन आहे.

२३. **विशेषोक्ति**—कारण सामुग्री हजर असूनही कार्योत्पत्ति होत नाहीं असें वर्णन असतां विशेषोक्ति होते. विशेषोक्तींत विभावनेच्या उलट वर्णन असतें. उदाहरणें:—

(१) " कथा सुरभि त्या भल्या स्वजननीहुनी वाटती,
शिशूंस जरठांसही निरखितां रसें दाटती;
दुहोत भलते सदा, तरि न लेशही आटती,
स्ववत्समल भाक्षिती, तरि न सर्वथा बाटती. " केका.

---

१ दुःखाला आवडणें. २ वद्य चतुदशीचा चंद्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(२) " व्याघ्रीपरी भय करीत उभी जरारे,
देहासि रोग करिती रिपुतुल्य मारे;
आयुष्य भिन्नघटनीर सरे तसें हें,
पापें तथापि जन आचारितात पाहें ! " वामन.

(३) " सहदेवासि म्हणे, त्वां कां रे जीव न दिला ? परवश स्त्री–
काशि देखिली ? सहाता दासीचाहि न विलापरव शस्त्री."

(४) " तो स्वभावानें एवढा दुष्ट, पण कोणाचा कधीं घातपात करणार नाहीं. "

२४. काव्यलिंग—' म्हणून ' किंवा ' कारण ' हे शब्द अध्याहृत असून शब्दार्थावरून किंवा वाक्यार्थावरून कार्यकारणभाव व्यक्त होत असला म्हणजे काव्यलिंग अलंकार होतो. " ह्या आर्येचा अर्थ आपणच लावाल; आपण मोठे पंडित आहांत ! "

" रडत नसें पुत्रातें, स्वर्गा गेला, न सोडिली संधा,
कृष्णा रडतें, मी या दीना हतवांधवा धवां अंधा. "

गांधारी म्हणते, " दुर्योधन खऱ्या क्षत्रियासारखा आपलें ब्रीद राखून स्वर्गाला गेला; त्याच्यासाठीं मी कशाला रडूं ? तर ज्याचे सर्व आप्तइष्ट मेले, त्या अंध पतीकरितां मी रडतें. " या गांधारीच्या बोलण्यांत, कार्यकारणभाव असून तद्दर्शक ' म्हणून ' इत्यादि शब्द गुप्त आहेत.

" संशप्तकमथनीं कारि पार्थ महारथसहस्रसम कर्म;
धर्मप्रसाद माथां, अंगीं भगवत्प्रसाद दृढ वर्म. "

यांत अर्जुनास एवढा पराक्रम करण्यास कारणीभूत झालेल्या गोष्टी ' म्हणून ' इत्यादि शब्द न घालितां सांगितल्या आहेत. या अलंकारांत दोन वाक्यांमध्यें ' म्हणून, ' ' कारण, ' ' कारण कीं, ' 'यासाठीं ' हे शब्द अध्याहृत असतात. याचीं आणखी उदाहरणें:—

(१) " शब्द तुझा मधुर, परी वाटे हृदयीं वसे कपट फार,
वाढविती जे तुज, त्यां सोडिशि होतांचि कोकिला, थोर. "

१ आपलें ब्रीद. २ या धृतराष्ट्राकरितां.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(२) " वारा, वणवा, थंडी, वीज अशीं तुज भयें बहुत असती,
वृक्षा, करिं उपकारा; चंचल ही मृत्युलोकिंची वसती "
कृष्णशास्त्री.

(३) " ज्याचा संकल्पाचि हें अद्भुत ऐसें अतर्क्य विश्व रची,
अत्यद्भुत पुरतें कां नोहे, शिल्पी जयास ईश्वरची ? "

(४) " गाती अजातरिपुच्या हे सर्व परा सुयोधना, महिम्या,
द्यावी त्यासचि वसुधा निरवूनि परासुयोधनामहि म्यां. "
मोरो.

(५) " अनेक स्वापदांचिया थाटीं । भयें कोणी न येती निकटीं,
म्हणती पतिव्रता दृष्टीं[1] । भस्म करील आमुतें. "
मुक्तेश्वर.

७–स्वतंत्र पदार्थांच्या योगानें होणारे अलंकार.

—:०:—

२९. **सम**—दोन पदार्थांचा यथायोग्य योग वर्णिला असतां **सम** अलंकार होतो. हा योग दोन चांगल्या अथवा वाईट वस्तूंमध्यें असतो. उदाहरणें:—

(१) " श्रीकृष्ण रुक्मिणीला, श्रीकृष्णा रुक्मिणी जशी, आतां–
दमयंतीस नळ, नळा दमयंती, आयकों जनीं गातां. "
मोरो.

(२) " ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी,
गंधें युक्त फुलें, फळें हि असती ज्याचीं सुधेच्या परी;
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीच्या मुखींचें, भला–
आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला. "
कृष्णशास्त्री.

(३) " असें असत बोलते सतत ऐकते, मीच ते–
प्रमाण न म्हणों जरी उचित माझिया नीचते. "
मोरो.

---

१ दृष्टीनें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२६. विषम—एका पदार्थाच्या दोन पदार्थांशीं भिन्नकाळीं झालेल्या योगांमध्यें तफावत दाखविलेली असली, किंवा एकाद्या पदार्थास प्राप्त झालेली दशा अयोग्य आहे, किंवा कोणास वाईट दशा प्राप्त झाली असतां तो त्यांतच समाधान मानून राहात आहे असें वर्णन असलें, किंवा दोन अननुरूप वस्तूंचा संबंध जुळून आला असें वर्णन असलें, किंवा इष्टार्थ साधावयास पाहात असतां अनिष्टच होऊन गळयांत धोंगडें आलें, असें वर्णिलेलें असलें, म्हणजे त्यास विषम अलंकार असें म्हणतात.

टीप—हा अलंकार बराच महत्त्वाचा असून यांत सांगितलेल्या प्रकारचीं वर्णनें कवितेंत व इतरत्र पुष्कळ आढळतात. तीं स्वाभाविकच मनोहर आणि चटकदार असतात. विषमाचे अनेक प्रकारही करीत असतात. परंतु त्यांची आपल्यास गरज नाहीं. या अलंकाराचीं कित्येक निरानिराळया तऱ्हेचीं उदाहरणें मात्र पुढें देतों.

दुर्योधन धुळींत तळमळत पडला असतां त्याच्या स्थितीचें वर्णन—

(१) " सूत म्हणे, काय पुससि ? ज्याचें न कधींहि पादतळ मळलें,
तें राजरत्न ऐसें—जैसें धूळींत याद—तळमळलें;
ज्याच्या अंगीं अयुतद्विपबळ, ऐसा समर्थ लोकेश,
जो पर-शत-नियमन-पटु नियमी कष्टेंकरून तो केश. "

मोरो०

(२) "ज्याचे पूर्वीं वसंतीं परिमलबहलीं आम्रवृक्षीं सुखाचे,
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्त भृंगांगनांचे;
कैसे त्या कोकिलातें अधम करिति हे कावळे चंचुघाता,
कोठें थारा मिळेना, गरिब पळतसे वांकुडा काळ येतां."

(३) " मदनशत्रुशरासन हें महा,
मदनमूर्तिच केवळ राम हा;
करिल सज्ज कसा धनु आपण,
अहह, दारुण तात ! तुझा पण. "

वामन.

(४) द्रौणि म्हणे, " हा किमपि न यश आलें आमुच्या धनुष्यातें;
बहुधा सहाय होउनि यश द्यावें हें नव्हे मनुष्यातें;

---

१ द्विप—हत्ती. २ शत्रु.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नसतें असें, तरि तुझी होती राजा! अशी दशा कांगा ?
लागावी कस्तूरी, पुष्कळ त्या धूळ लागली आंगा;
त्यास क्रव्याद* जपति, होते वहु जपत ज्या सदा ज्ञाती,
गेली कोठें गा! ती शक्राचीशी तुझी सदाज्ञा ती ?
दुःशासनादि सोदर कोठें, कोठें तुझा सखा कर्ण ?
कोठें शकुनि-जयद्रथ ? ज्यां भाग्य तुझें, जसें झषा अर्ण,
कोठें छत्र तुझें तें, वा केलीं आजि काय तीं चत्ररें ?
गमति उतरलीं विधिच्या जीं गगनांतून आयतींच वरें."

हें दुर्योधनाची गदायुद्धानंतरची स्थिति पाहून अश्वत्थाम्यानें म्हटलें आहे. पुढें दुर्योधन त्यास व इतरांस आपल्या स्थितींत समाधान मानून उत्तर देतोः—

(५) नेत्र पुसुनि सर्वांतें भूप म्हणे, "शोक काय हा ? साचा—
मर्त्यांचा केव्हां तरि भस्माचि विपदोक[१] काय होयाचा;
तरि होता भस्म, जरी व्यसनीं संभाळितों न टेंकेला,
मानी हांसुनि म्हणते मज—'वीराभिनय या नटें केला;'
पडला शात्रवशस्त्रें[३] समरांत स्यमंतपंचकीं काय;
कां करितां शोक उगे ? पडलों रोगार्त मंचकीं काय ?
पावे अनंत-सुकृतें क्षत्रिय समरांत कायहानि बरा,
होइल वांचोनि सुचिर रुचिर गृहीं, लाभ काय हा निवरा ?
उरलें तेज, अधर्में वधिला धार्मिक परें[४]; वरें झालें !
आलें मनासि माझ्या तीक्ष्णहि परि पथ्य हें मना आलें;
मरतों बहु भाग्याचा मी निहतज्ञातिबांधव स्पष्ट;
उरतों, शोकें झुरतों, स्वजनवियोगा—असें नसे कष्ट."

पुढील आर्या हरिश्चंद्राख्यानांतील आहेतः—

(६) देवि म्हणे, सखि धरणी, कांत पडुनि धुळिउपरि मळला गे,
त्या देवा लागावें रज, नवनव ज्यासि सुपरिमळ लागे.

---

* राक्षस; नरमांसभक्षक. १ पाणी. २ दुःखाचें स्थान. ३ शत्रूंच्या. ४ शत्रूनें.
५ तिखट. ६ हितकारक. ७ औषधिपदार्थविशेष. ८ दुःखकारक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२७. व्याजस्तुति किंवा व्याजोक्ति—बाह्यात्कारें आणि पर्यायानें स्तुति किंवा निंदा करून उपहासानें जेव्हां आपण बोलतों, तेव्हां हा अलंकार होतो. ' आपण मोठे शाहाणेच आहां ! ' यांत बोलणाराचा खरोखर शाहाणे असें म्हणण्याचा उद्देश नाहीं. ' मी महामूर्ख, म्हणूनच तुझ्या नादीं लागलों ! ' यांत बोलणाराचा पर्यायानें दुसऱ्यास मूर्ख म्हणण्याचा उद्देश आहे. पुढील भीष्माची अर्जुनास उक्ति सुप्रसिद्धच आहे:—

(१) " पितामह वदे तदा, प्रबळ तूं पृथानंदना,
रमेश रथिं सारथी, चतुर, वागवी स्यंदना;
स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तूं रे नवा,
भिडें रणधुरंधरा, जय घडो सुखें वा न वा. "
वामन.

नलराजानें हंस धरिला असतां तो त्यास उद्देशून म्हणतो:—

(२) " वधुन माझी हे कनकरूप काया,
कटक-मुकुटादिक भूषणें कराया—
कशी आशा उपजली तुला राया,
नाहिं कांहीं तूजला दयामाया ? " रघु. पं.

दुर्योधनानें शल्याला कर्णाचा सारथी होण्यास विनविलें, तेव्हां शल्य त्यास रागानें म्हणतो:—

(३) " हो म्हणसी सूताचा सूत, भला गा भला, मला पदवी—
देसी, हे सीमा तव सुज्ञपणाचीच हें असें वदवी;
जातों गृहासि, झालों कृतकृत्य, प्राप्त मोक्षसम यज्ञ—
प्रेक्षुनी धालों कीं, तूं धृतराष्ट्रसुता, गुणज्ञ, समयज्ञ ! "

२८. सार—एकाद्या पदार्थाचे गुण पायरीपायरीनें चढत जाऊन शेवटीं अगदीं शेवटच्या गुणाचें अभिधान झालें असलें म्हणजे त्यास सार असें म्हणतात.

एकदां अर्जुन धर्मावर फार रागावून त्यास मारावयास प्रवृत्त झाला असतां कृष्ण त्यास म्हणतो:—

(१) " ऐसें असतां भ्राता, तोहि स्वज्येष्ठ, त्यांतही राजा,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तत्रापि धर्मकोविद, बहु मानी ज्यास शांतनव आजा;—
पांडुसमातें त्यातें, धर्मज्ञा, मारितोसि पामरसा,
रोदन करील येणें विसरविला आठवून राम रसा. ”

विदुर धृतराष्ट्रास म्हणत आहे:—

(२) “ राया, कुलार्थ पुरुष, ग्रामार्थ कुलहि समस्त सोडावें,
ग्रामहि देशार्थ, मही आत्मार्थ, बुधें भलेंचि जोडावें. ”

(३) “ पटुत्व सकलेंद्रियीं, मनुजता, सुवंशीं जनी,
द्विजत्वहि दिलें भलें, बहु अलभ्य जें कीं जनीं;
यशःश्रवणकीर्तनीं रुचि दिली; तरी हा वरा—
म्हणे अधिक द्याच कीं, अखिल याचकीं हावरा ! ” केका.

(४) “ तत्सद्गुणें प्रमुदितें झालीं केवळ मनांत न तिघें तीं—
सकलें सदैव तापसवृंदेंहि तपोवनांत नति घेतीं. ”

हें सावित्रीच्या संबंधानें म्हटलें आहे.

(५) पुढील श्लोक सर्वप्रसिद्धच आहे —

आधींच मर्कट, तशांतही मद्य प्याला,
झाला तशांत जरी वृश्चिकदंश त्याला;
झाली तयास नदनंतर भूतबाधा,
चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा ? ”

अभिमन्यु युद्धांत पडल्याचें ऐकून अर्जुन म्हणतो—

(६) “ कुंतीस काय सांगूं, कृष्णेला दाखवूं कसें वदन ?
दुष्कर मला सुभद्रासांत्वन, दुर्दर्श उत्तरासदन. ”.

(७) “ सर्व जन्मामध्यें मनुष्यपण सार आहे; मनुष्यपणांत कुलीनत्व सार आहे; कुलीनत्वांत धार्मिकत्व, आणि धार्मिकत्वांत सदयत्व. ”

(८) “ दुधाहून मध गोड; मधाहून सुधा गोड; सुधेहून कविवाणी गोड; आणि ज्याला जें आवडतें तें त्याला सर्वांत गोड ! ”

२९. **परिकर.**—वाक्यांत साभिप्राय किंवा सहेतुक विशेषण असलें, अथवा विशेष खुबी ठेवून गुणाचें अभिधान चालविलेलें असलें, अर्थात् ज्या विशेषणाचा उपयोग करावयाचा, त्यांतील गुणांचें अभि-

१ पृथ्वी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धान पुढील वाक्यार्थावर धोरण ठेवून केलेलें असलें, म्हणजे त्यास परिकर असें म्हणतात. " अहो धनपाल, या गरीबावर दया करा !" असें म्हटलें असतां, गरीबावर दया करण्यास धन पाहिजे, तें आपल्याजवळ आहे असें धनपाल या नांवाचा उल्लेख करून अभिधान केलें आहे.

इंद्र मेनकेला विश्वामित्राचा तपोभंग करण्यासाठीं जावयास सांगत असतां ती म्हणते,—

" मी अबला, भीरु, कशी साहों त्या गाधितनयतेजातें,
भ्यालासि असा दुःसह मानुनि ज्या तूंहि सुरपते ज्यातें. "

ग्रामध्यें ' अबला ' ' भीरु ', आणि ' सुरपति ' या तीन विशेषणांत विशेष खुबी काय आहे हें लक्षांत येईलच.

नारद सावित्रीच्या बापास "प्रभु मृत्युंजय तुम्हां सदा शिवे[1] हो !" असा आशीर्वाद देतो. त्यावर संकट येणार तें मृत्यूकडून येणार होतें, म्हणून ' मृत्युंजय ' हें साभिप्राय विशेषण आहे.

" रथचक्र उद्धरूं दे, श्रुतिशास्त्रज्ञा, महारथा, कुलजा,
साधु न हाणिति अरिला, पाहति अधृतायुध, व्यथाकुल जा. "

हें कर्णानें अर्जुनास म्हटलें आहे. आपण अधृतायुध असतां अर्जुनानें आपणांवर शरवृष्टि करूं नये या उद्देशानें कर्णानें त्यास श्रुतिशास्त्रज्ञा, कुलजा, इत्यादि विशेषणांनीं संबोधिलें आहे.

विशेष्य साभिप्राय असलें म्हणजे त्यास **परिकरांकुर** असें निराळें नांव देतात. परंतु अशा ठिकाणीं विशेषणाचाच उपयोग नामासारखा असतो, यासाठीं तें साभिप्राय विशेषणच होय. " असें हि न घडे जगन्नायकीं " यांत ' जगन्नायक ' हें मूळचें विशेषण आहे.

" थोरपण अनंताचें अनंत वर्णील, काय कवि-हीर ? "

मोरोपंताच्या केकावलींत या अलंकाराचे प्रसंग बरेच आहेत.

२०. **चेतनगुणोक्ति**— अचेतन पदार्थ सजीव आहे अशी कल्पना करून वर्णन केलें असतां **चेतनगुणोक्ति** हा अलंकार होतो. उदाहरण—" हा बागवान यंदां ठार बुडाला होता, पण सरते शेवटीं त्यास आंबराईनें हात दिला. " यांत आंबराई ही कोणी

1. कल्याणकारक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सजीव प्राणी किंवा मनुष्य आहे अशी कल्पना केली आहे. अभिमन्यु शत्रूंच्या मध्यें सांपडला असतां आपल्या जन्मपत्रिकेस उद्देशून म्हणतो,—

" कार्ष्णि म्हणे, पळ इकडे पाहुत सज्जन, न पत्रिकेतुकडे,
चर्मांपरि लिहिले कीं वपुचें मज्जनपात्रिके, तुकडे. "
" दावी रडोनि झाले जे गंध उगाळितां स्वहात किणी,
भीम म्हणे, ' विधिलेखनि! लेखनिं नच वचकलीस; घातकिनी !"

अचेतन पदार्थांस उद्देशून असलेल्या अन्योक्ति या सर्व या अलंकाराचींच उदाहरणें आहेत.

३१. **प्रश्नालंकार**—बोलणारा अशा रितीनें प्रश्न करितो कीं त्याचें उत्तर काय येणार हें उघड ठाऊक असतें, किंवा तेंच उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नसतें. असा प्रश्न केल्यानें बोलणारास जी गोष्ट दुसऱ्याला सांगावयाची असते, ती श्रोत्याच्या मनावर चांगली ठसते. याला **प्रश्नालंकार** असें म्हणतात. " असें करणें तुम्हांस शोभतें काय ! " याचें उत्तर शोभत नाहीं हेंच. " तुम्हांसारख्या थोरांचा आश्रय केल्यावर आम्हास काळजी कशाला पाहिजे ?" अर्थात् काळजी करण्याचें कारण नाहीं, हेंच उत्तर. याचीं आणखी उदाहरणें:—

(१) " सकल ऐश्वर्य घेऊन भेटी । प्रभो आली पायें लोटीं,
तो सभाग्य कीं अभाग्य सृष्टीं । काय म्हणिजे ? सांग पां. "
मुक्तेश्वर.

(२) " सिकतेमाजी दिव्यरत्न । जरी सांपडे न करितां प्रयत्न,
तरी चतुरीं करावें जतन । किंवा अव्हेर करावा ? "
श्रीधर.

(३) " अपराध काय झाला, रुसवा केला दयानिधे, कां जी ?
अमृत प्राशन करवुनि पाजावी काय शेवटीं कांजी ? "
मोरो०

(४) " व्रणार्थ पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे—
सरादि रिपु मन्मनीं; अहि न काळ भेका कसे ? "
मोरो० केका०

१. लक्ष्मी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(५) " कोण ज्ञाता राज्यस्वीकार करील, आधि ज्यामाजी ? "
(६) " करिल कसें मांजर जे दुष्कर हरिहननकाजें वाघास ? "

टीप—या अलंकारास संस्कृत साहित्यांत फारसा मान नाहीं. तथापि सांप्रत वक्तृत्वाचा उपयोग व्यवहारांत फार झाल्यापासून त्याचें महत्त्व वाढलें आहे, आणि तो वक्त्यांचें बोलण्यांत पुष्कळदां येतो. इंग्रजी वक्त्यांच्या बोलण्यांत हा फार वेळां येतो आणि त्यामुळें मराठींत त्याचें अनुकरण पुष्कळ करितात. यास इंग्रजींत Erotesis किंवा Question of Appeal असें म्हणतात.

३२. परिसंख्या—अनेक पदार्थांमध्यें प्रसंगानुसार एक पदार्थ निवडून त्याज्य पदार्थाचा उघड किंवा गर्भित उल्लेख केलेला असतो, किंवा एका पदार्थाची आवड व दुसऱ्याची नावड दाखविलेली असते, तेव्हां परिसंख्या नामक अलंकार होतो. यांचीं उदाहरणें:—

(१) " शूर भुजांनीं क्षत्रिय, शब्दांनीं विप्र, पार्थ चापानें;
केवळ मनोरथांनीं कर्णा, तूं शूर, न प्रतापानें. "

मोरो०

यांत पहिल्या वाक्यांत भुजशौर्य निवडून काढलें आहे; आणि दुसऱ्यांत कर्णाच्या मनोरथशौर्याची निवड करून त्याची निंदा केली आहे.

(२) " गुणें वावडीस, सुदृढ प्रेमाचि स्त्रीस आवरायाचा,
तो तुटतां यत्न नसे कांहीं; गेलाचि आव रायाचा. "
(३) " श्रुतेंचि कीं श्रोत्र, न कुंडलानें,
दानेंचि कीं पाणी न कंकणानें;
साजे तसा देहहि हा न आनें,
परोपकारेंचि न चंदनानें. "

वामन.

(४) " सारथिनें रक्षावा स्वरथी, राजा जसा अमात्यानें,
मानावें पितरासम त्या हितकर्त्या सुहृत्तमा त्यानें. "
(५) भीम म्हणे, " रे धृष्टद्युम्ना, कळलासी आज पोकळसा;
वचनासि कुळज,—न शिरा; स्वरासि,—न देवता जपो कळसा. "
(६) " कोणा अंध म्हणावें, न दिसे सन्मार्ग उघडही ज्यास,
कोण बधिर, जो नाहीं परिसत केल्या हितोपदेशास;

१ सिंहास मारण्याचें काम. २ दोरा. ३ पतंगास.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कोण दरिद्री, ज्याच्या हृदयीं तृष्णा सदा विशाल वसे,
श्रीमान् कोण म्हणावा, जो नर संतुष्टचित्त नित्य असे. "
कृ० चिपळूणकर.

(७) " नररत्न तोचि, तूंचि स्त्रीरत्न, उदंड आडनांवांचीं,
न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि आडनावांचीं. "

(८) " त्याच्या राज्यांत चित्रें रंगविण्याच्या कामांत मात्र वर्णसंकर[1], कवितेमध्यें मात्र बंध, शास्त्राचींच कायती चिंता, छत्रास मात्र सुवर्णाचा दंड, धनुष्यास मात्र गुणच्छेद[2], चंद्रास मात्र कलंक असे; सोंगट्या, बुद्धिबळें यांच्या पटांतली मात्र घरें रिकामी दिसत; स्त्रियांच्या कुरळ्या केशांस मात्र वक्रता असे; त्यांच्या पादभूषणास मात्र वाचालपणा असे, विवाहकालींच काय तें करग्रहण[3] होत असें; होमाच्या धुरानें मात्र अश्रुपात होत असे; घोड्यांनाच काय ते फटके बसत; मदनधनुष्याचे मात्र टणत्कार होत असत; शत्रूंचा अभाव झाल्यामुळें त्यांच्या धनुष्यांचा टणत्कार होत नसे. "
कादंबरीसार.

८—शब्दालंकार.

३३. अनुप्रास—स्वर प्रायः भिन्न असून व्यंजनें अभिन्न असणें, हें अनुप्रासाचें लक्षण. एका व्यंजनाची अनेकवार आवृत्ती झाल्यसा (१) **वृत्त्यनुप्रास** व अनेक व्यंजनांची अनेकवार आवृत्ती झाल्यास (२) **छेकानुप्रास.** तात्पर्य मात्र भिन्न असून शब्दाची आवृत्ति झाल्यास (३) **लाटानुप्रास.**

" पर्यंकावरि पडला पांडुपृथापुत्र पावला पीडा;
वैरिविजित विक्षतवपु विमुखत्वें वीरवर वरी व्रीडा[4]. "
मोरो०

पहिल्या अर्धांत प-काराचा वृत्यनुप्रास असून, दुसऱ्या अर्धांत व-काराचा वृत्यनुप्रास आहे. 'वीरवर वरी व्रीडा' यांत व-काराची व र-काराची अशी दोन व्यंजनांची चार वार आवृत्ति झाल्यामुळें, छेकानुप्रास समजावा. या छेकानुप्रासांत व्री-खेरीज व्यंजनें असंयुक्त आहेत.

---

१ मिसळ २ तोडणें ३ दुसरा अर्थ, कर घेणें. ४ लज्जा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" लज्जाहानि न झाली त्या मुग्धा मजहि मुर्धताता कीं;
म्यां कल्पिली प्रबळता अल्पबळीं, जेविं दुग्धता ताकीं. "

मोरो०

दुसऱ्या अर्धांत 'ल्पि' व 'ल्प' हीं व्यंजनें संयुक्त आहेत. पहिल्या अर्धांत मुग्धं—मुग्ध हा लाटानुप्रास समजावा.

" शक्राचा रुद्र जसा सात्यकिचा धर्म होय कैवारी;
विघ्नें विघ्नेश्वरसा कौरव कटकें पळांत तैं वारी. "

मोरो०

विघ्नें— विघ्ने, हा लाटानुप्रास समजावा.

३४. यमक—व्यंजन किंवा व्यंजनें अभिन्न असून स्वरही अभिन्न असले, म्हणजे यमक झालें.

" कुरुगुरु कवि रवितेजा संप्रति करणार देहसंन्यास;
धन्यास त्यास द्यावें हें यश, देवूं नयेचि अन्यास. "

मोरो०

'कुरुगुरु' व 'कवि रवि' हें साधें यमक; कारण दोन्ही उदाहरणांत अभिन्न व्यंजन एकच असून, अभिन्न स्वर दोन आहेत.

चरणाच्या अगदीं शेवटीं यमक असतें त्यास **अंत्य-यमक** म्हणतात. अंत्य यमकांत स्वरही एकच असला, म्हणजे तें अगदीं साधें झालें. मराठी कवितेंत नेहमीं श्लोकाच्या पहिल्या दोन व शेवटच्या दोन, अशा चरणांस धरून अंत्य यमक असतें. आर्यामध्यें दुसऱ्या व चवथ्या चरणांचा आश्रय अंत्य यमकानें केलेला असतो;—

" एकाग्र चित्त, तनु निश्चळ, मौन वाचे,
जे ये रिती कवळ घेति कथामृताचे,
ब्रह्मा म्हणे—" अजित तूं तुज जिंकणारे
नाहींत यद्यपि, तयां वश तूं मुरारे. "

" टाकूनियां इतर साधनमात्र धन्दा,
तुझी कथा सतत आयिकती मुकुन्दा,
त्यांचें जिणें सफळ, जे भगवत्कथेतें
मानूनि जीवन पिती, त्यजिती व्यथेतें. "

वामन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पहिल्या श्लोकांत दोन्ही स्थळीं अंत्य यमक साधें असून दुसऱ्या श्लोकाच्या पहिल्या अर्धांत तें अगदीं साधें आहे; कारण व्यंजन संयुक्त असल्यामुळें, जरी दोन व्यंजनें दिसत आहेत, तरी स्वर एकच आहे.

देव म्हणे—" ऐक, अशी झाली हा जन्मतां नभोवाणी,
हें सुतरत्न निजकुळा वृद्धिप्रद—जेंवि वारिजा पाणी. "

मोरो०

हेंही साध्या अंत्य यमकाचें उदाहरण आहे.

हें **अंत्य यमक** वाढतां वाढतां अगदीं चरणभर वाढत जातें. चरणभर वाढत गेलेल्या यमकास (२) **चरणयमक** म्हणतात.

" वळवावया करावें काय पतितपावना तप शुभ जनें ?
वळला स्वयेंचि पशुपति देव अतितपा वनांत पशुभजनें. "

मोरो०

हें अकराक्षरी किंवा बाराक्षरी अंत्य-यमक झालें.

" कुरुसैन्यांत गमे, ज्यापरि रंभाकाननांत वारा हो;
त्या विजयश्री देवुनि परिरंभा कां न नातवा राहो ? "

हें अकराक्षरी अंत्य-यमक. पण चरणच ११ अक्षरांचा पडल्यामुळें, हें चरणयमकही समजावें.

अंत्ययमकाप्रमाणेंच आद्य-यमक ही आढळतें.

" घाली उडी तळीं तो तों राक्षस जों पडे रथावरि ती;
झाली सगरसुतगणीं कपिलाची दृक् जसें तसें करिती. "

मोरो०

" मारुतिपार्षतसात्यकिधर्मादिक वीर विप्रभावातें
मानवले, ग्रहवृंदीं बहु जेंवि कवी[1] रविप्रभावातें. " मोरो०

" मारुतिनें रथ शतशा शतशा सादीहि पत्तिही शतशा—
मारुनि रक्तें तटिनी भरिल्या, उदकेंहि वारिदें न तशा. "

मोरो०

" हार विलासवतीनें केला हा लक्ष्मणप्रसूनें कीं,
हारविला सवतीनें क्षितीनें; पुजिला सुरप्रसूनें कीं. " मोरो०

---

१ शुक्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चवथी आर्या ही चरणभर आद्य यमकाचें उदाहरण.

पहिलें अर्ध व दुसरें अर्ध अभिन्न असल्यास, पूर्ण यमक झालें.—

" अनलसमीहित साधी राया वारा महीवरा, कामा—
अनलस मीहि तसा धीरा, यावा रामही, वराका मा.

हें पूर्ण-यमकाचें सुरेख उदाहरण. आहे.

दोन चरणांस जोडणारें यमक असतें, त्यास (३) दामयमक म्हणतात.

" सेवुन संतत पाला संत तपाला यदर्थ कारितात,
तो प्रिय या स्तवना कीं, यास्तव नाकींहि हेंचि वरितात. "

मोरो०

ज्या वेदप्रतिपाद्या प्रतिपाद्या सत्यलोकपति अर्पी,
तें पाप-ताप-वारी वारी विश्वेश्वरासही तर्पी.

मोरो०

पाहिल्या आर्येंत दोन्हीं स्थळीं दामयमक पंचाक्षरी आहे. दुसऱ्या आर्येंत पहिल्या चरणांमध्यें दामयमक आहे तें चतुरक्षरी असून, दुसऱ्या चरणांमध्यें आहे तें द्व्यक्षरी आहे.

कधीं कधीं दामयमक दोन अर्धांस जोडणारें असतें.

" क्षितिपति मत्सुताचि असो तेजाचा मूर्तिमंत हा निकर;
हा निकर मांडिला, तूं देशील कर स्वकीर्तिहानिकर. "

मोरो०

" कृष्णा पहा, सुतेजा जोडा होता जगांत हा रविला;
हार विलासवतीनें जेंवि, क्षितिनें तसाचि हारविला. "

मोरो०

कधीं कधीं दामदायक दोन स्वतंत्र आर्यांस जोडतें. अशा रितीनें पुष्कळ आर्या जोडून त्यांची एक माळका बनविलेली असते. या प्रकारच्या दामयमकाचें सुरेख उदाहरण हवें असल्यास मोरोपंती दामरामायण पाहावें.

यमकाच्या पाठीं व पुढें निराळें व्यंजन असल्यामुळें, प्रत्येक व्यंजनावर जशी काय उडी मारीत यमक चाललें आहे, असा भास झाला, म्हणजे (४) अश्वधाटीयमक झालें. अश्वधाटीयमक जसें चरणाच्या आरंभापासून तसें एकदम मधून किंवा आद्यंतींही गुंफलेलें आढळतें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" गाजत वाजत साजत आज तया जतन करुनि आणा हो,
मजमागें मत्स्यांचा हा रिपुशशिराहुबाहु राणा हो !"
" हांसोनि म्हण हरिसख, हो गाढासन, विकंपधी, धीट,
न धरीं वा दर, हा दर सादर दे वाजवूं पुन्हा नीट."
" अर्जुन म्हणे–' बहु बरें ! '–गांडीवगुणां सुबाण तो जोडी,
सोडी सणणणणणणण, वधग जयद्रथशिरोंवुरुह तोडी."
" तेव्हां पश्चात्तापा वापा तूं पावशील पापानें,
सापानें धरिला प्लव न जगे; वडवडशि तूं जसा पोनें."

मोरो०

यमकत्व हा मराठी कवितेचा मुख्य गुण आहे. अगदा मूळारंभापासून मराठी कविता अन्त्ययमकमय आढळते. ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास वगैरे साध्या कवींनींही निदान एक किंवा दोन अक्षरांचे तरी अंत्ययमक साधलें आहे. वामन, मोरोपंत यांना तर आपल्या कवनास शोभा आणण्यासाठीं या शब्दालंकाराचा पुष्कळ आश्रय केला आहे. मराठींत अनुप्रासही पुष्कळ आढळतो. कित्येक ठिकाणीं मराठी कविता अनुप्रास आणि यमक यांनीं चांगल्या प्रकारें सजविलेली असते. येथें या दोन्ही अलंकारांचीं कांहीं निवडक उदाहरणें देतों:–

अनुप्रास हा जरी केवळ शब्दालंकार आहे, तरी अर्थपोषणास ठीकठिकाणी त्याचा उपयोग केलेला आढळतो. अनुप्रासाची योजना पुष्कळदां उपहास किंवा तिरस्कार दाखविण्यांत अथवा एखादी चटकदार गोष्ट सांगत असतांना, अथवा युद्धाचें किंवा स्वारीचें वर्णन करीत असतांना केलेली आढळते. उदाहरणें:—

युद्धवर्णनपर—

" नरवर गरधर खरतर शर करकर दांत खाऊनी सोडी,
फोडी कवच उरस्थळ, वाटे तो तात त्या द्रुम झोडी."
" म्हणती, हा रजनीवर आचारभ्रष्ट दुष्ट पापिष्ट,
विष्टपकंटक कष्टद. शिष्टद्वेष्टा, धरा, करा पिष्ट;

१ शत्रुरूपी शशींना राहुरूप आहेत बाहू ज्याचे असा. २ स्थिर आसन आहे असा. ३ हे बृहन्नडेला अर्जुनानें [illegible] म्हटलें आहे. ४ दार पिळून.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तो गगन-ग मग अगनगधर खरतर वीर नीरदासारें,
वर्षति अध्वररक्षणदक्षासुरसंघ मस्तकीं सारें;
ते दुंदुभि वाजविती धिमि धिमि धिमि देवलोक आनंदें,
गंधर्व करिति तननन, तत्थैथैथैथैय्य अप्सरावृंदें ! "

उपहासपर.—

" वदला यापरि बा, परि खापरिला परिस तोविं त्या बोध,
तो धन्य आग्रही बा, तैसा न मिळेल केलिया शोध. "
" अर्जुन वर्जुन गर्जुन अर्जुन घे क्षण उगेंचि थोरपण,
किंकिन वृहस्पति म्हणुनि करिलचि वाचाट चाट पोरपण. "
" श्रमला, श्रमला, शम लाज मला न मलाधिला म्हणे, हासे,
स्वकुटुंबपोषणार्थचि धांवे घेऊन शरधनू फांसे "

सामान्य वर्णन—

" ताराररमणमुखी ते तोरारावें रडोनियां त्यातें—
तारा म्हणे, कपींद्रा, तारावें दुःखसागरीं मातें. "
" तेथ ज्ञानविशारद, शारदशशिगौर, गौरवार्ह, कवी,
दुस्तर भवाब्धि पारद नारद येउनि सुनीतिला शिकवी. "
" नळनृप म्हणे, शिवा ती नवरी हो, मन दुजीस न वरी हो,
भैमी म्हणे, शिवे, तो नवरा हो, प्रेम नित्य नव राहो ! "
" कटु परि पटु हरि बटुवरि, अमृताधिक मधुर बोलणें बोले,
पळभरि खळ-करि-चळ-हरि वदला, परि आज कविसभा डोले. "
" तूं समर करुनि न मर अमरसम रघूत्तमांघ्रिनवपद्मीं—
रम, रस घे, अमराचि हो, अमराहित स्वस्थ नांद निजसद्मीं;
तूज यमक्षयवांच्छा झाली, म्हणवून धांवलास रणा,
सरणावर निज निज-जन सहजांसह जा, नये शिवा शरणा. "

मोरो०

प्रत्येक शब्दाचे आरंभीं एकाच अक्षराची आवृत्ति आहे, असा जो वृत्यनुप्रास तो विशेषतः मोरोपंताच्या कवितेंत आढळतो. त्याबरोबर सुंदर वर्णन असलें कीं, तो फारच मनोहर होतो. याचें

१ [illegible] हें [illegible] आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

एक उदाहरण मागें पृष्ठ ७७ मध्यें आलेंच आहे. याचीं आणखी दोन उदाहरणें पाहा:—

(१) " देवि दयावति ! दवडिशी दासाची दुःख दुर्दशा दूर. "
गंगास्तुति.

(२) " भूपा भुजंग भक्ताभीतिद भव्य-प्रभाव तुज भार,
भावी भयें भवानी-भर्ता भगवान् भुले भला फार. " बृहद्दशम.

मोरोपंताचें विचित्र रामायण नामक सर्व काव्य अशा रीतीनें अनुप्रासमय रचिलेलें आहे. यांतील पहिला श्लोक:—

(३) " भवाब्धि सुकवि, कवि-प्रिय करी,
करीशतम हा महोदय हरी;
सुकीर्ति[1] परमा रमाप मिरवी,
रवीडित महा महास्पद नवी. "

आतां सुंदर **यमकांचीं** कांहीं उदाहरणें; यांत मधून मधून **अनुप्रासही** आहेत:—

(१) " सुंदरें मंदिरें दिव्य दामोदरें,
वास तेथें किजे नित्य दामोदरें;
लोक संपन्न ते पुत्रदाराधनें,
दास सायुज्यता श्रीपदाराधनें. " विठ्ठल.

(२) " आठवोनि विपदा शिव पूजी,
अर्पुनी शिवपदासि वपू जी;
आदरेंचि परमा नियमातें,
जो मनांत पर मानि यमातें. "

(३) " पायां नमीं, देइन वंश सारा,
पा यां न मी दे इनवंशसारा;

१ सूर्यानें स्तुत (अशी सुकीर्ती.) २ हा श्लोक विश्वामित्राभिगमन नामक काव्यांतील आहे. दशरथ विश्वामित्रास म्हणतो, "मी पायां पडतों [पण रामास मागूं नका], आपल्या सेवेला कुटुंबांतील सारीं माणसें देईन; पण या इनवंश सारास म्हणजे सूर्यवंशतिलकास मागूं नका. अशा म्हातारपणांत आपला प्रिय-पुत्र परक्यास कोण देईल ? तुम्हांस ' देत नाहीं ' म्हणावयास माझी जीभ लाजत नाहीं—(म्हणजे मी पाहिजे तर साफ नाहीं म्हणतो)" असा भावार्थ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

न या वयामाजि मला जना दे,
न यावया मा जिभ लाज ना दे. ''

आनंदतनय.

(४) " फिरविते रवितें दधिभीतरीं
मिरविते रवितेज नगांवरी;
स्वकरिं ते करि चंचलता, मनीं—
उपरमे परमेश्वरगायनीं. ''

(५) " वाइ, म्यां उगवतांच रवीला—
दाट घालुनि दहीं चरवीला;
त्यांत गे, फिरवितांच रवीला,
सार काढुनि हरी चरवीला. '' वामन.

मोरोपंती यमकांची उदाहरणें मागें कित्येक आलीं आहेतच. आणखी कांहीं सुंदर उदाहरण देऊन पुरे करूं. यांतही मधून मधून चटकदार अनुप्रास आहेतच;—

(६) "असि साधु साधुपतिशीं गांठि पडे. ती जशी अया परिसा,
यापरि साचा हाचि प्रेमळ, याच्याचि या जया परिसा."

(७) " देवांनीं दुंदुभि वाजविले, मेघध्वनि लाजविले.
आशान्त स्तुतिंनीं गाजविले, लोक यशें साजविले. ''

(८) "तुजविण न दीपिके सति कृष्णे! तरतो नयज्ञहि तमातें,
करितों जरि तरि गमता कृष्णेतर तों न यज्ञ हित मातें."

(९) " रविला झांकी गगनीं कुरुगुरु बहुशरभरीं तिमिर विखरी,
लीलेनें नरकेसरी लक्ष चिरी शरभरीति मिरवि खरी. ''

(१०) "तुरवि करूनि परकवचा अंगप तितउ पळसमय मनिं भानें,
भीमानें शर गणिले अंगपतित उपळसम यमनिभानें. ''

[अर्थ—" अंगदेशाचा पति जो कर्ण त्यानें भीमाच्या कवचाला असंख्य बाण मारून त्याची चाळण करून टाकली; परंतु (येथून खुद्द मोरोपंती टीप) यमसम भीमें देहपतित कर्णशर क्षुद्र पाषाणसे मानिले, धैर्यकरून. ''ं]

१. हें दुर्वासास भोजन घातल्यावर धर्मानें द्रौपदीस म्हटलें आहे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(११)" समुपेक्षिलें ठकविलें पृतनामाहिमानका पित्या सहसा,
म्यां मारावे खळ ते कृतनामहि मानकापित्यासह सा."

[द्रोणवधानंतर अश्वत्थामा म्हणतो, " कौरवसेनेच्या प्रतापाचा नगाराच, अशा माझ्या पित्यास ठकविलें असून मी उपेक्षा केली. आतां मी मानकापणाऱ्या धृष्टद्युम्नासह सहाखळ-पांडव-मारावे. "]

३५. श्लेष—वाक्यांत अनेकार्थक शब्द येऊन त्यांच्या अनेकार्थकत्वाकडे दृष्टी पोंचविल्याशिवाय अर्थ चांगला होत नसला म्हणजे तशा रचनेस श्लेष असें म्हणतात. या अलंकारांत नुसत्या शब्दांवर लक्ष ठेवून भागत नसून अर्थाकडेही दृष्टी द्यावी लागते, म्हणून यास अर्थालंकारांतही गणितात. उदाहरणार्थ—दमयंतीची आई दमयंतीची प्रकृति नीट नाहीं असें पाहून औषधाची योजना करूं लागली असतां दमयंती ' औषध नलगे मजला ! ' असें म्हणाली. यांत ' नलगे ' या पदाचे दोन अर्थ आहेत. एक, 'न-लगे' म्हणजे नको. दुसरा, 'नल गे' म्हणजे 'अगे. मला नल हेंच औषध आहे ' म्हणजे नलाला वरण्याची माझी इच्छा आहे असा गर्भितार्थ आहे. श्लेषाचीं आणखी उदाहरणें:—

" शुकभाषणानुकार प्रेमें करितो मयूर, हें चित्र !
श्रवण करतील सज्जन रसिक मनिं धरून जिष्णुचें मित्रे[1] "

शुक=पोपट, पक्षी, शुकमुनी. मयूर=मोर, पक्षी, कवि मोरोपंत.

(२) " रक्षावा धर्म असा करिशी उपदेश, तरि असे मान्य;
रक्षितसों धर्मातें, आम्हांला धर्म ठाउका, नान्य."

येथें धर्म म्हणजे युधिष्ठिर किंवा धर्म, धर्मशास्त्र.

(३) " वरिली सुयोधनें ती, म्यांही भानुकपद क्षमा, तींत—
नर जे हिला न सेविति दवडिति हित ते अदक्ष मातींत."

यांत क्षमा म्ह० क्षमा—क्षांति हा गुण, किंवा पृथ्वी—राज्य.

(४) " चापाच्याचि न केवळ, नरवीरांच्याहि वांकवी कोटी."

यांत कोटी म्ह० धनुष्याची कमान, पक्षी, समुदाय.

(५)"तूं मलिन, कुटिल, नीरस, जडहि पुनर्भवपणेंहि कच साच;
धरिला शिरींहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसी, नाम कच साच."

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१ अर्जुनाचा मित्र कृष्ण.

यांत देवयानी रागानें गुरुपुत्र जो कच, त्याची कच म्हणजे केस याशीं तुलना करिते. यामुळें या आर्येतील विशेषणें अर्थाला दोहींकडे लागतात.

(६) " जरि शुचिमूर्ति, सुवृत्ता, मान्या श्रवणोचितें गुणें मुक्ता,
विद्धा जडाहि ते, हे अगुणाही तीस करि गुणें मुक्ता."

यांत मोरोपंतांनीं मुक्ता म्हणजे मोतीं आणि मुक्ताबाई यांचें साम्य दाखविलें आहे. परंतु मुक्ताबाई ही मोत्यापेक्षा श्रेष्ठ आहे असेंही वर्णन आहे, म्हणून यांत व्यतिरेकही आहे.

९—काव्य-गुण.

साहित्यशास्त्रामध्यें काव्याचे उत्तम गुण म्हणून सांगितले आहेत ते १ प्रसाद, २ ओज, आणि ३ माधुर्य असे तीन आहेत. हे गुण म्हणजे मागें जे रस सांगितले आहेत त्यांचे परिपोषक आहेत; किंवा त्या रसांची परिपूर्णता असेंही म्हणावयास चिंता नाहीं. त्याचप्रमाणें ते निरनिराळ्या अलंकारांचेही परिपोषक असतात. वर्णनामध्यें निरानिराळे रस किंवा अलंकार ज्या रितीनें साधले असतील त्याप्रमाणें हे निरानिराळे गुण उत्पन्न होतात.

(१). **प्रसाद**—अगदीं सहज रितीनें उत्तम वर्णन झालें आहे, आणि स्वच्छोदक जसें प्रसन्न असतें, त्याप्रमाणें ज्या वर्णनांतील आशय तेव्हांच स्पष्टपणें ध्यानांत येतो, अर्थ लक्ष्यांत घेण्यास बिलकूल कष्ट करावे लागत नाहींत, वाक्य ऐकल्याबरोबर अर्थबोध होतो, तेथें **प्रसाद** हा गुण असतो, आणि अशा कवितेस प्रासादिक कविता असें म्हणतात. मुक्तेश्वराचीं सहजीं जुळलेलीं उत्तम वर्णनें, अत्यंत भाविक अशा नामदेव, तुकारामादिकांचे अंतःकरणापासून निघालेले ईश्वरभक्तिपर प्रेमोद्गार, हे **प्रसाद** या गुणाचीं उत्कृष्ट उदाहरणें होत. तसेंच निरनिराळ्या मराठी कवांचे स्वभावोक्तिपूर्ण उद्गारही प्रासादिक म्हटले पाहिजेत. मागें उदात्तरस म्हणून जो सांगितला आहे, तत्पूर्ण वर्णनेंही प्रासादिक वर्णनें होत. मराठी कवींमध्यें मुक्तेश्वर, रघुनाथ पंडित, तुकाराम, यांच्या कवितेत प्रसाद फार, परंतु वामन, श्रीधर, मोरोपंत यांनीं आपल्या कवितेस शोभा आणण्याचे विशेष प्रयत्न केले आहेत,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यामुळें त्यांच्या कवितेंत प्रसाद हा गुण कमीच. तथापि वामन आणि मोरोपंत यांच्या कवितेंतही हा गुण पुष्कळ ठिकाणीं आढळतो. वामन वेदान्तामध्यें भराऱ्या मारूं लागला अथवा मोरोपंत भक्तिरसामध्यें तल्लीन झाला असतां त्याच्या कवितेंत प्रसाद हा गुण पुष्कळ उत्पन्न झालेला आढळतो. या गुणाचीं उदाहरणें सहज कळण्यासारखीं आहेत आणि मागें पुष्कळ आलीं ही आहेत म्हणून येथें विस्तार करीत नाहीं.

(२). ओज —विषयवर्णनास साजेल असे शब्द घालून, वाक्यरचना करून आणि दृष्टान्तादि दाखले देऊन अनुरूप असें वर्णन केलें असतां तशा वर्णनांत ओज हा गुण असतो. हा गुण वामन आणि मोरोपंत यांच्या कवितेंत भरपूर आहे. मोरोपंतानें अनेक प्रसंगांचीं हुबेहुब वर्णनें अनेक ठिकाणीं केलेली असल्यामुळें त्याच्या कवितेमध्यें ओज हा गुण सर्वत्र दिसून येतो. विषयानुरूप वर्णनाचा ओघ आणि त्यास शोभेल अशी शब्दरचना या गोष्टी या गुणाला अंगभूत असतात. युद्धांत आणिबाणीच्या प्रसंगीं अभिमन्यूच्या पराक्रमाचें वर्णन मोरोपंतांनीं केलें आहे तें:—

" तो खड्गचर्म घेऊनि अवलंबी वीरनामक विहाय,
संकट पडतां सोडुनि धैर्यासि म्हणेल काय कवि हाय ?
शत्रुमुखींचें क्षितिवरि उतरुनि, घेऊनि चक्र, पाणि हरी,
वाटे साक्षात् शिरला असुरसमूहांत चक्रपाणि हरी. "

मोरो०

पांडवसभेंत श्रीकृष्णानें शिशुपालाचा शिरच्छेद केला, त्यावेळचें वर्णनः—

"वृष्णींचा शक्र[1] चक्र त्वरित मग नगच्छेदना जेविं पाक,
द्वेषी वज्र स्वकर्मद्रुमफलततीचा भोगवी जो विपाक;
सोडी, तोडी, क्षणांत क्षितिवरि सहसा, लोळवी चैद्य[2]मस्ता,
हस्ता जोडून वंदी, स्तवि सदभयदा त्या सभा ती समस्ता. "

कृष्णाविजय.

हिरण्यकशिपूस मारण्यासाठीं नृसिंह प्रकट होऊन त्यानें दैत्याचा वध केला, त्यावेळचें वामन कवीनें केलेलें वर्णनः—

१ यादवेंद्रकृष्ण. २ चैद्य-शिशुपाल.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

(घनाक्षरी)

" मुख सिंहाचें उत्कट । नरतनु जे विकट,
होय नरसिंह प्रघट । विधि-वर-रक्षणीं;
बाहू बाहू चंड चंड । काळदंडसे उदंड,
ज्वाळा तोंडांत अखंड । चंद्ररश्मी ईक्षणीं;
नखें वज्रेशीं तिखट । दांतीं शब्द खट्ट खट्ट,
जीभ चंचळ चोखट । जाणों खङ्ग दाक्षिणीं;
कुंडलें मंडित गंड । अंगीं बाणलें श्रीखंड,
हृदयाचे खंड खंड । दैत्याचे तयाक्षणीं. "

" पसरट मुख मोठें. आंत दाढा कराळा,
परम चपळ जिव्हा, खङ्ग जैसा निराळा;
नयनयुगल जाणों तापलें हेमपाणी,
बहुभुजनखशस्त्रें, देखिला चक्रपाणी. "

" अमर तो मरतो आंतलौकरी । चपळ तो पळतो धरितां करीं;
उसळला खळ लाघवलक्षणी । निलपति लपती सुर त्या क्षणीं. "

वामन.

मराठींत क्रियेचे अनुकरणवाचक शब्द पुष्कळ आहेत. त्यांचा उपयोग करून केलेलें वर्णन फारच शोभतें व त्यामध्यें आज गुण सहज येतो. अशीं वर्णनें मराठी कवींच्या ग्रंथांत पुष्कळ असतात. याचीं कांहीं उदाहरणें:—.

" जेथें ज्वाळांचा धडधडाट । वंशीं कपाटांचा तडतडाट,
लाख जळतां भडभडाट । कुवास व्योमीं दाटला;
दिवाभीतांचे घुंघाट । पिंगळियांचे किलकिलाट,
भालु भुंकती सैराट । टिटवे थोर टिवटिवती. " मुक्ते०

" गंधर्व भयें काळिज धडधड उडतें करें पहा गे हें ! "

" टकमक पहात होते प्रभुमुखचंद्राकडेचि चातकसे. "

" मारुनि रात्रिचरकटक, रुधिरनदी खळखळाट वाहविली,
चळचळ घटोत्कचाची मर्मीं भेदुनी मुहूर्त राहविली. "

---

१ प्रखर सूर्य. २ वेळ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" मग कंठनाळ चरचर तो सत्य करावया विरुद कापी;
मिटक्या देउनि मटमट, घटघट त्या स्वाहितासृगुदका प्री. "
" धांवे अक्रूर तसा भेटाया कडकडून आइला. "
" रथ थडकले, भडकले हय, शस्त्रजवन्हि धडकले वरते. "
" मंच सकळ डगमगले कंसमुकुटमणि गळोनियां पडला. "
" बहु कडकडे परशरें, जैसा अतितप्त पाक थवानें. "
" मानी सर्व मनोरथद्रुम फळीं ओथंबले आपुले. " मोरो०

(३) माधुर्य—वर्णनामध्यें अनुरूप अशा रसाचा प्रादुर्भाव होत असला म्हणजे कवितेंत किंवा साध्या वर्णनांत माधुर्य हा गुण उत्पन्न होतो. मागें भक्ति, वीर, वत्सल इत्यादि रसांचीं जीं उदाहरणें दिलीं आहेत, तीं या गुणानें पूर्ण आहेत. मुक्तेश्वर, रघुनाथपंडित, मोरोपंत यांच्या व पुष्कळदां वामनाच्या कवितेंतही माधुर्य विपुल आढळतें. या गुणानें पूर्ण असे उतारे मागें अनेक आलेलेच आहेत. तथापि मोरोपंताच्या *छंदोरामायण नामक एका अप्रसिद्ध रामायणांतील रामाच्या बाललीला-वर्णनाचा पुढील मनोहर उतारा द्यावासा वाटतोः—

" पीतां स्तनांते क्षणमात्र राहणें ! महादरें मातृमुखासि पाहणें,
वक्त्रांत तें दुग्ध तसेंच वाहणें । तेणेंचि फूत्कार करोनि नाहणें;
मुखांतुनी दुग्ध गळे सुनिर्मळ । उरावरी ये अतिशुभ्र वोगळ;
मंदाकिनीचा गगनीं प्रवाह तो । चंद्रप्रभापांडुर काय वाहतो;
बैसोनि हर्षें जननीचिया कडे । विलोकुनी तन्मुखनीरजाकडे;
स्मितामृतापूरित बोल बोबडे । बोले, तदा ब्रह्मसुख स्वयें दडे !
अत्यंत शुद्ध स्फटिकालयांतरीं । क्रीडा करी राम जधीं परोपरी,
नानासुखप्राप्तिसुखास मावली ।.विलोकुनी तत्प्रतिबिंब पावली;

* ह्या रामायणाचीं सुमारें साडेपांचशें श्लोकांचीं पहिलीं दोनच कांडें उपलब्ध झालीं आहेत असें रा० पांगारकर लिहितात. पांगारकर यांनीं यांतील जे थोडेसे श्लोक प्रसिद्ध केले आहेत, त्यांवरून तें फारच मनोहर असावें असें वाटतें. त्यांनीं एवढीं उपलब्ध कांडेंच तरी प्रसिद्ध केलीं असतां बरें होईल.

१ शत्रुचें रक्तरूपी उदक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्वनंदनातें प्रतिबिंबमंडळीं । धौतामळस्फाटिक-मंदिरस्थळीं—
माता न जाणे, बहु शोधितां भ्रमे । परंतु पावे सुख ती अशा श्रमें;
धात्री जयीं रामकरांबुजाप्रती । धरूनियां चालविती स्खलद्गती,
चुंबी घरा ती प्रभुपादनीरजें । अलभ्य ज्यांचीं त्रिविषज्जनीं रजें;
घिस्यापुढें रत्नविराजि कंकणें । करें नमस्कार करोनि ठाकणें,
धात्र्युक्त सारें निजवृत्त सांगणें । अशा गुणें तो करि नाक ठेंगणें[3];
भूपापरी सर्वांहि तो सभाजन । याचें करी नित्य सुखें सभाजनें;
विलोकिता मर्त्यकृतावतारक । न लोचनीं हालति पक्ष्मतारक;
आला चतुर्वर्ग नृपालयीं स्वयें । चतुष्कुमारात्ममिषेंचि निश्चयें;
तुळा नसे भूपतिच्या सुखाप्रती । स्तवी सदा यास मुखें दिवस्पति;
रामासवें लक्ष्मण सर्वदा वसे । शत्रुघ्न तोही भरताश्रयीं असे;
पूर्वीं विभागक्रम जाहले जसे । द्वंद्वें सुखें वर्तति बंधु ते तसे;
छाया तनूची तनुला न सोडी । त्या बंधुंचीं एक तशीच जोडी;
परस्परीं त्यांस अपार गोडी । त्या मित्रभावा उपमाच थोडी. ”

आणखी एक साकीमय सुदामचरित्रांतील सुंदर उतारा घेऊन हें प्रकरण संपवूं:—

“ हरिचा सखा सुदामा ब्राह्मण, निस्पृह, आत्मज्ञानी,
होता गृही, यदृच्छालाभें परमसुखातें मानी;
स्त्रीस म्हणे, आनंदें तो द्विज, ‘ जातों सख्या पहाया,
तच्चरणावरि निजतनुमन ही पुष्पांजळी वहाया.’ ”

सुदामा कृष्णाकडे आला, तव्हां—

“ झडकरि उठला दयाळु माधव, वस्त्रादिक नावरितां,
धांवत आला पुढें रमेला सांडुनि दासाकरितां;
मित्रांगस्पर्शानें झाला सुखी दयेचा सिंधू,
लोचनपद्मापासुनि गळती प्रेमाश्रूचे बिंदू;
जळ घाली रुक्मिणी पदांवरि मणिकनकाच्या पात्रें,

१ स्फटिक भूमीभागीं रामाचीं बहुत प्रतिबिंबें पडलीं, त्यांत तिला खरा राम सांपडेना. २ देवांना. ३ सुखानें स्वर्ग ठेंगणा वाटे. ४ पूजन. ५ चार मुक्ति किंवा पुरुषार्थ. ६ संसारी. ७ जें कांहीं मिळेल त्यांत. ८ श्रीकृष्ण. ९ रत्नखचित सुवर्णपात्रानें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

[stamp]

प्रक्षाळण केलें श्रीनाथें सुखरोमांचितगात्रें;
शंभुशिरीं ज्याचें चरणोदक, वेद जयाचे बंदी,
तो तीर्थरूप तीर्थांचाही मुनिपादोदक वंदी;
कृष्ण सख्यातें करीं धरुनियां सांगे गोष्टी गोड,
त्यांशीं सर्वरसाधिक परि तें अमृत न पावे जोड. "

पुढें कृष्णानें ' आम्हांस वहिनीनें खाऊ काय दिला आहे ? ' असें विचारलें असतां—

" संकोचला, अधोमुख बसला विप्र, न बोले कांहीं,
बुडताचि होता मुनि तो केवळ लज्जानदीप्रवाहीं ! "

शेवटीं फाटक्या तुटक्या वस्त्रांत शेजाऱ्याकडून उसने आणलेल्या पोह्यांची पुरचुंडी सांपडली, ती कृष्णानें घेऊन सोडली; त्यांत काय त्या पोह्यांच्या दोन तीन मुष्टी असतील नसतील. त्यांतली एक मोठीशी मूठ तर कृष्णानें तोंडांत घातलीच ! इतक्यांत सर्व पोहे संपणार असें पाहून रुक्मिणी झटकर पुढें आली, आणि कृष्णाचा हात धरून म्हणते:—

" द्यावा प्रसाद हा सर्वांला, भक्षूं वाडें कोडें,
सेवन करितां तुम्हांला तों, हें ब्रह्मांडहि थोडें ! "

आणि मग—

" पोहे नेले हिरोनि भगवत्पर पद्मजासतीनें[1],
प्रार्थुनि, रिझवुनि, हंसवुनि, रमवुनि, निजपातिला सुमतीनें. "

मोरोपंतांचें साकीवद्ध सुदामचरित्र हें लहानसें काव्य सर्वच फार मधुर आणि रमणीय आहे !

———

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१ लक्ष्मीनें.

JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3548

१०—या पुस्तकांत आलेले रस, अलंकार इत्यादिकांची

सूचि.

नावांपुढील आंकडे पृष्ठांचे आहेत.

रस—

अद्भुत १६
उदात्त २२
करुण १५
भक्तिरस ८
भयानक १९
वत्सल २०
वीर ११
शृंगार १५
शांत २२
हास्य १७

अलंकार—

अतिशयोक्ति २९, ६१
अनन्वय ४८
अनुप्रास ७७
  छेकानुप्रास ७७
  लाटानुप्रास ७८
  वृत्यनुप्रास ७८
अपन्हुति ४३
अप्रस्तुतप्रशंसा ३०
अर्थान्तरन्यास ३१
असंगति ६५
उत्प्रेक्षा ३९
  फलोत्प्रेक्षा ४०, ४१, ४२
  व्यंग्योत्प्रेक्षा ४०, ४१ ४२
  दृष्टांतोत्प्रेक्षा ४०, ४१, ४२
  स्वरूपोत्प्रेक्षा ४०, ४१, ४२
  हेतूत्प्रेक्षा ४०, ४१, ४२
उपमा ३४, ३६
  पूर्णोपमा ३७
  प्रतिवस्तूपमा [illegible]
  मालोपमा ३९
  वाक्योपमा ३८
  लुप्तोपमा ३७
उपमान ३६
उपमेय ३६
काव्यलिंग ६८
चेतनगुणोक्ति ७४
तुल्ययोगिता ५६
दृष्टान्त ५३
दीपक ५४
  कारकदीपक ५५, ५६
  क्रियादीपक ५५, ५६
  मालादीपक ५५, ५६
निदर्शना ५१
परिकर ७३
परिकरांकुर ७४
परिसंख्या ५६
पर्यायोक्ति २९
प्रत्यनीक ५९
प्रश्नालंकार ७५
भ्रांतिमान ४२
यमक ७८
  अन्त्ययमक ७८
  अश्वधाटीयमक ८०
  चरणयमक ७९
  दामयमक ८०
रूपक ४४
  निरंगरूपक ४६
  परंपरारूपक ४६
  [illegible]
  सांग रूपक ४६
रूपकातिशयोक्ति ४७
वक्रोक्ति ४
विभावना ६६
विरुद्धगुणन्यास ५८
विरोध ५७
विरोधाभास ५८
विशेष ६६
विशेषोक्ति ६७
विषम ७०
व्यतिरेक ४९
व्याजस्तुति ७२
व्याजोक्ति ७२
श्लेष ४५
सन्देह ४२
सम ६९
समाधि ६४
समासोक्ति २९
समुच्चय ६४
सार ७२
सहोक्ति ६१
स्मरणालंकार ६०
स्वभावोक्ति ४

काव्य-गुण—

ओज ८७
प्रसाद ८६
माधुर्य ८९

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

SRI JAG·DGU U ·SHWARADHYA
JNANA SIMHAS · · · · · ·DIR
LIB · ·
Jangamwadi Math, VARANASI.
Acc. No. 3548

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri